।। श्री स्वामी समर्थाय नम: ।।

# ।। श्री स्वामी अमृतसार नवशती ।।

वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे
(B.A.M.S.)

मनकर्णिका पब्लिकेशन

मनकर्णिका प्रकाशन पुष्प - **२२**

- **।। श्री स्वामी अमृतसार नवशती।।**
- **© वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे**
  (B.A.M.S.)
- **प्रथम आवृत्ती - १९ एप्रिल २०१२**
  **(श्री स्वामी पुण्यतिथी)**
- अक्षरजुळणी
  **सौ. अर्चना गजानन एकतारे**
  **श्री. गजानन अमृत एकतारे**
- मुखपृष्ठ
  **नयना मते**
- प्रकाशक
  **गिरीश दगडूलाल गांधी**
  **'मनकर्णिका पब्लिकेशन'**
  विशाल अपार्ट., पडवळ आळी,
  चिंचवडगांव, पुणे - ४११ ०३३.
  मो. - ९९२१६२५३८४
  E-mail: manakarnikapc@gmail.com
- मुद्रक
  **'भाग्यश्री ऑफसेट प्रिंटर्स',**
  संगमवाडी, पुणे – ४११ ००३.
- मूल्य ₹ ५०/- (पन्नास रुपये मात्र)

।। श्री ।।

# ।। प्रस्तावना ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जन्ममरणाच्या खेपा चुकेना। संसाराचा हा ताप सुटेना।
परि संसारी देहाची अपार वासना। वासनेचा या क्षय होईना।।
मायेचा संसार, सृष्टीची स्थापना। ब्रह्मादि देवासही जी चुकेना।
क्षीणलो फार मी आता सोसवेना। सोडवी मज म्हणूनी आलो गुरुचरणा।।
सद्‌गुरु लाभता संसार होई सोपा। परमार्थाच्या मार्गी नेई गुरुनाथा।
सुटू दे आमुच्या जन्ममरण खेपा। ठेवी चरणाशी मज जगन्नाथा।।


'एकोऽहं बहुस्याम्' आदी संकल्प जागा झाला, मायेने, त्याच्या आश्रयाने ब्रह्मांडाचा संसार

मांडला. पंचबीजतत्त्व अन् त्रिगुणांचा वेढा त्यामध्ये मायेचा संसार सजला. परमात्मपुरुष या संपूर्ण जगताचे कारण, पण तो यात असूनही नसणारा! सगुणातून निर्गुणत्व प्रकट करणारा! गुणातीताच्या पुढे जाण्यास त्याची कृपा होणे निश्चितच आवश्यक, त्यासाठी साधना गरजेची! संसारातच अखंड डुंबणारा जीव! त्याला मोक्षाचा मार्ग दाखविण्यासाठीच साऱ्या ब्रह्मांडाला व्यापून अंगुष्ठमात्र उरलेल्या स्वरूपाचे रूप सद्‌गुरुरुपी प्रकटले; अन् सद्‌गुरुंच्या कृपेने शुक, व्यास, वामनादि मुनी, ज्ञानेश्वर, तुकारामादि संत ह्या मायेच्या संसारात राहून जीवनमुक्त झाले. या आणि अशाच अगणित ऋषीमुनी यांच्या तपश्चर्येने संतुष्ट होऊनच परात्पर परमात्मतत्त्व दत्तस्वरूपात या भुवनी प्रकटले! तेच अक्कलकोटचे स्वामीमहाराज म्हणून अवतार घेऊन त्यांनी आपल्यासारख्या सामान्यांची तळमळ जाणली अन् परमात्म मार्गावर उपदेशरूपी ज्ञानाचे दीप लावून कृपेचा समर्थ हात हाती दिला या भवसागरास तरून जाण्यासाठी! 'नरदेहाविना मुक्ती नाही' आणि नरदेहात वसणाऱ्या या मानवास कधीही तृप्ती होत नाही अन् मग मोहमायेच्या अंध:कारात तो बुडून जातो. 'बुडती ही लेकरे न साही माय' या तत्त्वाप्रमाणे सद्‌गुरु माऊलीला कळवळा आला अन् त्यांनीच हाती लेखणी देऊन या ग्रंथाचा प्रपंच करविला!

या ग्रंथात संपूर्ण पिंडब्रह्मांडाची निर्मिती, परमात्म पुरुषाच्या अवतार संगती, मास-दिनांचे महत्त्व, सर्वात महत्त्वाचे म्हणजे सद्‌गुरु लक्षण, सत्‌शिष्य लक्षण आणि मनोनिग्रहाचे महत्त्व, त्यासाठी गुरुचरणाशी अनन्यशरणता याविषयीचे विवेचन आले आहे. विविध देवता आपण मानतो. कुणी श्रीकृष्ण, कुणी विठोबा, कुणी शिवमल्हारी, अगणित आणि असंख्य! मग आपल्या मनात या विविधतेमुळे भेदभाव निर्माण होतो. ही सर्व रूपे त्या परमात्म परात्पराचीच आहेत. याची सद्‌भक्तांना समर्थ स्वामींमुळे झालेली अनुभूती प्रत्यक्ष स्वामींनीच येथे सांगितली आहे. अनेक जन्मांची कर्मे दैव म्हणून अवतरतात. मग दैव म्हणजे काय? त्याची रूपेच संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध! सद्‌गुरु कृपेने संचित क्रियमाणाचा क्षय होतो, पण प्रारब्धाचा क्षय मात्र भोगल्यानेच होतो, हे ही सांगितलेले आहे. ही प्रारब्धगती चुकत नाही. भावना शुद्‌ध असेल तर सद्‌गुरु कृपेचा लाभ होऊन हा संसार सागर तरून जाता येतो, पण शुद्‌ध भक्ती हवी, भाव भोळा असावा, अंतरंग निर्मळ असावे! कर्म करणे चुकत नाही कारण हे शरीर आहे. या शरीराला काही शरीर-धर्म आहेत अन् त्यासाठी नित्य-नैमित्तीक कर्म आहेत! आपल्यासाठी धर्म-अर्थ-काम-मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहेत, पण ऐहिक सुखाच्या लालसेने भोगवादाचा प्रभाव वाढून मनुष्य धर्म आणि मोक्ष विसरून जातो अन् अर्थ आणि काम यांच्याच मागे धावत जातो, त्यामुळे निर्माण

होणारी दु:खे, यातना भोगत राहतो. यातून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे धर्म आणि मोक्ष. या पुरुषार्थांचे स्मरण ठेऊन प्रपंचात राहून परमार्थ साधना करावी. त्या परमेश्वराची जाणीव ठेवून नित्य-नैमित्तिक कर्म करावीत, पण ही कर्म करताना मनोनिग्रह हवा. त्यासाठी वासनेचा क्षय व्हावा, त्यामुळे अंत:करण निर्मळ व्हावे आणि आपण खरा परमार्थ जाणावा. आपल्या लाडक्या भक्तांना हा मार्ग दाखविण्यासाठी स्वामींनी भक्तांविषयीच्या वात्सल्याने दाखविलेल्या अनंतलीलांचे वर्णन यात आले आहे.

हे ''**श्री स्वामी अमृतसार नवशती**'' गुरुलीलामृताचे स्वरूप असल्याने अखंडपणे जाती-धर्म-पंथ -देश-विदेश-कालातीत आपल्या भक्तांचे परम्‌कल्याणकारक आहे. याचे नित्य पठण केल्याने मन शांत होते, शुद्ध निर्मळ होते आणि हा दु:खरूप प्रपंच भक्तिरसाने भरून गेल्याने सुखस्वरूप होऊन हा भवसागर सुखाने पार करता येईल. अशीच स्वामी समर्थ आशीर्वादाने अन् दृष्टांताने ग्रन्थ साकार करणाऱ्या स्वामीभक्त स्वामीचरणांचा परमदास मी ''वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे'' या स्वामीभक्ताची धारणा असून मला त्याप्रमाणे परमात्मा परात्पर श्री स्वामी समर्थांचा आशीर्वाद आहे. तो आशीर्वाद सर्व स्वामीभक्तांना लाभावा अशीच स्वामी चरणी विनंती करून हा ग्रंथ भक्तांहाती सोपवित आहे.



आहे हा नृजन्म। परमपवित्र उद्धारक जीवांना।

मायेचा काट सोडवून। करी सुखी सकलजीवांना।।

ज्याचे त्याचे प्रारब्ध तीच गती। होई आपुल्या जीवास तीच प्राप्ती।।

स्वामी नाम घेता होईलसुबुध्दी। देतीलते जीवाला परमार्थ बुध्दी।

होता स्वामी कृपा होईलमायाही लाचार। होईलप्राप्त परमार्थ अन् सुखी संसार।।

**ॐ स्वामीॐ    ॐ स्वामी  ॐ    ॐ स्वामीॐ**

।। श्री ।।

# ।। मनोगत ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।

श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामींचा मी दास, झालो लीन मी चरणी।
तळमळ होती जीवा, अन् भवसागर जाचणी।
स्वामी माऊलींनी, या पामरावर कृपा करुनी।
या भक्ताच्या हाती, दिली स्वहस्ते लेखणी।।.
झाला साकार हा ग्रन्थ, ओवी अमृतसारणी।।
अर्थ फक्त न देता, प्रकटे प्रसन्नता ही मनी।।

प्रत्यक्ष स्वामींचे कार्य आपल्या हातून घडावे हे माझे पूर्वजन्मीचे संचित अन् परमपवित्र अशा माझ्या मातापित्यांचा आशीर्वाद! कुलदेवता कुलस्वामींचा हा प्रत्यक्ष कृपाप्रसाद! मनात एकच नित्य

तळमळ की, हे कार्य असेच घडत रहावे! स्वस्वार्थाचा किंतु यत्किंचितही मनात न यावा! सर्व स्वामी भक्तांसाठीच हे जीवन समर्पण करावे! स्वामी कृपेने अनेक भक्तांचे निरंतर कल्याण होत आहे! म्हणतात ना परमात्म्यास या जीवांविषयी प्रेम असते, पण ज्याच्या त्याच्या प्रारब्धगतीमुळे तो हे प्रेम सर्वांना देऊ शकत नाही. मग तो आपल्या परमभक्तांकरवी सर्वांचे कल्याण करतो. याची प्रत्यक्ष अनुभूती मी अखंडपणे घेत आहे, अन् हे परमभाग्य मला लाभले ही सर्वांचीच मजवरीलकृपा, असे मी मानतो!

वास्तविक पाहता वयाच्या २०-२१व्या वर्षी मला अंधत्व प्राप्त झाले! दोन्ही डोळयांपुढे प्रत्यक्ष अंधार! माझे वडीलस्वामीभक्त कै. श्री. लक्ष्मणराव शिंदे, स्वामी समर्थांस अनन्यभावाने शरण गेले अन् मला कमीत कमी एक फुटावरचे तरी पाहण्याची दृष्टी लाभावी, म्हणून प्रार्थना केली. अन् स्वामींच्या आशीर्वादाने मला एका फुटापर्यंतचे दिसू लागले! सद्गुरुंनी या घटनेतून एक मात्र प्रचिती अवश्य दिली की, ''देह हे देणे त्या परमेश्वराचे!'' इतकेच काय माझ्या मनातीलभोळाभाव जाणून मला चर्मचक्षुंपेक्षा महत्त्वाचे असे ज्ञानचक्षु प्रदान करून आपल्या भोळ्या भक्तांवर कृपेचा वर्षाव करण्याचे मेघस्वरूप मला प्राप्त करवून दिले. स्वामींच्या परमकृपेने स्वामींचे कार्य करत असता मनात आस होती की, स्वामीलीलेवरीलग्रन्थनिर्मिती मज हातून व्हावी अन् स्वामीकृपामृताचा

अमृतघट वाचकां हाती ग्रन्थरूपाने द्यावा! सन २००९ पासून जीवाची तळमळ होती. स्वामींनी ती जाणली अन् हा ग्रंथ साकार झाला.

आपण सारे भक्त संसारी! संसार निभावण्यासाठी कर्म अटळ! पण होते असे की, आपण या संसाराच्या मोहपाशात गुंतत जातो अन् मग परमार्थ आपोआपच सुटतो! सेकंदाचे काटे अखंड धावत मिनिटे, मिनीटांचा दिवस, दिवसांची वर्षे जातात अन् परमार्थ साधना राहून जाते! अशावेळी माऊली ज्याप्रमाणे बाळाला जोजवीत हिताचाच घास भरवीते, तदवत् आपल्या गुरुमाऊलीने नित्य नामस्मरण सांगून जीवनातील कष्ट सुकर करण्यासाठीच जणू हा अखंडीत परिपूर्ण अमृतघटरूपी ग्रंथ **''श्री स्वामी अमृतसार नवशती''** साकार केला. स्वामींच्या कृपेने सर्व स्वामीभक्तांचे अखंड कल्याण होवो, अशीच मनात इच्छा आहे. स्वामींच्या कृपेनेच हे **''श्री स्वामी अमृतसार नवशती''** अमृतघटस्वरूपी अध्याय अन् ओवी अविरतपणे सर्व भक्तजनांचे कल्याण करील, असा स्वामी आशीर्वाद आहेच. जाती, धर्म, पंथ, देश, विदेश, कालयांचा छेद करून अखंड मानवजातीचे कल्याण होईलच होईल.

ह्या ग्रंथाचे पठन आणि श्रवण केल्याने माया लाचार होईल, अन् परमात्म्याचा परम् कल्याणकारक आशीर्वाद सर्व सजीव, निर्जीवांस प्राप्त होवो, अशी ग्रन्थ साकार करविणाऱ्या त्या

श्री स्वामी समर्थ चरणांशी या लेकराची प्रार्थना !

कोणतेही कार्य कुणीही एकटाच करू शकत नाही, त्यासाठी सहाय्य हे लागतेच ! स्वामीभक्त श्री. गजानन अमृत एकतारे अन् त्यांची पत्नी जी मला माझ्या बहिणीसारखीच आहे ती सौ. अर्चना गजानन एकतारे यांनी या ग्रंथास संगणकीकृत करून परममोलाचे सहकार्य दिले आणि ''मनकर्णिका पब्लिकेशन''चे प्रकाशक स्वामीभक्त श्री. गिरीश दगडूलाल गांधी यांनी या ग्रंथाच्या प्रति मुद्रित करून दिल्या. स्वामीभक्त सौ. प्रियंवदा अरविंद जोशी यांनी लेखनास साह्य केले. या सर्वांना स्वामी परमकृपेचा लाभ होवो अन् आमच्या सर्वांच्या अंत:करणात स्वामीभक्ती अमृत सदैव असो, अशी श्री स्वामी समर्थांच्या चरणी विंनती करतो.

सर्व स्वामी भक्तांसाठी ह्या ''**श्री स्वामी अमृतसार नवशती**'' अमृतघटातून सदैव स्वामी कृपेचा अमृतझरा अक्षयपणे वाहत राहू दे! अशी श्री स्वामी समर्थ चरणी विनंती करून हा ग्रंथ श्री श्री श्री स्वामी चरणी अर्पण करतो.

**ॐ स्वामीॐ ॐ स्वामीॐ ॐ स्वामीॐ**

वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे

## • अनुक्रमणिका •


| अध्याय | अध्यायाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| पहिला | भू: लोकाध्याय | १३ |
| दुसरा | भुव: लोकाध्याय | २५ |
| तिसरा | स्व: लोकाध्याय | ३६ |
| चवथा | मह: लोकाध्याय | ४७ |
| पाचवा | जन: लोकाध्याय | ५८ |
| सहावा | तप: लोकाध्याय | ६९ |
| सातवा | सत्यम् लोकाध्याय | ७० |
| आठवा | ब्रह्मांडाध्याय | ९१ |
| नववा | अनंतकोटी ब्रह्मांड नायकाध्याय | १०२ |
| | फलश्रुती | ११४ |
| | श्री तीर्थ महिमा स्तोत्र | ११८ |

## पहिला अध्याय

# ।। भूः लोकाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।

श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

प्रारंभी मंगलमूर्ती। चतुर्दशविद्या चतुःषष्ठी कलांची स्फूर्ति। मिमांसा उपनिषदे वेदवाणी जेणे सुशोभिती। त्या नमियले आदरे।।१।। आता अनादि विद्या देवी सरस्वती। वाग्देवता जियेने स्फुरे अंतःकरणवृत्ति। वाग्विलासिनी हरिहर जीस वंदिती। ती वंदिली प्रेमभावे।।२।। ॐ नमः श्रीसद्गुरुनाथा। गुरुदेव परमदेव दत्तस्वामी समर्था। साधु परित्राणा अवतारधारक नाथा। अनन्यशरणा तुज नमो।।३।। दत्तरुप श्री नृसिंहसरस्वती स्वामी। जगद्हितार्थ वसले अक्कलकोटग्रामी। त्रिभुवन पालक गुरु समर्थ स्वामी। तत्पादपद्मा नमिले अनन्य।।४।। आपण अनुपमेय प्रणतभक्त कैवारी। गुरुलीला वदवावी मम वैखरी। मस्तक ठेविले तव चरणावरी। ग्रंथसिध्दि करणार आपणची।।५।। नमिले वेदव्यास योगीश्वरादि गुरु। सनक उद्दालक बृहस्पति सुरगुरु। वंदिले सकल प्रस्थान त्रय

भाष्यकारु। तैसेची टिकाकारांचे ही चरण वंदिले।।६।। ऐसे वचन करिता स्मरण। शिव अंशावतार नवनाथ करी ब्रह्मांड रक्षण। सकल मतिप्रकाशू हे तव नंदन। लावी ज्ञानमयीदीप भक्ती चेतवून। स्मरणे करिता तव पद्‌मचरण। प्रकट होती तेहतीस कोटी देव।।७।। कालिदास दंडि बाणादि कविश्रेष्ठ। नवनाथ नवयोगी विरागी वरिष्ठ। प्राकृत मुकुंदराज ज्ञानेश्वरादि श्रेष्ठ। संत कवि अनंत मी नमिले।।८।। आता वंदू माता-पिता। कुलदेवतादि ग्रामस्थान वास्तुदेवता। ज्यांचे कृपे इहपर साध्य तत्त्वता। होय सर्वथा निर्धारे।।९।। हृदय विलासिनी चित्कला विश्वमाता। ब्रह्मविद्या विकासिनी कुलदेवता। उदयोऽस्तु तवकृपे निर्भयता। वंदुनी ग्रंथ आरंभिजे।।१०।। आता वंदू श्रोते सज्जन। हरिगुरु भक्ति परमार्थ परायण। ब्रह्मविद्येचे माहेर भांडार रसज्ञपण। विवेक चतुर कृपाळू जे।।११।। ऐसे ग्रंथारंभ सर्वाज्ञानुसार। ऐशी नवशती अगाध सागर। सत्संकल्प सिध्दि प्रदातार। पूर्ण करणार त्याचा तो।।१२।। साधन तैसे अनुबंध चार। निष्काम भगवत्प्रीति कर। वैराग्यादि साधनचार। मोक्षसाधक धर्म आहेत ते।।१३।। निश्चल अज सच्चिदानंद स्वरुप एक। हाची नित्यानित्य विवेक। साधन चतुष्टय मुमुक्षता रामादिषटक। सुटावया संसार बंध निरोपिले।।१४।। नवशती तत्त्व अनुभव चतुष्ट्य एक। मोक्ष सिध्दि प्रयोजन व्दितीय। अनात्मत्वाभिमान बंध ब्रह्म बोध। मोक्षाधिकारी गुरुभक्ती भावशुध्द।

साध्यसाधन भाव जो साच। तोचि संबंध जाणावा।।१५।। संस्कृत-प्राकृती नसे भेदभाव। दोन भाषा अर्थ एक एकच भाव। तैसे प्राकृत-संस्कृत निव्वळ। शब्दार्थ फळ एकची असे।।१६।। असो गुरु संतती कुलश्रेष्ठ। अत्रिऋषी मूळ पीठ। तेथून दत्तगुरु योग विद्ववरिष्ठ। झाले प्रगट परमेश्वर।।१७।। सद्‌गुरुसी शिष्य विनवी। पिंडब्रह्मांडाची निर्मिती सांगावी। ब्रह्मा विष्णु शिव निर्मिती झाली केवी। सांगावी आपण गुरुवर्या।।१८।। असो म्हणूनी गुरु सांगती। ब्रह्म विद्ववरिष्ठ अत्रिऋषी। कांता अनुसुया पतिव्रता सती। पुत्रास्तव तप आचरती।।१९।। ब्रह्मदेव शिव महेंद्र सुरवर। त्रैमूर्ति स्व-स्व चिह्न गणयुक्त। ऋषी आश्रमी पातले प्रसन्न। ऋषीस करून कामवर प्रदान। स्वस्थानी गेले सुरवर। आनंद निर्भय होत्साते।।२०।। नारदे पूर्वी केले अनुष्ठान। तयासी ईश्वर झाले प्रसन्न। वरदान व्हावे नित्य दर्शन। परि जर ब्रह्मा विष्णु शिव तीन। एकत्र हे तिघेही होऊन पूर्ण। तरीच साधे कार्य अनुपम।।२१।। नारदे पाहिले अनुसुयेचे सत्त्व। सत्य ती पतिव्रता असे वरिष्ठ। पाहुनी रमा सावित्री गिरीजा एकत्र। नारदमुनी तेथे पातले।।२२।। वाणी बोलीला नारद कलह प्रिय जया। ब्रह्मांडामाजी एक अनसूया। महासाध्वी आदिमाया। सुरवर द्विजवर वंद्य जी।।२३।। ऐकूनी स्तुतीपर नारदवाणी। संतापे कोपल्या तीनही रमणी। परतूनी आपल्या निजसदनी। स्वकीये पतीते आज्ञापिती। पत्नींचे वचन ते ऐकूनी।

विधी हरहरी पडले विवंचनी। पातले अत्रिआश्रमी एकत्र येऊनी। सत्त्वपरीक्षा घेण्याला।।२४।। विगतवस्त्र वाढपाकास। तोषवी तू आमच्या सुधेस। बोलीले ते तिघे त्या सतीस। शरण गेली सती आपुल्या पतीस। सतीचे परि त्या सत्त्वच खास। झाली लहान बाळे तीनही देव।।२५।। सती सावित्री रमा ऐकूनी वृत्त। पातल्या आश्रमी होऊनी अस्वस्थ। ना ओळखती त्या स्वपतीस। जाती मग शरण त्या अनुसुयेस। देई आमुचे पती आम्हास। म्हणती क्षमा करा हो।।२६।। मार्गशीर्ष शुक्लपक्षी। भूतातिथी मंद रोहिणी ऋक्षी। उच्चस्थ ग्रह असता सायान्ही सुराध्यक्षी। पुरुषोत्तम प्रगटले अत्रिआश्रमी।।२७।। अपार माया ऐसी। खंचित असे जियेचे उदरी। दाऊनी वात्सल्य प्रेमभाव। करी ती देवांस बालक।।२८।। देवजरी बलाढ्य पराक्रमी शूर। भक्ताज्ञेने लाजवे सारे विश्व। होती अनुसुयेची बालक। दाऊनी प्रेम भक्तांवरी अपार।।२९।। मग त्रैमूर्ति वदति नारदा। आमचे अभेदत्त्वे दैवी संपदा। विशुध्द सत्त्वैक विलोकी सर्वदा। दत्त प्रत्यक्ष परमात्मस्वरुप।।३०।। दत्तावतार पूर्ण षोडशकला। जन्मोत्सव करिता कला विकला। आपदा चिंता जाती सकला। भक्तीस विकला जगदीश।।३१।। दत्तस्मरण नित्य केलीया गुरुभक्ती। पुत्र पौत्र लक्ष्मी विद्या प्राप्ती। राजमान्य विजयी दीर्घायु जीवन्मुक्त होती। ग्रंथ हा नित्य पठुनिया।।३२।। आता परमपवित्र अवतार चरित्र। ऐकता लाधती पुरुषार्थ पुत्र पौत्र। चराचर

विश्वोत्पत्ती करावया निमित्त। पुरुषावतार धारण केला।।३३।। पुरुषावतारी ब्रम्हांडपति नारायण। त्याच्या नाभी डोही कमली ब्रम्हदेव। जो विश्व स्रष्ट्याचा स्वामी केवल। उपजला तो परमेष्ठी। ब्रह्मदेवापासून ऋषि जाहले मरिच्यादिक। त्यांनी निर्मिले पशुपक्षी मनुष्यादिक। त्यास्तव आदिनारायणाचे अवतार अनेक। जगत्कल्याणा जाहले।।३४।। पहिला अवतार सनत्कुमार। दुसरा वराहरूपे उद्धरी पृथ्वीसह चराचर। तिसरा नारद सांगी निष्कामकर्म। मोक्षप्रद होते जे।।३५।। चतुर्थावतारी ऋषी स्वरूपी नर-नारायण। पाचवा कपिलसिध्देश्वर कथिले सांख्यशास्त्र थोर। षष्ठावतार दत्तात्रेय सद्‌गुरु योगीश्वर। प्रल्हाद यदु सहस्त्रार्जुन आदिकांस। आत्मविद्या बोधून कृतार्थता अर्पिली।।३६।। सप्तमावतार झाला यज्ञ। केले स्वायंभूव मन्वन्तराचे संरक्षण। अष्टमावतार ऋषभ जनासी दावी योग। परम्‌हंस मार्ग तो।।३७।। नवमे अवतारी 'पृथु' नामे म्हणून। गोरुपिणी पृथ्वीचे दोहन। मत्स्यरूपे धरून पृथ्वी ते नौकेत बैसवून। सत्यव्रता रक्षिले दशमावतारी।।३८।। अमृत प्राप्तीस्तव देवदानवे केले समुद्र-मंथन। कूर्मरूप करुनी धारण। तोची परमेश्वर धन्वंतरी नाम। द्वादशावतारी अमृतकलश देतसे।।३९।। त्रयोदशी मोहिनी होऊन। तोची चवदावा नृसिंहावतार करी धारण। स्तंभातून प्रकटून हिरण्यकश्यपू संहारुन। प्रल्हादभक्ता सांभाळितो।।४०।। पंधरावा वामनावतार सोळावा परशुराम।

सतरावे जाहले व्यास साक्षात नारायण। जेणे पुराणे सूत्रे भाष्यादिक। स्वये ज्ञानार्थ रचियेली।।४१।। अठरावा रामचंद्र एकोणीसावा बलराम। विसावा पूर्णावतार श्रीकृष्ण। एकविसावा भगवान बुध्द। कल्की अवतार तोची होतसे।।४२।। आता ज्योतिषशास्त्रयुक्त। चतुर्युगोत्पत्ति बोलीजेत। अवतार कोणकोणते युगांत। जाहले तेही परिसावे?।।४३।। सप्तद्वीपा नवखंड वसुंधरा। सप्तसमुद्र सप्तअध ऊर्ध्व लोक वसुधा। सृष्टी प्रकृती ही अष्टधा। चौऱ्यांशी लक्ष योनी जाहल्या।।४४।। कृतयुगी मत्स्य-कूर्म-वराह-नारसिंह। वामन-परशुराम रामचंद्र त्रेतात। श्रीकृष्ण बौध्द झाले द्वापारात। कर्नाटक देशी करवीर नगरात। कल्की भविष्यात कलीयुगात। असे होणार शेवटी।।४५।। कलीत षट् शककर्तार। इंद्रप्रस्थी पहिला युधिष्ठीर। उज्जैनीस विक्रम तृतीय शालिवाहन। विजयाभिनंदन पंचम नागार्जुन। षट्कर्नाटक देशी कल्की भविष्यावतार। शक तयाचा चालेल।।४६।। मत्स्य-कूर्म-वराह-बौध्द। कल्की इत्यादि अवतार प्रसिध्द। जयंतीस्तव उपोषण-उत्सव कीर्तन पुराण। करिता द्विजभोजन महत्पुण्य होतसे।।४७।। शिष्याते म्हणती श्रीगुरु। श्रीमद्नृसिंह यति असती परमगुरु। हिमालय पर्वती हे यतिगुरु। जगध्दितार्थ संचरती।।४८।। चीन देशीची स्त्रीपुरुषे तया पाहती। हासुनी तया वाग्बाणी निंदती। म्हणती निरुपयोगी हा यति। मद्यपाने स्वच्छंद विषय ते भोगिती।।४९।। तदा झाला पुरुषनारी नारी

नररूपधारी। त्या गुहेत तपस्वी ब्रह्मचारी। देखुनी अंतरी लज्जित भारी। पश्चातापदग्ध जाती शरण गुरुवर्या।।५०।। यतींद्र वदती सर्वनाशक कामविकार। विवेके करावा दृढतर विचार। परि पाहूनी त्यांचा पश्चाताप फार। केले पूर्ववत् काया उभयता।।५१।। मग ते करिती स्वदेश गमन। करिती अहर्निश गुरुपद चिंतन। पुत्रही तयांचे समर्थ सेवक होऊन। सद्‌गुरु लीला गानी रंगले।।५२।। एकदा शीतकाली उदकाजवळी यति बैसले। व्याधे शिकारीस धनु सज्ज केले। शिशुकुरग व्याधभयी धावे यतिकडे। समर्था श्रय कराया।।५३।। व्याध करी मार बंदुकीचा। परि तयाच्या एकाही नखा। अणुमात्र देखील धक्का धळा। लागला नाही की।।५४।। स्वामी फेकिता दोन खडे व्याधाकडे। चारही व्याध तटस्थ जाहले। परि गुरुकृपे हिंसकासी उध्दरिले। दयासागर स्वामी म्हणून।।५५।। कृपा करी जनावरी प्राणीमात्रावरी। जीव हा संयोग होऊन परि। राहे समान तयात ही एकसरी। जीवेच्छेने न हाले पानजरी। अशा जडजीवेसी कवटाळीले उरी। म्हणून नित्य उद्‌धार करावा।।५६।। श्रीगुरुदर्शन थोर महिमा। पारधी पावले योगक्षेमा। निरुपमासी द्यावी उपमा। हे न घडे अघटित।।५७।। तया अज्ञापिती गुरु निष्काम। सर्वभूती असो अविरोध प्रेम। संरक्षूनी सत्य आणि स्वधर्म। स्वस्ति क्षेम असा रे।।५८।। जगाच्या नित्य कल्याणार्थ। महिवरती संचरती गुरुनाथ। भक्तिरहस्य ज्ञान परमार्थ।

लाविती।।५९।। मृगी धुंडाळी निज पाडस शोकाकूल। तृषार्त गेली उदकाजवळ। भये किंचित प्राशून जल। आम्रतरुतली असे की।।६०।। मृगीपती शोधी स्त्रीपुत्रा प्रति। तया देखिले मुनीश्वर यति। तयास पाहूनी नृसिंहयती वदती। विप्रा का नोळखसी सांप्रत।।६१।। पूर्वीचा तू भक्त आमुचा असता। तुझी स्त्री शुध्द पतिव्रता। परि सत्पुरुष छळिले तुम्ही तत्त्वता। म्हणूनी पावला मृगजन्म।।६२।। मृगीही तिथे पातली त्वरित। देखिले उभयता निजबालक। जागली संस्कार-संस्मृति पूर्व। साष्टांग नमिति नृसिंहयती।।६३।। करुणासागर ते पतितपावन। होता पुन्हा श्रीचरण दर्शन। बहुजन्मीचे उपजले ज्ञान। ब्रह्म विज्ञान उभयता होतसे।।६४।। पुरे झाल्या जन्मखेपा। आता सोडवा मायबापा। दीनबंधो व्हावी तवकृपा। त्रिविध तापा निरसावे।।६५।। ऐकूनी बोलती जगत्पाल हसून। नरजन्माविना न अपवर्गसाधन। पावालब्राह्मणवंशी जन्म। बाणेलज्ञान-वैराग्य।।६६।। मूकपशू आणि सत्पुरुषांचा। ऐकूनी संवाद स्वहिताचा। गुहेतीलतपस्वी जनांचा। जीव वेधला सलक्ष्य।।६७।। धन्य धन्य महात्मा आपण। साक्षात स्वरूप नारायण। जनानुग्रहार्थ करिता अवतार धारण। वंदितो सद्गुरु चरणारविंदाते।।६८।। जयंत्युत्साही श्रीभगवंताचे। पूजन उपवासादि करिता साचे। दुरितनाशन अनेक जन्मांचे। वांछितफलप्राप्त होते।।६९।। ब्रह्मपुराणातीलवचन। चैत्रमासीं शुक्ल प्रतिपदा दिन। ते

दिनी सूर्योदयी जग उत्पन्न। केले प्रथम ब्रह्मदेवाने।।७०।। प्रतिपदेसी घरोघरी ध्वजारोपण। भक्तीने देव ब्राह्मण पूजन। करून निंबपत्रादि भक्षण। विप्रसंतर्पण करावे।।७१।। गौरीजन्म चैत्रशुध्द तृतीयेला। चतुर्थीयुक्त जी गौरी तृतीया। पुत्र पौत्र संतती सौभाग्या। देणारी म्हणूनी घ्यावी व्रतासी।।७२।। मीनावतार शुध्द पंचमी दिनी। भवानी जयंती अष्टमी दिनी। तारा भुवनेश्वरी नवमी दिनी। श्रीराम प्रभु जन्मले कर्क लग्नी।।७३।। सिध्देश्वराचा जन्म चतुर्दशीस सांगती। पौर्णिमेस अवतरले हनुमान मारुती। सूर्य ग्रासाया उड्डाण करिती। हाच जन्म दिन असे श्रीकाशीचा।।७४।। परशुराम जयंती तृतीया वैशाख शुक्ल। करीही दानादिक क्षयरहित। असे हाच कृतारंभ दिन। हीच तृतीया देव पितृ कर्मासी।।७५।। गंगाजन्म वैशाख शुध्द सप्तमीस। नृसिंहजयंती शुक्लचतुर्दशीस। श्रीमद्नृसिंह कृपाप्रसादे करून। अखंड सौभाग्य प्राप्त होई।।७६।। वैशाख शुध्द पौर्णिमा तिथीस। 'कूर्मजयंती' असेच सायान्हकाळास। तसाची 'पुष्करा' चा जन्मदिवस। चतुर्दशीस जन्मली 'ज्वालामुखी"।।७७।। ज्येष्ठ शुध्द प्रतिपदेपासून। 'दशहरा' गंगास्नान। करावे भावे श्रीगंगापूजन। कायिक-वाचिक-मानसिक पापदहन। सर्व पापदोष शमून जाती।।७८।। ज्येष्ठ शुक्लद्वादशी कूर्मजंयती। एकादशीस असे की मत्स्यजयंती। उपोषण देवतार्चन शुध्दचित्ती। पुराण कीर्तनादि आचरावे।।७९।। हरिपूजन करून एकादशी उपवास। पुंडरीक

निर्मितक्षेत्री ज्याचा निवास। त्या ‘श्री विठ्ठलपांडुरंग’ दर्शने मानवास। वांछितार्थ मुक्ती प्राप्त होतसे।।८०।। आषाढ शुद्ध पौर्णिमा तिथी। व्यासगुरु पौर्णिमा जीस म्हणती। याच पौर्णिमेच्या सुमुहुर्ती। कोकीळाव्रत शिवशयनादि उत्सव करावे।।८१।। कल्कीजयंती श्रावण शुध्द षष्ठी सायान्ही। हयग्रीवोत्पत्ती नारळीपौर्णिमा पौर्णिमा दिनी। सीता जन्मदिवस श्रावण सप्तमी। श्रीकृष्ण जयंती कृष्णाष्टमी दिनी। कलीयुगोत्पत्ती कृष्ण त्रयोदशी दिनी। व्रत पिठोरी अमावस्येसी।।८२।। भाद्रपद शुक्ल तृतीया हरितालिका व्रत करती। चतुर्थी असे ती गणेशचतुर्थी। ऋषिपूजन ऋषिपंचमी पंचमी दिनी। पूजिती ज्येष्ठागौरी अष्टमीसी।।८३।। द्वादशी दिनी वामन जयंती आचरती। श्रीभगवान विष्णुरूपी वामने पूजिती। चतुर्दशी दिनी दोरकानंतास पूजिती। षष्ठी तिथी कपिला षष्ठी जयंती। गजगौरी-दुर्गाष्टमी महालक्ष्मी पूजिती। भाद्रपद कृष्णाष्टमी पवित्र ती।।८४।। अश्विनी प्रारंभ होय नवरात्री। पंचमी दिनी उपांग ललितादेवी पूजिती। सप्तमी गरुड जन्म म्हणून वर्णिती। जन्म सरस्वतीचा अष्टमीला।।८५।। दशमीस शारदोत्सव सरस्वती-पूजन। देवतापूजन अन् सीमोल्लंघन। करुनी शमी किंवा आपट्याचे पूजन। करावी साजरी विजयादशमी।।८६।। आश्विन पौर्णिमा कोजागिरी दिनी। ज्येष्ठापत्यास ओवाळावे निरांजनी। लावावे यमदीपासी कृष्ण त्रयोदशी दिनी। चतुर्दशी दिनी नरक-चतुर्दशी।।८७।।

कृष्ण अमावस्या असे दीपावली। करावे लक्ष्मीपूजन सायंकाली। बलिप्रतिपदानंतर यमद्वितीया काली। भगिनी हस्ते भोजन करावे।।८८।। कार्तिक शुक्ल दशमी यमुना जयंती। द्वादशी प्रबोधोत्सव तुलसी विवाह चातुर्मास्य समाप्ती। वैकुण्ठ चतुर्दशीनंतर पौर्णिमा तिथी। असे जयंती कार्तिक स्वामींची।।८९।। मार्गशीर्ष शुक्ल षष्ठी प्रगटले शिवमल्हारी। प्रथम पातले जेजुरीकडे पठारी। मणिमल्ल विनाशार्थ शिवमल्लारी। परित्राणार्थ भक्त साधुंच्या।।९०।। हीच षष्ठी तिथी चंपाषष्ठी तिथी। कोणी हीस स्कंद-जयंती म्हणती। मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशी दिनी। जगद्‌गुरु दत्तात्रेय जाहले।।९१।। माघ शुक्ल चतुर्थी तिथी। ढुंढीराज व्रत जन्मतिथी। सायान्ही सदाशिव पूजन ह्याच तिथी। रथसप्तमी दिनी सूर्यजयंती।।९२।। वद्य चतुर्दशी महाशिवरात्र व्रत। सकल पापनाशक पुण्यकारक। होऊनी चतुर्वर्णादिकी भक्तीयुक्त। या व्रतासी आचरावे।।९३।। फाल्गुन शुध्द पंचमी याज्ञवल्क्य जयंती। सप्तमी कपिलावतार झाला सांगती। पौर्णिमेस जन्मली हुताशनी देवी ती। उत्सव तियेचा करावा।।९४।। ऐसी वर्णिली अगाध हिंदूसंस्कृती। वाहे भार जीवांचा निर्माण करिता पालन ती। मनी ठेवूनी शुद्‌ध भाव आणि मती। करविसी सिद्‌ध हा अमोल जीव।।९५।। गुरुविना नाही ज्ञान विचार। न असे सत्त्वाचे भांडार। जीवाचा होई साक्षात्कार। घेता साक्ष परमगुरुंची।।९६।।

भिऊ नको तू स्वामी बोलती। आहे सदैव मी तुझ्या पाठीशी। हीच शिदोरी घेऊन पाठीशी। जीव तळमळ करितसे।।९७।। हा अध्याय करिता पठन। होई पितरांचे तर्पण। भास दुःखाचा जरी न। सुखाचे करी पालन।।९८।। करी ज्ञानाचे अमूल्य ते संजीवन। करुनी अज्ञानाचे निर्दालन। भेट जीवाची शिवाशी करून। स्वामी करिती पतितपावन।।९९।। पौर्णिमा आणि अमावस्येस। सायंसमयी करिता पठन। भूतादिक दुष्टशक्तिंचा करुनी नाश। शुद्ध करिती स्वामी हे भुवन।।१००।।

असा हा पहिला नमनाध्याय। सांगूनी भक्ती मास रहस्य परम। सकला मंगलाशीर्वाद देऊन। कथिला स्वामी समर्थांनी।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृतवाणी। अखंडीत घट परिपूर्ण ग्रंथातील चिंरजीव। स्वामी समर्थ आशीर्वादातील प्रथमोऽध्यायः।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

## दुसरा अध्याय

# ।। भुवः लोकाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

गुरुशिष्यासी सांगती। ऐक बापा सावध चित्ती। जगन्नाथातील वृत्त यथास्थिती। भुक्तिमुक्तिदायक जे।।१।। एक अलवणीबुवा ब्रह्मचारी। विद्वान विहीत शुद्धाचारी। गीता भागवत अनुष्ठान आचरी। मोठे तपस्वी असती ते।।२।। तीन मनुष्ये बुवांचे संगती। झाली अस्वस्थ बुवांची प्रकृती। तीन मनुष्यांसही ज्वरपीडा पीडती। अस्वस्थ सारी त्या समयी।।३।। धर्मशाळे भीतरी चौघे दुखणेकरी। कोणी आणून न देती सामग्री। स्वकर्मी दंग सारे न कुणी परोपकारी। सारे कपटी दांभिक।।४।। बुवांची विलोकुनी दुरावस्था। दया उपजली जगन्नाथा। येऊनी स्पर्शिती चौघांच्या माथा। खडबडूनी उठले ते।।५।। बोलती हे भगवान् जगदीश्वरा। वृध्द नृसिंह परात्परा। अवधूत श्रीमद्गुरुवरा। भक्ताभिष्टप्रद सद्गुरु।।६।। स्थान पुसती परमहंस। वदती विश्वी अखंड वास। विश्वाधिष्ठान हेचि खास। अभिन्नस्थान

आमुचे।।७।। तेथ एक नवल वर्तले। उत्तम सुशोभित स्थान निर्मिले। नाना पक्वान्न पूरीत अन्न लाभले। चौघे जेवले यथेष्ट।।८।। तेथ एक जन्मांध ब्राह्मण त्यासी। जगदीश्वरा पाहण्याची इच्छा मानसी। म्हणती कृपा करावी मज दीनासी। अहो हृषीकेशी उध्दरावे।।९।। तदा स्वकंठातीलसुपुष्पहार। पुरुषोत्तमे झुगारिला सत्वर। जन्मांधाचीया अंगावर। सहज पडला तेधवा।।१०।। पुष्पमाला तो नेत्री फिरवीत। पाही नृसिंह दत्तावधूत। जन्मांधास झाली दृष्टी प्राप्त। गुणातीत कनवाळू ते सद्‌गुरु।।११।। यापरी नृसिंह स्वामी जगत्पाळे। चौघा आरोग्य देऊनी तृप्त केले। तैसेच गर्भांधासी नेत्र दिधले। जगन्नाथमेळी सहज।।१२।। तव तेथे वृध्द शुद्र एक। दारिद्र्य व्याप्त परमभाविक। येऊनिया श्रीगुरुसन्मुख। साष्टांग दंडवत करितसे।।१३।। समर्थे तया भस्म स्पर्शविता भाळी। पूर्वजन्म स्मृती उद्‌भवली। भार्यासह नमन करी तो तेली। पूर्वजन्मज्ञान त्या उपजले।।१४।। उभयता सद्‌गुरुपदी लोळती। गुरुपद वियोग नसो विनविती। आशीर्वाद देऊनी नृसिंहयति। अंतर्धान पावले।।१५।। अर्पून तनमनधन सेवावे गुरुचरण। वेदशास्त्री विश्वासविहीत आचरण। टाकूनी फलेच्छा कर्म ब्रह्मार्पण। चित्तशुध्द्यर्थ करावे।।१६।। श्रीगुरु प्रवेशले तपस्वी गुहा विवर। तेथे सन्माने तया स्थापिले आसनावर। तपस्वी विनविती जोडोनी द्वयकर। आदरें म्हणती फलाहार करावा।।१७।। तपस्वी विनम्रते विनविती यति।

योगाभ्यास आत्मकाजा केले किती। समाधी निर्विकल्प कोणी न दाविती। परब्रह्म प्रत्यक्ष स्वरूप ते।।१८।। बोलती यति मुख्यत्वे देहाहंकृती। त्यागूनी वासना जड मनोवृत्ती। आपल्यातीलमनोबुध्यादिक वृत्ती। टाकूनी जाणा निर्विकार निजात्मा।।१९।। शास्त्रदृष्टि गुरुवाक्य स्वात्मप्रचिती। स्वात्मानुभवनी विशुध्द सत्त्व अनुभवती। वेद महावाक्यार्थ जन्मज्ञान जाणती। भवबंधरहित जीवनमुक्त होती ते।।२०।। समर्थकृपे बाणली परमाद्वैत समाधी। जन्ममरण जाऊनी नुरे अहं देहबुध्दी। अखंड सच्चित्सुखात होई समाधी। स्वस्वरुपानंद गोडी समरसले तपस्वी।।२१।। तत्त्वबोध श्रवणार्थ व्याघ्र गुहेत येऊनी। असून पंडित पावले तिर्यग् योनी। विद्या धन सत्ता मद अतिदु:ख परिणामी। ऐकूनी लोळती नृसिंह चरणावरी।।२२।। कृपाळू समर्थे ठेविला कर व्याघ्र मस्तकावरी। पावालजन्म अविनाशक्षेत्र काशीपुरी। द्विजकुलवंशी सदाचारी योगी उदरी। न लाभे पुरुषार्थ नृजन्माविण कदाही। नंतर व्याघ्रास वदती नारायण। करावे तपस्व्यांचे मस्तकावघ्राण। पूर्वजन्मीचे थोर पंडित आपण। समाधी व्युत्तान होईल तयांचे।।२३।। तात्कालतपस्वी देह शुध्दिवर आले। मुखमार्जन करून तयांनी स्नान केले। संध्यावंदन पूजादिक सारे आटोपिले। प्रेमे मग पूजिती नृसिंहयति।।२५।। हिमाद्रि पायथ्यासी सन्यासी मौनरूप। षट्त्रिंशती वर्षे आचरी उग्रतप। न होई दत्तदर्शन म्हणून निराश खूप। म्हणे असोच धिक्कार

मजलागी।।२६।। दाविले त्या दत्तात्रेय स्वरूप त्रिगुणात्मक पूर्ण। तपस्वी व्याघ्र समस्त घालती लोटांगण। तपस्वी ओवाळिती आरती आणून। मनोभावे मंत्रपुष्पांजली करती।।२७।। ऐसे परमानंदमय झाले त्रिभुवन। हर्षे पुष्पे वर्षिती देव विमानातून। आनंद उत्साह समारंभी अत्रिनंदन। क्षणातच अंतर्धान पावले।।२८।। अखंड गुरुभक्तीचा संचार। अंगी भरला पूर्ण विचार। नृसिंह सरस्वतींचे चरित्र अपार। गुरु वदती शिष्यासी।।२९।। नृसिंह गुरुवर्य हरिद्वारी। दोन युव मल्ल दृढशरीरी। परस्त्री परधनहारक दुराचारी। असती तेथे द्विजवंशी।।३०।। पुढे प्रारब्ध कर्मसंयोग। मल्लासी रक्तपिती सर्वांग। उद्भवलासे दुःसह महारोग। भोगिती भोग अनिवार।।३१।। उभय उच्चस्वरे मारिती हाका। रामकृष्ण हरि भवानी शंकरा। योगिराज दयासागर ब्रह्मांड पालका। कृपा करा हो आम्हावरी।।३२।। पाहून भयंकर महारोग्यांसी। नृसिंह मुनिवरे कृपा कटाक्षेसी। अंघ्रि कमले द्विज शरीरांसी। स्पर्श केला त्या काळी।।३३।। महारोग्यांचे देहास त्या स्थळी। पादस्पर्श होताची तत्काली। सुवर्णशुध्द दिव्यकांती झाली। निमिषार्धात श्रोते हो।।३४।। खडबडून दोघे मल्ल उठले। समर्थांसी लोटांगण घातले। श्रीगुरुचरणी मस्तक ठेविले। प्रेमानंद दाटला अनिवार।।३५।। वर्णाश्रम पूसे समर्थे विप्र कुटील। समर्थ वदती केले तू अपराध सकल। पूर्वजन्म सुकृत संस्कारे द्विजकुल। लाभले तुज पातक्या।।३६।। हे परिसूनि तो कुटील

द्विज। झाला विस्मित पापी निर्लज्ज। म्हणे जगज्जनका अधोक्षज। उध्दरावे मज पतितासी।।३७।। अनुचित कर्मिष्ठ गोहत्यारी दोषी। तो द्विज क्षणात केला निर्दोषी। प्रत्यक्ष परमात्माच संन्यासवेषी। श्रीमत्परमहंस गुरु प्रकटले।।३८।। कृपादृष्टिने तये पाहता। महारोग्यासी आरोग्य झाले तत्त्वता। अतिपापिष्टासी उद्धरिले आता। निमिषात मृतधेनुसी उठविले।।३९।। सकुटुंब केले गंधाक्षत पुष्पादि पूजन। नैवेद्य धन वस्त्रालंकार अर्पून। भावार्थे ओवाळिती कर्पुर निरांजन। साष्टांग वंदिती जगद्वंद्या।।४०।। समर्थ वदती अमृतवचन। भूतदया सारासार विवेक प्रमाण। ईश्वरोपासन स्ववर्णाश्रमधर्मे वर्तुन। हृदयस्थ जनार्दना ओळखावे।।४१।। प्रख्यात नारायण सरोवर। श्रीकृष्ण त्रिविक्रम क्षेत्र। कच्छदेशी द्वारकेहूनी दूर। मनोहर पवित्र विराजे।।४२।। ते स्थानाधिपती महंत अभिमानी। धन दक्षिणादि घेतल्यावाचूनी। वापीस्नान न करू देती जनालागूनी। ही आमुची वृत्ति तीर्थकर दंड घेतो।।४३।। कामलोभी वितंडबंड नृसिंहमुनी पहात। उड्डाण करून सेवकांसह गगनात। यतिवर्य उतरले वापीत अकस्मात। करिती स्नान निर्भये।।४४।। पाहूनी हे शिष्यासह वृध्द साधु। म्हणती समर्थासी दीनबंधु। क्षमा करावी करुणासिंधु। पापी महदपराधी आम्हासी।।४५।। मग राधाकृष्ण ब्रह्मचारी। उतरला तीर्थोदकाभ्यंतरी। साष्टांग नमने पाय धरी। उठावे म्हणे विश्वेश्वरा।।४६।। नृसिंह यति परमात्मा

दयाळ। पाहूनी अंत:करण तयांचे निर्मल। उदकावरुनी चालत तात्काल। आले मंदिरी सकलांसह।।४७।। सेवूनी पूजा नृसिंह भोजनी बैसून। तेथीलकरी विचार एक अरण्यपंडित। यति आकाशमार्गे उडोनी वापीत। कोणत्या साधने पातले।।४८।। म्हणती यति घोटाळले अंत:करण। तू जाणसी न्याय व्याकरण। आम्ही करितो फक्त भिक्षाटन। सांग काय निराकरण जाहले?।।४९।। विकल्प संशयी तो अरण्यपंडित। ऐकूनी झाला गर्भगळित। मी अहंकारी अविद्या अज्ञान भ्रमित। नोळखली माया अनंत जगद्‌गुरु।।५०।। स्वामी समर्थ योगिंद्रे आज। अपराधी असता मी द्विज। परी आपणासारखे करुनी मज। निजगुज दाविले भक्तवत्सले।।५१।। म्हणे दर्शन होताची कृतार्थता। लाधली मज ब्रह्मानंद स्वरूपता। मम गृही आपण चलावे आता। पवित्र करावे कुटुंब सर्व।।५२।। तत्सदनी पावूनी समर्थ पुसती पंडिता। कोठे आहेत तुझे मातापिता। विप्र वदे ते उभयता। कैलासवासी जाहले।।५३।। नृसिंह वदती पहा घरात। भुजंग होऊनी पाळण्यात। निजलेल्या बालकासी रक्षित। झोके देत ममतेने।।५४।। वासना अपूर्ण राहिली म्हणून। सर्पयोनीत जाहले जनन। वासनाक्षय झाल्यावाचून। सद्‌गती नसे प्राण्यांसी।।५५।। जन म्हणती काष्ठे मारावे यास। तो त्या भुजंगे टाकिला प्रश्वास। बाहेर येऊनी नृसिंह श्रीपादास। नमिले मरण भयास्तव।।५६।। पुसती समर्थ काय इच्छा

मानसी?। तव सर्प विनवी श्रीगुरुसी। नको नको संसारसुख हो मजसी। चरणी ठेवा मज चिर:काल।।५७।। श्रीगुरु कथिती नारायण सरोवर महिमान। नसे अन्य तीर्थ नारायण तीर्थासम। देवाधिदेव इच्छिती या क्षेत्री जन्म। ऐकूनी सरोवरी भुजंग प्रवेशला।।५८।। द्वारका पश्चिमधाम विख्यात। गोमती तीर्थ वाहे अखंडित। अनादिस्थान देवतांसहित। शोभिवंत ते दिसतसे।।५९।। त्या द्वारकावतीत एक योगीपुरुष वसत। अंगावरी रोम दीर्घ असत। भुऱ्याबुवा ब्रह्मात्मविचारी त्या म्हणत। अधिकारी उत्तम मोक्ष मार्गाचा।।६०।। काम क्रोध दंभादि विकार। त्यागूनी अपरिग्रह निरंतर। मधुर मृदु भाषण गंभीर। भुऱ्याबुवा स्थानी नित्य होतसे।।६१।। चिंते मनात तो भुऱ्याबुवा महाराज। दीनानाथ श्री स्वामी समर्थ महाराज। दयासागर स्मरणगामी अधोक्षज। यांचे दर्शने व्हावे मी कृतार्थ।।६२।। त्या काळी भुऱ्याबुवाच्या ध्यानात। श्रीनृसिंह-दत्तावधूत। परमहंस रूपे मूर्तिमंत। आत्मस्वरूप निज दाविती।।६३।। यतिवर कृपाळू तया बोधिती। तत्त्वमसि देह देव अभेदार्थ जाणविती। अर्थ वाक्याचा जाणावा लक्षणावृत्ति। समानाधीकारण एकार्थ विषय तो।।६४।। एवं तत्त्वमसि वाक्यार्थ ज्ञान। प्राप्त करुनी घेती जे सज्जन। तयासी ब्रह्मानंद प्राप्ति होय पूर्ण। आशीर्वचन जाणा हे निश्चये।।६५।। ऐकूनी बोध विसरले देहभान। ब्रह्मानंदी ते झाले निमग्न। जीवन्मुक्त स्थितीसी जाण। पावले गुरुकृपे

भुऱ्याबुवा।।६६।। पहा भुऱ्याबुवासी निरवधी। बाणली अखंड अद्वैत समाधी। सुटल्या संशयादि उपाधी। दर्शन होता योगीश्वराचे।। ६७।। तेथे उभेसे होते जे साधुसंत। ते पाहूनी झाले आश्चर्यभरित। म्हणती प्रत्यक्ष श्रीगुरुदेवदत्त। जाहले प्रसन्न भुऱ्याबुवासी।।६८।। तद्नंतर सांगती नृसिंहमुनी। भुऱ्याबुवासी एक खूण जुनी। श्रीकाशी क्षेत्री जान्हवी तीरी यांची जननी। रखुमाबाई नामे विधवा स्त्री।।६९।। पुन्हा ब्रह्मावर्त प्रसिध्द क्षेत्री। विश्वनाथ ब्राह्मणाचे घरी। यासी दर्शन देऊनी संकट दूरी। केले होते आम्ही जाणा हो।।७०।। रावजीस पटली खूण ओळख। कैसे नोळखिले मी कमलनायक। दत्तावधूत नृसिंहमुनी योगीश्वर। साष्टांग दंडवत घातले।।७१।। क्षमा असावी भगवंता। अपराध्यासी जगन्नाथा। आपुले चरण कमळी आता। अनन्यशरण जाहलो।।७२।। श्रीकृष्ण दत्तात्रेय नृसिंहमुनी। द्वारावतीत भुऱ्याबुवाचे सदनी। साधुवृंदास कृतार्थता अर्पूनी। अंतर्धान पावले।।७३।। शिष्य विनवी गुरुचरणी। धन्य धन्य आपुली तारकवाणी। श्रीगुरु लीला ऐकता श्रवणी। तृप्ती नव्हेची अद्यापि।।७४।। प्रसिध्द काठेवाड प्रांती। सौराष्ट्र देशी गिरनार पर्वती। जुनागढजयासी म्हणती। यात्रेसी जाती सकल जन।।७५।। गिरनार पर्वत विराजमान। श्रीमद्दत्तात्रेय सनातन। त्या प्रभूंचे प्रिय वसतीस्थान। असे प्रख्यात श्रोते हो।।७६।। अशा गिरनार पर्वती। श्रीमद्नृसिंह विश्वपती। गोमुख तिर्थी येऊनी वसती। सर्वभूत प्राणिमात्र

हितास्तव।।७७।। तीर्थ हनुमानधारी स्थानात। वसती विरागी साधू महंत। यतिदर्शनासी जन बहुत। पाहूनी हनुमंता आनंदती।।७८।। त्या स्थानी एक विरागी पांगळा। त्याने योगिश्वर देखले डोळा। नमन करावया उतावळा। झाला परी हालवेना।।७९।। त्यासी नृसिंह म्हणती यावे। त्वा मागे पुढे न अवलोकावे। निर्भय धैर्ये त्वरित उठावे। संशय किमपि करूं नये।।८०।। मग पंगुने नेत्र झाकिले। श्रीमत्परमहंस मनी चिंतीले। म्हणे देवाधिदेवा मज सांभाळिले। पाहिजे आपण समर्थांनी।।८१।। ऐसे वदून पंगू झडकरी। उठून चालला पादचारी। देखती समस्त साधु ब्रह्मचारी। म्हणती काय आश्चर्य हे।।८२।। सारासार सद्विचार सत्संगती। तथा दृढतर प्रेम गुरुभक्ती। येणेच होय परम्पद प्राप्ती। श्रुतिशास्त्र कथिती यदर्थ।।८३।। साक्षात शंकर शंकराचार्य गिरनार पर्वती। श्रीगुरुदत्तात्रेयासी आराधिती। दत्तप्रसादे विजय विख्याती। स्वल्प वयांत त्या लाधले।।८४।। जगदंबिका सहास्य स्वामीस बोले। स्वामी आपण कोठे होता गेले। बहुत दिवसा सगुण ब्रह्म देखिले। श्रीमत्परम्हंस स्वरूपी।।८५।। समर्थ वदती अहो माते। आम्ही संचरतो तीर्थक्षेत्रातें। आलो श्रींच्या दर्शनाते। देवस्थाने विलोकीत।।८६।। असा अभेद ऐक्य शिवशक्ती संवाद। सहजस्थितीचा असे अनुवाद। केवळ स्वानुभव सर्वार्थप्रद। निरपवाद श्रेयस्कर असे हो।।८७।। श्रीमद्नृसिंह गुरुराय। येथे बैसले गिरनारी

दत्तात्रेय। अवलोकूनी धरा पाय। पावन तुम्ही व्हाल तत्कृपे।।८८।। शके सतराशे पंचाहत्तरात। श्रीमद्‌गुरु दत्तावधूत। दर्शने सेवादास योगांतर्गत। रहस्य पावले निःशंक।।८९।। रहस्य हट्‌योगाचे वास्तव। सेवादासासी लाधले सर्व। अंतरी उदेला प्रेमभाव। नम्र झाले सेवादास।।९०।। विमानातून पुष्पे वर्षिती। सुरवर झाले प्रसन्नचित्ती। पुढीलअध्यायी श्रोती। पुढीलकथा परिसावी।।९१।। अमोल आहे तुझे भांडार। घेऊनी कुशी दाखवा व्यापार। चालू खेळ ठेवी परमेश्वर। मातीत या अनुभव सुखदुःखांचा।।९२।। अगाध लीला एकाहूनी एक महान। तुझ्याच चरणी मांडला संसार। तूच रुख्मिणी तूच तो विठ्ठल। तूच भोळा तूच पार्वती।।९३।। होऊनी ब्रह्मा करुनी मायेस पत्नी। परमेश्वर तू मायेत संचार करविसी। पांगळा आंधळा बहिराही असोनी। शमवूनी मायेस पेटवी ज्योत सत्त्वाची।।९४।। कोंडली प्रेमवात हृदय मंदिरात। फडफडूनी ती ब्रह्मास देतसे साद। स्वामी आपण होऊनी गुरुराज । टाकता जाळून या मायेस।।९५।। धारण करुनी हीना अत्तरास। सुगंध दरवळीसी सबंधात। घरात जरी शाप दुष्टक्रियेचा संचार। शमवूनी द्यावा सुखाचा आकार।।९६।। प्रतिपदेस आणि नवमीस करिता अध्याय पठन। जागे होती सकलसात्त्विक गुण। जीवनात अपमृत्यु महामृत्युचा खेळ। नाश करुनी देती जीवा संजीवन।।९७।। प्रभातकाली अथवा सायंकाली। पठण करावे याचे मध्यरात्री।

स्वामी समर्थ प्रसन्न त्यासी। देतील सुखाची खात्री।।९८।। जवळी बाळगूनी वडाचे पान। तारिती सागरास सिध्द नागार्जुन। तद्‌वत मला लाभावे ज्ञान। सद्‌गुरुकृपे स्वामीराया।।९९।। गुरुचरणी मी अनन्यशरण। कृपा त्यांनी आपुली वर्षुन। देऊनी मज अमृतरूपी ज्ञान। व्हावे मज परब्रह्माचे संधान।।१००।।

इति अध्याय दुसरा। श्री सद्‌गुरु चरणी वाहिला। गुरुंनीच तो कथिला। झाला शिष्य कृतार्थ मनी।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृतवाणी। अखंडीत घट परिपूर्ण ग्रंथातील चिरंजीव। स्वामी समर्थ आशीर्वादातीलद्वितीयोऽध्यायः।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

## तिसरा अध्याय

# ।। स्वः लोकाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

कमंडलु तीर्थे प्रतिष्ठित दत्तगिरिनारी। योगीश्वराधीश स्वेच्छाचारी। करुणार्णव त्रिभुवन संचारी। दत्तात्रेय जगद्गुरु।।१।। कलियुगामाजी दत्तदर्शन। जे योगयागादि करिती तपानुष्ठान। टाळ विणा मृदुंग भजन। तयाहि दुर्लभ असे ते।।२।। अंतःकरण असूनी निर्मळ। हरिगुरुचरणी चिरकाळ। असता अनन्यैक भक्ति केवळ। अवश्य होय दर्शन तयांसी।।३।। भक्त प्रतिज्ञा सिध्द्यर्थ। उभे ठेले नृसिंह जगन्नाथ। चंचळ भारतीचे मनोरथ। पूर्ण केले भगवंते।।४।। चंचळ भारतीच्या मस्तकी प्रसन्न। वरदहस्त समर्थे ठेवल्यापासून। तयासी उपजले ज्ञानविज्ञान। श्रीगुरुप्रसादे तात्काळ।।५।। कृष्णगिरी भारतीबुवा। रामपुरी खाकीबुवा। अवघडदास अघोरीबुवा। दत्तदर्शने कृतार्थ झाले।।६।। अध्यात्म विद्याधिगम सज्जनसंग। वासनांचा परित्याग प्राणस्पंद निरोध। ह्या चारी युक्तिरूप उपाय सांग।

चित्त जयासी असती हो।।७।। तस्मात् व्हावयासी मनोजय। क्रमनिग्रहची असे योग्य। अध्यात्मविद्या प्राप्ती उपाय। मुख्यत्वे होये क्रमैक।।८।। म्हणूनी अध्यात्मविद्या प्राप्त। झाल्याने कष्टायासारहित। मनोनिग्रह सुखेनैव होत। ज्ञानरूप उपाये।।९।। परि तत्त्व जाणू न शके आळशी। अथवा विसरे तत्त्व बोधासी। मनोजय होण्या त्या दोघांसी। अवश्य सत्संग करावा त्यांनी।।१०।। विद्या धन मद दुर्वासनेने पीडित। असती जे असम्यक् पुरुष। तयासी वासना परित्याग हेच। साधन तिसरे योग्य असे।।११।। जे असती वासना त्यागार्थ असमर्थ। तिन्ही उपाय जया असती कष्टप्रद। तयासी प्राणरोधन चतुर्थ उपाय। सांगती वसिष्ठ ब्रह्मर्षि।।१२।। स्ववर्णाश्रम निष्कामकर्म धवल। करिता ईश्वरप्रणिधान सर्वकाल। परमेश्वरासी शरण गेल्या निर्मल। मनोजय सहज होतसे।।१३।। ईश्वरानुग्रहावाचून। तथा संतगुरुच्या सेवेवीण। कदा न होय योगसाधन। वेदांत विज्ञान सुनिश्चित।।१४।। चंचळ भारतीच्या मुखे श्रवण। करुनी तोषले साधुजन। म्हणती धन्य गुरुकृपा सघन। भारतीसी ज्ञान जाहले।।१५।। दासोपंत दत्तोपासक। मुकुंदराज महात्मा नामक। सत्पुरुष साधुसंत अनेक। वसती पर्वती आनंदे।।१६।। ऐशा सुस्थान डोंगरात। स्वामीमहाराज विचरत। गोरक्षकांचे मुलांत। बाललीला खेळती।।१७।। त्या गोरक्षकाची कन्या एक। गोष्टी सांगे यतिसमवेत। तयासी नित्य भाकर देत। चरणी तयाच्या लीन

होतसे।।१८।। तिची माता-पितृसह करी विचार। निपुत्रिक श्रीमंत सावकार। तयासी देऊ कन्या मुलगा म्हणोन। सौख्य होईलआपणासी।।१९।। त्यासाठी लेववूनी तिज वस्त्रालंकार। करविला पुरुषवेष धारण। वर्षवूनी गुलालत्या पुत्रावर। ग्रामाबाहेर मंदिरी बैसविले।।२०।। वाजत गाजत त्या पुत्रास आणून। म्हणे हा पुत्र परमसुंदर। केला आपुल्या चरणी सादर। ऐकूनी सावकार संतोषला।।२१।। आलिंगन देऊन घेऊन निजांकावरी। सावकारे स्थापिले त्या गादीवरी। उत्तम भोजनादिक आनंदोत्सव करी। सावकार पतीपत्नी।।२२।। पुत्र वाढला शुक्लपक्षीच्या चंद्रासम। त्याचा विवाह विचार करी सावकार। बोलवूनी तयाने ज्योतिष-मंडळ। विवाहमुहुर्त काढण्या सांगितला।।२३।। सावकाराने ऐकून उत्तम-योग। वधुशोधास्तव प्रेषिला प्रधान सुमंत। गुरुवार मार्गशीर्ष दशमी शुक्ल। करुनी निश्चय आले मंडळ।।२४।। देवता प्रतिष्ठापन सीमंतवरपूजन। वाङ्निश्चय होता आनंदले जन। परि वधुकडीलस्त्रीया पाहूनी वर। म्हणती यास नसती पुरुषावयव। दिसती लक्षण वैभव स्त्रीचे अवयव। हा:हा:कार स्त्रीयांत माजला।।२५।। झाली अपकीर्ति अपमानकारक। प्रारब्धे घडले सारे खेदजनक। उभय पक्ष्यासी होई अत्यंत शोक। म्हणती धिक्कार आम्हासी।।२६।। सावकारे भूपतीसी केले निवेदन। राजाज्ञा झाली व्हावे शिरच्छेदन। त्या मुलासी घेऊनी प्रवेशती निबिडवन। विनवी परी तो मारू नका

हो।।२७।। या डोंगरात संन्यासी बुवा। असे मज आजोबासमान बरवा। तयाचे चरण वंदुनी निरोप घ्यावा। इतकाच हेतू असे मानसी।।२८।। जाऊनी शरण जगत्पितामह स्वामीपायी। म्हणे स्वामी लज्जा मम राखावी। शिरच्छेद माझा होईललवलाही। आजोबा तुम्ही सांभाळा।।२९।। यतिने पाचारिले सावकार ग्रामाधिपती। यावे येथे सर्वांनी शीघ्रगती। पातला सावकार स्थानाप्रति। नृसिंहावतार पाहूनी कापतसे।।३०।। दिली आज्ञा स्वामींनी सकळिका। मुलगा का मुलगी परीक्षा करा का?। पुरुषावय दृढपुरुषत्व तेथे विलोकिता। घालती लोटांगण यतिवर्या।।३१।। सावकारे मग घरी येऊन। व्याह्यासी केले समग्र पत्रलेखन। मार्गशीर्ष वद्य दशमी दिन। केले निश्चित विवाहनिश्चये।।३२।। आशीर्वाद शुभदिनी मंगलाक्षता। वर्षिता वधुवरावरी तत्त्वता। आंनद न माये चित्ता। सुप्रसन्नता झाली सर्वांसी।।३३।। जाती सकलस्वामी दर्शनासी। देऊनी आशीर्वाद स्वामी वदे त्यासी। झाल्यावरी दोन पुत्र यावे भेटीसाठी। शास्त्राचारे आपण वर्तावे।।३४।। परमहंस प्रसादे त्या सावकार पुत्रास। दोन पुत्र झाले जाता वर्ष मास। पाहूनी पुत्रांचे मग षोड्शवर्ष। सावधान झाले परमार्थी।।३५।। असो सर्वांचा घेऊनी निरोप। पातला तो गुरुचरणासमीप। कुलोध्दारक कुलदीप सावकार पुत्र। प्रज्ञापुरी मग येऊनी पातला।।३६।। गोसावी होऊन षण्मास। अनुभवूनी परब्रह्मास। समर्थाज्ञेने तीर्थ यात्रेस। गेला

मग तो गिरनार पर्वती।।३७।। स्वामी लीला ही गुप्तकथा। साद्यंत निवेदिली सर्वथा। गुंफिली अक्षरशः तीच यथार्था। नसे अन्यथा श्रोते हो।।३८।। लीलामृत श्रवणे निर्वेध। पिशाच्च भूतादि सबंध। नष्ट होती अनेक भवबंध। होईलदुरितनिरोध ग्रंथपठने।।३९।। प्रसिध्द दक्षिणदेशी धाम। ज्यासी आहे सेतुबंध रामेश्वर नाम। दक्षिणकाशी असे ही अन्य नाम। पवित्र पापनाशक असे सर्वांसी।।४०।। त्या रामेश्वर ज्योतिर्लिंगाचे पुजारी। पूर्वी ब्राह्मण होते सदाचारी। एक वृध्द पुजारी मृत झाल्यावरी। बलात्कारे शिरले लोक जंगम। ते करू न देती रामेश्वर पूजन। करिती लोभे ते द्रव्यहरण। यात्रेकऱ्यांस अति त्रासवून। गाली प्रदानें अर्पिती।।४१।। परि सर्व लोक एकत्र होऊन। नृपास केले सारे निवेदन। अधिकाऱ्यांनी खरा न्याय करून। अधिकार समर्पिला वासुदेव भटाला।। ४२।। असो ऐशा महान क्षेत्रात। स्वामीराजगुरु अवधूत। एका वृक्षतळी वालुकेत। बैसती स्वच्छंदे सदाचारी।।४३।। अखंड अन्नसत्र तेथे चालती। त्या अन्नछत्रावरी द्विज सुमती। अर्पितो नैवेद्य भावे तयाप्रती। म्हणे जगत्वंद्य स्वीकारा जी।।४४।। त्या विप्राचे वयोवर्ष साठ सवंत्सर। विनवी संतानास्तव यतिवर। पुत्र होईल जाईल परि निग्रह। करी रे ब्राह्मणा इंद्रियांचा।।४५।। यथावकाश झाला प्राप्त पुत्र। जाहला सप्तवर्षीय तो द्विजसुत। न भेटले परि तया महाराज। म्हणती व्हावे दर्शन यतिवरांचे।।४६।। विप्र नित्य ठेवी

वृक्षतळी अन्न। एक पिशाच्च नित्य करी भक्षण। विप्र म्हणे येथे नसती नारायण। नैवेद्य कोण भक्षितसे।।४७।। देवळी यति विप्रपाहे ज्योतिर्लिंग स्थानी। आश्चर्य वाटले बाहेर तेचि पाहूनी। विप्र म्हणे पत्नीस स्वपुत्रा आणूनी। भवतारक पायी घालावे।।४८।। पुत्रास पाचारिती बहुतवार। परिसूनी पुत्र दे प्रत्युत्तर। मला त्या यतिवर्यासमोर। येण्यास भय वाटते।।४९।। मग त्यांनी ओढूनी आणिले तयास। परि पुत्राने झाकीले स्वनेत्र। पुत्र पुष्ट अन् उंच झाला दशहस्त। पाहूनी भयचकीत सर्व ही।।५०।। तो पुत्र म्हणे मला द्यावी मुक्ती। ऐसे विनवूनी योगिराजाप्रती। धाडकन् पडून पृथ्वीवरती। मृत झाला तात्काळ।।५१।। यतिवर म्हणती विप्रा नको शोक। ते झाडावरील पिशाच्च नैवेद्य भक्षक। तोची राक्षस झाला तुमचा लेक। तयासी योनिमुक्त केला हो।।५२।। विप्राचे वय असूनी साठाहून अधिक। परि तया दिधले पुत्रसुख। श्री गुरुलीला सर्वार्थदायक। अगम्य ती असे सर्वांसी।।५३।। श्रीरामेश्वराजवळ कोटीकूप। परि स्नानास द्रव्य मागती खूप। पुजाऱ्यांस घडवूनी पश्चाताप। नृसिंहयतिने मुक्त केले।।५४।। ऐसे योगिश्वर कृपासागर। असती सत्य पूर्णावतार। जगत्कल्याणार्थ करिती संचार। विचित्र लीला ते दाविती।।५५।। मोगलप्रांती राजूर ग्राम शोभिवंत। त्याकाळी लालभारती आदि गुरुसेवक। वाढला तेथे समर्थांचा लौकिक। अवतारी पुरुष म्हणोनी।।५६।। एके समयी त्या राजूराची मंडळी। श्री क्षेत्र

पंढरपुरास गेली। गेले दर्शनार्थ विठ्ठल माऊली। तेव्हा भीमेच्या महापूर उदकावरूनी। दैदीप्यमान नृसिंहयोगिमुनि। चालून येताना देखिले।।५७।। राजूराहुनी कोठे गेले नसून। महापुरावरूनी निर्भये चालून। अकस्मात यतिरुपे जगज्जीवन। पांडुरंग क्षेत्री प्रगटले।।५८।। श्रीगुरु त्रैमूर्ति नृसिंहमुनी। तीर्थक्षेत्रादिकी हिंडूनी। जगदुध्दारार्थ विश्रांती-स्थानी। अक्कलकोटी राहिले।।५९।। अक्कलकोट भूपतीचे उपाध्याय। वेदशास्त्र संपन्न राजमान्य। गिरराव सद्धर्म परायण। त्यांचे तनय रामकृष्ण।।६०।। त्यांच्या मातुश्रींचा वृध्द पिता। भाऊ शेषाद्री नामेंतत्त्वता। त्या भाऊंसी अत्यंत जरा व्यथा। प्राप्त झाली अनिवार।।६१।। पाहूनी भाऊंचे अंतःकरण निर्मळ। अहो भाग्य त्यांचा साधला अंतःकाळ। कृपाळू यतिवर भक्तवत्सल। तच्चरणी प्राण अर्पिले भाऊंनी ।।६२।। पूर्वीचे अक्कलकोटातील। मालोजी महाराजांचे प्रेमळ। दाजी पिराजी भोसले कुशल। होते तेंव्हा मुबांपुरीस।।६३।। त्या दाजी भोसल्यासी फार। स्वामीराज दर्शनाची लागली हुरहुर। म्हणे मी श्रीचरणापासून दूर। परदेशी पडलो दुर्भाग्ये।।६४।। तयासी प्रत्यक्ष देऊन दर्शन। शांत केले तयाचे अंतःकरण। सांभाळीले ब्रीद ‘पतितपावन’। भक्ताप्रीत्यर्थ श्रीप्रभुंनी।।६५।। अक्कलकोटापासून दीड कोसावर। टेकडीवर रहात होता फकीर। तयाच्या जागेत त्रैमूर्तिअवतार। नृसिंहमुनीश्वर पातले।।६६।। ते दिवशी सायंकाळपर्यंत। तेथेची बैसले श्रीमद्दत्तावधूत।

सर्व लोक झाले क्षुधार्त। मागती भोजन गुरुनाथा।।६७।। सांगती स्वामी समर्थ सकला। चुर्मालाडू यथेष्ट भोजनाला। मिळतील म्हणता हैद्राबादेचा श्रीमंत आला। जावळ काढावया स्वपुत्राचे।।६८।। जहागिरदाराने त्या समाराधना करून। तांबुल दानदक्षिणा अर्पून। तीन दिन रोजी पंचपक्वान्न। घातले भोजन यथेष्ट।।६९।। मार्गी उठवूनी मृत वृषभाला। पातले स्वामी अक्कलकोटाला। तेव्हा लोहगावच्या बापू कुलकर्ण्याला। कंठास छीद्र पडले होते।।७०।। मग सद्‌गुरुनाथ दत्तात्रेय। बापू विप्रे पुजिले जगत्प्रिय। तदा कंठछिद्र व्यथा गेली अमय। प्रकृती उत्तम जहाली।।७१।। दत्तात्रेय प्रसादे कवित्व कुशल। बापू कुलकर्णी लोक विश्रुत निर्मळ। दासबापू या नामें प्रसिध्द सर्वकाळ। संत पदवीस पावले।।७२।। शके सतराशे सत्तावन्न वर्षाऋतुत। श्रावणमासी मंगळवेढ्यात। दामाजी पंतांचे समाधीपाशी अवधूत। प्रथम येऊनी बैसले।।७३।। तेथे कृष्णभट कापशीकर विद्वान। अवतारिक दिसता हो करुणाघन। आमचे सदनी चलावे हो भक्तप्रिय। यतिवरासी पार्थितसे।।७४।। विप्र सदनासी आले गुरुवर। समर्थास द्यावा की फलाहार। पत्नी वदे नसती गृही तण्डुलकण। काय करावे या समयासी?।।७५।। गुरु वदती द्यावी दुधाची दशमी। परि नसे गृही पयही समयी। सती घरोघरी फिरे दुधासाठी। परि दुध तिज न मिळे।।७६।। स्वामी वदती घरात असता ही गाय। दुधासाठी का फिरता

धायधाय। विप्र म्हणे आटली असेही गाय। तरी आता कैचे दुग्ध दही।।७७।। समर्थ वदती गोमातेचे दोहन करा। स्तनस्पर्शेची फुटला पान्हा झरझरा। पात्रांतरी गर्जती क्षीरधारा। असे अगम्य सद्‌गुरुलीला।।७८।। शुद्र स्त्री जना मंगळवेढ्याची निवासी। नियमित ती जातसे वारीसी। विठ्ठल दर्शन जागीच घडवूनी तियेसी। दिले तिज शुध्द ब्रह्मज्ञान।।७९।। मंगळवेढ्याचा बसाप्पा नामें तेली। त्याने कंटकावर गुरुमूर्ति देखिली। सिद्‌धपुरुष हा साधुपुरुष कोणीतरी। लागला नादी तयाचे।।८०।। बसाप्पा घरी दारिद्र्य फार। पत्नी चालवी कसातरी संसार। समर्थासी येऊनी दया अपार। दारिद्र्य त्याचे विनाशिले।।८१।। मंगळवेढ्याचा एक तंतुवाय कोणी। तयासी स्वप्नी दृष्टांत देऊनी। दिले तयासी प्राप्त करवूनी। धन साठविलेले त्याच्या पित्याचे।।८२।। तैसेच एका शुद्राचे पंचाहत्तर वयोमान। दु:खी असे फार नसे पुत्र संतान। तयासी या वयात पुत्र देऊनी। केले संतुष्ट गुरुराये।।८३।। ऐसेच कृपा केली बाबू भट्टावरी। कूप तयाचा भरून मधुर निरी। आश्चर्य वाटले सर्वास भारी। म्हणती अलौकिक समर्थ वरदमूर्ति।।८४।। पंढरी बेगमपूर चळंबे ग्रामी। रामदासीबुवांचे मठात गुरुमाऊली। सामर्थ्य दाखवूनी योगिराज माऊली। गलिताहंकार करिती रामदासीबुवा ते।।८५।। चोखामेळ्यातील एक अंत्यज। दिगंबरकृपे पावला साधुत्व सहज। दुसरा उध्दरीला भ्रष्ट द्विज। तिसरा म्लेंच्छ सिद्‌ध

झाला।।८६।। मोहोळग्रामी पातले मग योगिराज। मधुर असे चरित्र कथाभाग। श्रीगुरुदेव स्वामीमहाराज। चार-सहा मास सहज। मोहोळ ग्रामी ते अधोक्षज। जगदुध्दारार्थ वसत होते।।८७।। मोहोळ ग्रामी द्विज गृहस्थ एक। नि:पक्षपाती नि:स्पृही सम्यक। तयाचा पुत्र एकुलता एक। वायुप्रकोपे तो झाला मुर्च्छित। जन म्हणती ग्रामी फिरे यति एक। तया दाखवावे होईल गुण।।८८।। मग चहुकडे सर्वत्र धुंडिती। तथापि तो न सापडे यति। तेव्हा एक स्त्री सौभाग्यवती। म्हणते दावते चला हो।।८९।। निघाले सारे समवेत सौभाग्यवती। गुहेसी येऊनी विनविती त्या यति। देऊन संजीवन मम पुत्रासी। दीनजना आम्हा सांभाळावे।।९०।। अंतर्साक्षी त्रिकालज्ञानी कळवळले। चिरंजीवा अश्वावर बैसविण्यास सांगितले। हर्षभरित ती सौभाग्यवती वदे। श्रीगुरु संयोगे सुखी व्हाल।।९१।। मुलासी शीघ्र वाटला आराम। श्वास निघाला जिरला घाम। सर्वजनांसी वाटले आश्चर्य परम। जयजयकार सर्वत्र वर्तला।।९२।। राजयोगी गवे स्वामींनी योगाभ्यास सोडून। दत्तात्रेय स्वामींच्या कृपेकरून। संपादिले अपरोक्ष ब्रह्मज्ञान। स्वस्वरूपे अखंड अभिन्नत्वे।।९३।। मोहोळ ग्रामीचा एक भक्त शिल्पकार। मल्हारी मार्तंडाचे इच्छी दर्शन। तयासाठी स्वत: शिवमल्लारीरूप धरून। पावन केले त्या क्षणमात्रे।।९४।। अमानुष कृत्य अवतारिक। परम्पुरुष परमात्मा अलौकिक। आपणची अनंत कोटी-ब्रह्मांडनायक। सुखदायक

सर्वांसी।।९५।। आम्ही अज्ञानी संसारी मंदमती। नोळखू प्रत्यक्ष परमेश्वर विभूती। तथापि श्रीदत्तात्रेय गुरु वरदमूर्ती। कृतकार्य झालो निजकृपे।।९६।। जसा गुंफलामणि रेशमी सूत्रात। होई ओवी अमृतवाणी सुरेखरत्न। करिता पठन धावन करिसी रत्न। नष्ट होतीलबाधा सर्व।।९७।। द्वितीया दशमी करुनी शंकरालंकार। पठता अध्याय होई माया लाचार। पिशाच्च यक्षादि बाधा विकार। सोडवूनी सारे ठेविसी सुखात।।९८।। भक्तासाठी तू येऊन प्रत्यक्ष। भक्षक जेवी धावे धरण्याभक्ष्य। तेवी आत्मा होई परमात्म्याचे लक्ष्य। जाते सारी माया निरसूनी।।९९।। उभे राहती स्वामी पतितपावन। करावया सदा भक्तांचे रक्षण। करिती ते स्वत:भक्तांचे पालन। 'निश्चिंत तुम्ही व्हा' सांगताती।।१००।।

मनो निग्रहे ईश्वरी आराधना। त्यासाठी चतुष्टय साधना। सांगुनी परि गुरुलीला महिमा। गोड शेवट हा तिसऱ्या अध्यायाचा।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृत वाणी । अखंडीत घट परिपूर्ण ग्रंथातील चिरंजीव । स्वामी समर्थ आशीर्वादातील तृतीयोऽध्याय:।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

चवथा अध्याय

## ।। महःलोकाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

गुरुलीलामृत मधुर गोडी। चाखिती श्रवणी जे आवडी। तेची साधिती स्वार्थ-परमार्थ जोडी। परमपद पुरुषार्थ।।१।। मनुष्यदेह अशुची मांसमय। आत्मा परिशुध्द पुण्यज्ञानमय। कुमार पौगंड तारुण्य वृध्द। अवस्था असती देहाच्या।।२।। प्राप्त आपणा झाला सुदुर्लभ नृजन्म। जडवृत्ती साक्षित्वे जाणून चिद्‌घन। अधिष्ठान आत्मा तोची आपण। कार्यकारण सत्य ते जाणावे।।३।। नाना विकल्पसहित मनोवृत्ति। बुध्दिचे विकल्प अनेक असती। बुध्दिवृत्तिहून भिन्न आत्मनिश्चिती। चिदानंदघन जाणीजे साक्षी रूपें।।४।। मुक्तमालिकेत सूत्र तैसा बुध्दिवृत्तिचे मधी। आणि बुध्दिवृत्तिचे अखिलसंधी। त्या संधी माजी निरवधी। कूटस्थात्मानुभव स्पष्ट होतसे।।५।। त्या अखिलसंधीवृत्तीच्या अभावास। उघड प्रकाशिता आत्मा निराभास। निर्विकार कूटस्थ शुध्द अनुभवास। येतसे निःसंशय स्पष्टत्वे।।६।।

बुध्दिवृत्तिरूप पूर्वविकल्प नष्ट झाला। जोपर्यंत दुजा विकल्प नसे प्रकटला। तोपर्यंत शुध्दात्मा स्पष्ट प्रकाशला। तत् पद लक्ष्य स्वरूप।।७।। ऐसा ब्रह्मात्म्याचा स्पष्टानुभव। शुध्दान्तःकरणी मुमुक्षु वास्तव। जया प्राप्त व्हावा ऐशी शुभेच्छा सदैव। तयी प्रयत्नें अभ्यास करावा।।८।। त्या स्वात्मप्रीत्यर्थ खटाटोप भयंकर। त्यजुनि दृढाभ्यास करावा निरंतर। याच देही आत्महित साधुनी सत्वर। परमानंदी सुखी व्हावे।।९।। पश्चातापें जीव श्रीगुरुचरणाश्रयीं। जेव्हा विकल्प भ्रम टाकूनी देई। तेव्हा तोचि जीव ज्ञानोपदेश समयीं। अहं ब्रह्मानुभव घेतसे।।१०।। 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्यार्थ पंक्तीत। भाग त्याग लक्षणाने 'सोऽयं देवदत्त'। वाच्यार्थ टाकूनी लक्ष्यार्थ घेत। उपाधिरहित जीव हा।।११।। ऐशी जीवासी ब्रह्मसायुज्यता। एकची श्रीगुरुस्वामीराज प्रदाता। ते एकसमयी सोलापुरी असता। वर्तली कथा ती परिसावी।।१२।। योगाधीश्वर सोलापुरी। स्थित सुभारावाचे देवमंदिरी। सायंकाळी तेथे नरनारी। दर्शनार्थ येती देवाच्या।।१३।। देवाच्या दक्षिणेस श्रीमत्परम्हंस। स्वेच्छाचारे करिती विनोद हास। खेळती खडे फिरवूनी मुखास। तेजस्वी मनोहर दिव्यमूर्ती।।१४।। त्या पाहूनी चिंतोपंत टोळ विचार करी। कोणत्या पंथाचे यति ब्रह्मचारी। वदती जाणुनी तयाचा भाव अंतरी। वेदान्त विज्ञान-सुनिश्चितार्थ जाणा हो।।१५।। त्या दिवसापासून चिंतोपंत। स्वामीचरणांचे झाले भक्त। दाविती

चिंतोपंतासी चमत्कार अनेक। निस्सिम स्वामीभक्त टोळ।।१६।। सोलापुरी कोरडे श्रीसिध्देश्वर सरोवर। उदकास्तव लोक प्रार्थिती चिंतातूर। मग कळवळुनी दयार्णव यतिश्वर। सहज चमत्कार दाविती।।१७।। सरोवरी स्वामी करती लघुशंका एक घटी। दुसरे दिनी झाली विपुल पर्जन्यवृष्टि। तेव्हापासूनी जल सिध्देश्वर तडागी। गेले सारे दैन्य यतिश्वर कृपे।।१८।। सोलापुरी मुकुंद नामे ब्राह्मण। सदाचारी राजसेवा निष्ठ नीतिमान। सोडवावे मज संसारातून। श्रीगुरु समर्थासी विनवितसे।।१९।। चारही पुरुषार्थांचा दाता। त्या सद्‌गुरुनाथाची कृपा होता। आपणासारीखे करिती तत्त्वता। क्षण न लागता मुकुंदासी।।२०।। दिव्य समदृष्टि विश्वात्मस्थिती अनुभवून। मुकुंदबुवा धरितसे दृढमौनपूर्ण। तो मौनीबुवा कासारी करितसे स्नान। राजदूत तया ताडने पीडिती।।२१।। मौनीबुवासी त्यांनी छळीले। खोलीत कोंडून कुलुप लावीले। तडाग स्नानकरिता त्या देखिले। म्हणती सारे नवल कैसे?।।२२।। असो, सोलापुरी असता स्वामीराय। दर्शना येतसे लोक समुदाय। नंतर प्रज्ञापुरी येऊन निवास। करिती योगिराज स्वच्छंदे।।२३।। यतींद्रासी रामा रंगारी पुसत। येथे आपले कोण गण गोत?। समर्थ वदती द्विज एक पेठेत। चोळा असे नाम त्याचे।।२४।। वदती त्या अक्षय वटवृक्षींचा विहार। विसरलासी मूळपुरुष दत्तनगर। ऐकून उमजला चोळा पूर्व समाचार। साष्टांग नमस्कार करितसे।।२५।। असो

समर्थांची अखंड कीर्ती। विस्तारली मंगलशुभदा जगती। मालोजी नृपतीची विशेष जडली भक्ती। परिवारासह प्रभूपदी।।२६।। भूपती भोसल्यांचे उत्तम कुल। त्याहीवरी शूर उदार धर्मशील। अक्कलकोटचे अहोभाग्य निर्मल। पूर्णब्रह्म केवळ प्रगटले।।२७।। अक्कलशब्दाचा अर्थ करा श्रवण। बुध्दिमति प्रज्ञा उपदेश। 'कोट' चा अर्थ तटबंदी विशेष। बुध्दि कोशादिक जे।।२८।। ऐशा विज्ञानरूप अक्कलकोटांत। स्वामी समर्थ श्रीगुरुदेवदत्त। निरुपाधिक नांदे सर्व विकाररहित। निर्विकल्प अखंड स्वसत्ते।।२९।। अक्कलकोटा समीप आणि दूर। तीर्थक्षेत्रे असती अपार। साधुसंत माहात्मे पुण्यभूमीत निरंतर। वसले वसती वसतील।।३०।। बुध्दिस्थ असूनी जड बुध्द्यादिकांचे विकार। कधी न स्पर्शिती म्हणून निर्विकार। ते अक्कलकोट निवासी परमगुरु परात्पर। दत्तदिगंबर स्वामीराय।।३१।। म्हणती चोळाप्पासी देऊन आलिंगन। येथे चालवावया सद्‌धर्माचरण। आणि तुझे फेडावया ऋण। आलो जाण चौलभक्ता।।३२।। त्यावर्षी नव्हता पर्जन्य। अन्नोदकाचे असे विशेष दैन्य। ग्रामी प्रवेशलिया यतींद्र धन्य। वर्षले पुष्कळ मेघोदक।।३३।। राधाबाई चोळाप्पाची सासू। आणि चोळ पत्नी बाई येसू। सोवळ्याची करिती धुसूधुसू। यतिश्वरा कारणें।।३४।। तथापि सद्‌गुरुचरणी प्रेम अवीट। चोळाप्पाचे वाढले अदंभ निष्कपट। बाबा सबनीस नित्य नेमें निकट।

सेवेसी वसतसे भक्तियुक्त।।३५।। यतिश्वर वदती राधा येसूबाई। स्वयंपाक करा हो लवलाही। तंदुलडाळ पिष्ट नसती पाकगृही। लज्जित म्हणती धिक्कार असो।।३६।। यतिवर्य बोलती पाकगृही पाही। अन्नाने पात्रे असती भरली। मग सर्व आनंदे जेविली। अशक्य लीला वर्णिण्या स्वामींची।।३७।। दाजीबांनी राजाज्ञा मानुनी वंद्य। चौलगृही स्वामीरायासी नित्य नैवेद्य। सुव्यवस्थित चालू करविला सद्य। अबाधित निभेलऐसा।।३८।। धीपुरात त्या हृषिकेशी। फिरती यति पंचक्रोशी। सेवकजनांसह एके दिवशी। अवलोकिती निवडुंगा।।३९।। चोळाप्पा अन् यती अनवाणी। अतिशय कंटकमार्ग नागफणी। त्या कंटकावरूनी यति शिरोमणी। अर्धक्षणात सहज गेले।।४०।। ज्यांच्या कृपे चोळा सद्भक्त। अपार कंटकावरून गेला क्षणात। पुण्यवान भोळा शुद्ध संत। मोक्षाधिकारी जाहला।।४१।। स्वामीराजांच्या आज्ञेनुसार। श्रीपादगुरुसेवेत ठेवला तत्पर। चोळाप्पाने थोडे दिवसानंतर। कन्या अर्पिली श्रीपादा।।४२।। ज्यांची अमानुषलीला अपार। ऐसे स्वामीसमर्थ दत्तदिगंबर। तयांच्या लीलामृत प्राशने निरंतर। सकल नारीनर सुखी होती।।४३।। देवांचे पितळी मुखवटे। देव्हाऱ्यातून काढून नित्य यतिवर्य। त्या पोकळ मुखवट्यात घालून धान्य। वारंवार मोजिती।।४४।। एक द्विज नृसिंहवाडीचा। त्यासी पोटशूल व्याधीने पीडा। अनेक औषधोपचार दोरे गंडा। आरोग्यार्थ विप्रे केले।।४५।। तो

गुरुचरित्र पारायण करी विध्युक्त। त्यासी नृसिंहयतिवर सांगत। कार्या प्रीत्यर्थ धीपुरी त्व जावे सत्वर। कल्याण आम्हीच करतो यति वेषे।।४६।। पातला चोळाप्पा सदनी अश्वावर। खेळत बैसले होते दिगंबर। अश्व तेव्हा अटकला द्वारांत प्रहर। लोक चमत्कार विलोकिती।।४७।। मग सदनातूनी वदती मृत्युंजय। दृष्टांताचे पेढे भुललासी काय?। ते आणल्या वाचून तुझा हय। हलणार नाही सर्वथा।।४८।। विप्रे घालुनी साष्टांग नमन। क्षमा करा म्हणे पेढे आणवून। पाहता वळून ते जगज्जीवन। सरकले घोडे ते मागल्यामागे।।४९।। विप्र अनन्यशरण झाला। समर्थांच्या करस्पर्शे विप्रोदर व्यथा। क्षणात नष्ट झाली सर्वथा। गुरुलीला किती हो वर्णाव्या।।५०।। व्याकरणाविना विभक्ती। सद्भावविरहीत भक्ती। ज्ञानावाचून कैवल्यमुक्ती कदा कोणासी उमजेना।।५१।। सद्गुरुवाचूनी परमागती। न घडे कोणासही कल्पांती। ऐसे वेदशास्त्र पुराणादि सांगती। महात्मा संत योग्यादिक।।५२।। श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ आचरवान पुरुष। तोचि सद्गुरु जाणावा विशेष। त्या वाचूनी परबह्म निर्विशेष। बोधील कोण सविशेषे।।५३।। गुरु परमेश्वर भक्तिपरायण। साक्षात्कारी अध्यात्मज्ञान-निपुण। निराभिमानी नित्य-सदाचरण। सर्व भूती लीन झाला जो।।५४।। चातुर्य शुध्द विवेकपूर्ण। सर्वदा निर्मल ज्याचे अंत:करण। रसिक प्रेमळ सत्य संभाषण। तयासी गुरुत्त्व शोभते।।५५।। गुरु हेचि परमतीर्थोदक।

अवघी इतर तीर्थे निरर्थक। संपूर्ण तीर्थांचे तीर्थोदक। गुरुचरणी अखंड तिष्ठतसे।।५६।। ऐसे पार्वतीस कैलासनायक। गुरुगीता निजरहस्य एकांतिक। बोधिती निर्भये परमानंददायक। परमात्मागुरु सदाशिव ते।।५७।। श्रीगुरु स्वामी समर्थकृपा। तेणे चुकती मरण खेपा। त्या प्रभुवाचूनी त्रिविध संसार तापा। कोण दूर करील?।।५८।। कल्याणवासी मनोहर नाईके भावे करून। पुत्रास्तव केले दत्तात्रेय-आराधन। तेणे दत्तावधूत प्रसन्न होऊन। देऊनी तयासी प्रत्यक्ष दर्शन। म्हणती आम्ही तव पोटी अवतरतो।।५९।। नाम तयाचे ठेविले माणिक। बाल्यावस्थेपासून तो प्रामाणिक। त्याचे केले मौंजी बंधन। परि गायत्रीमंत्र उच्चारीना।।६०।। जगद्‌हितार्थ पाहिजे लोकसंग्रह। ऐसा मानसी करुनी विचार। मातृभिक्षाकाली वेदमंत्र वारंवार। सार्थ गायत्रीसह गातसे।।६१।। पुढे शिष्यासह मंठाळ सोडून। मैलारास माणिक जाऊन। चंपाषष्ठीचा उत्सव ब्राह्मणभोजन। शिवमल्लारींचे करविती।।६२।। पहाडगाव राजूरी पंढरपूर। मंगळवेढे बेदर आणि स्थाने इतर। मुधोळ संस्थानात मासद्वय संचार। करिती परोपकारी माणिक।।६३।। उत्तम मार्गशीर्ष मासांत। दत्तगुरुंचे गादीस्थान झाले स्थापित। बसविला सुंदर ग्राम त्यात। माणिकनगर नावाचा।।६४।। निर्वैर निर्द्वेष हिंदू आणि यवन। माणिक प्रभुंचे करिती सेवन। सत्कीर्ती पसरली असंख्यजन। द्रव्य वेचून येती दर्शना।।६५।। एका सायंकाळी दिव्य तेज:पुंज।

संन्यासी पुराण शाश्वत अज। अपूर्व असे योगिराज। यतिश्वर तेथे प्रगटले।।६६।। प्रणिपात त्या करुनी माणिक बोलती। बाबा सबनीस ब्राह्मणाप्रति। हे भवतारक सद्‌गुरु जगत्पति। यतियुथ स्वामी जाणावे।।६७।। थोडे दिवसांत अक्कलकोटी। ब्रह्मांडनायक अनंतकोटी। विराजतील जगदुध्दरणासाठी। पूर्ण करतील मनोरथा।।६८।। दुसरे दिनी द्वय संन्यासी घेऊन। योगिराज अवधूत निरंजन। माणिकप्रभूंचा निरोप विचारून। गेले स्वेच्छाचारी ते।।६९।। असो इकडे माणिकनगरांत। सकल योगैश्वर्य झाले प्राप्त। त्याकाळी मध्यायु अवस्थेत। होते शोभत माणिकप्रभू।।७०।। गुरुदत्तात्रेय स्वामी दिगंबर। अक्कलकोटी प्रकटल्यावर। सत्कीर्ति प्रकाशली सविस्तर। अपार अगम्य अलौकिक।।७१।। मग संतोषे माणिकप्रभुंनी। मार्गशीर्ष शुक्ल दशमी शुभदिनी। विद्वान वैदिक ब्राह्मण पाचारूनी। सन्यास-दिक्षा घेतली।।७२।। दुसरे दिवशी एकादशीस। माणिक समाधिस्थ झाले निजानंदास। पारची नाही त्या वियोग दुःखास। अवतारिक सिध्द पुरुषाच्या।।७३।। शिष्य गुरु वक्त्यासी विनवी। पट्टशिष्य लक्षणे पारमार्थिक बरवी। संक्षेपे कथिली ती सांगावी। विस्तारपूर्वक मजलागी।।७४।। म्हणती गुरु वेदाध्ययनपूर्वक। श्रुत्यर्थ संपन्न श्रोत्रिय म्हणावा सम्यक सर्व कर्मफलेच्छा त्यागपूर्वक। परब्रह्मस्वरूपी निष्ठा असूनी। ब्रह्मद्वितीय स्वरूपी केवळ। अभेद साक्षात्कार निश्चल। महावाक्यार्थ

जनित सोज्वळ। स्वात्मानुभव झालेला।।७५।। तोचि श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ। श्रुतिशास्त्र वर्णिती ब्रह्मवरिष्ठ। विजितेंद्रिय निस्पृह एकनिष्ठ। कामक्रोध वर्जित असा।।७६।। ब्रह्मविद्या संपन्न सदाचारी। निराभिमानी जो निर्विकारी। हरिगुरुभक्त परोपकारी। तोचि पट्टशिष्य बोलिजे।।७७।। कर्नाटक प्रांती मुरगोड ग्राम। मल्हार दीक्षित नामें ब्राह्मण। त्यासी नव्हते पुत्रसंतान। म्हणे अनुष्ठान कोठे करावे?।।७८।। श्रीरामेश्वर समीप सुंदर। आहे चिदंबरेश्वराचे मंदिर। विप्रे तेथे जाऊनी प्रखर। तपश्चर्या आरंभिली।।७९।। दीक्षितांचे पाहून शुध्द अंतःकरण। प्रत्यक्ष झाला ईश्वर आपण। वदे तुझे स्त्रीचे उदरी जाण। येतो मीच पुत्र होऊनी।।८०।। मल्हार दीक्षितास झाले पुत्ररत्न। पुत्राचे कर्णी बिल्वपत्र पाहून। हाची शिव असे ओळखून। चिदंबर ऐसे नाव ठेविले।।८१।। करून पुत्राचे मौंजीबंधन। करविती चिदंबरास वेदाध्ययन। वेदवेदांगार्थ संपन्न होऊन। चतुर्वेदमंत्र तो पढतसे।।८२।। बालपणी मृत्तिकेचा गज चालवला। देखूनी आश्चर्य सकल जनांना। पिता वदती प्रेमळ पुत्राला। अवतार कृत्य कारण प्रसंगी प्रकट व्हावे।।८३।। मल्हार दीक्षिते सुमुहूर्तावरी। कुलशील योग्य कन्या पाहूनी। पुत्रविवाह करविला शास्त्राचारी। स्वर्गस्थ झाले मल्हार दीक्षित।।८४।। मल्हार दीक्षितांच्या निधनानंतर। यज्ञयाग करू लागले चिदंबर। देवता दर्शन अनेक चमत्कार। चिदंबरलीले होतसे।।८५।।

यज्ञादि कर्मकांड चालावे यास्तव। म्हणूनी कळवळला सदाशिव। त्या परमेश्वरे अवतार स्वयमेव। चिदंबररूपे धरियला।।८६।। एकदा चालला यज्ञ समारंभ। घृत संपले झाला बोभाट। गंगानिरास करुनी घृत। चिदंबरे लीला दाखविली ।।८७।। चिदंबर दीक्षितांच्या यज्ञात। आम्ही वाढीत होतो घृत। ऐसे स्वामी समर्थ स्वत: सांगत। होते प्रियजनांसी।।८८।। यज्ञयाग चालती यथोचित। चिदंबर दीक्षितांची कीर्ति महंत। यज्ञात मृत विप्रही केला जिवंत। लीला दाविती अनंत।।८९।। ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शुद्र जाती। परमात्माचे ठायी मुळीच नसती। ब्रह्मचर्य गृहस्थ वानप्रस्थ यति। हे चारही आश्रमही नसती।।९०।। संसार हा या परमात्म्याचे ठायी। कोणतेही काली असत नाही। ऐसे कार्यसह अज्ञान विरहीत पाही। वास्तव अद्वितीय परब्रह्म।।९१।। ऐसा परमात्मा समीप असून। न भेटे मनोनिग्रहावाचून। मनोनिग्रह वासना क्षीण। झाल्यावरीच प्रगटे तो।।९२।। पूर्वपुण्ये ते मन मुमुक्षुचे। त्या अमनस भावासी प्राप्त होते साचे। मग निर्विकल्प समाधीत ब्रह्माचे। स्वरूपास पावे अधिकारी।।९३।। सद्‌गुरुच्या उपदेशावाचून। त्या समाधीची प्राप्ती नाही जाण। म्हणूनी वेदांत योगविद्‌गुरुसी शरण। जाऊनी स्वहित संपादावे।।९४।। ऋषिमुनी योगी महात्मा संत अनेक। मनोजय करून पारमार्थिक। झाले होते पुरुषार्थी आवश्यक। अभ्यास वैराग्ययुक्त जे।।९५।। यास्तव गुरुशास्त्रांच्या उपदेशे। मनोनिग्रह अवश्य सिध्द

होतसे। अनुद्वेग दृढोत्साहची कारण असे। मनोनिग्रहार्थ सर्वांसी।।९६।। ज्या पुरुषाचे मन विषय वासना। त्यागूनी शांतीस पावली नाही जाणा। त्याचे दान तप शौच तीर्थादिक नाना। सर्वही कर्म निष्फळ।।९७।। इह परलोकी मिळणारे शुभफल। मन निरोधेची प्राप्त होय सकल। म्हणून मनोनिग्रह मोक्षार्थ निर्मल। अवश्य चिरकाल करावा।।९८।। सोम सूर्य करिती सृष्टीचे पालन। होऊनी दिगंबर करती विश्वाचे संभारण। दुर्धन दुर्विकल्प दुराचार लंपटपण हे दुर्गुण। नाश करविती करिता अध्याय पठन।।९९।। तृतीया एकादशीस करुनी लंघन। होऊनी पूर्वाभिमुख मांडून सुखासन। मनसामनी स्मरोनी सद्‌गुरु चरण। करिता पठन दूर करिल मायेस।।१००।।

सिध्देश्वर तलावी भरूनी नीर। जल दुर्भिक्ष करुनी दूर। अक्कलकोटी पातले गुरुवर। झाली सांगता चतुर्थाध्यायाची।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृतवाणी। अखंडीत घट परिपूर्ण ग्रंथातील चिरंजीव। स्वामी समर्थ आशीर्वादातीलचतुर्थोऽध्याय:।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

पाचवा अध्याय

## ।। जनःलोकाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

गुरु सांगती सत्‌शिष्याला। अपार अनंत श्रीगुरुलीला। श्रवणे पठने सकलजीवाला। संपूर्ण लाभप्रद होतसे।।१।। परित्यागुनी सद्‌गुरु जनकासी। तीर्थक्षेत्री कां हो हिंडता काशी?। योगांगव्रत तपादि करणे परिश्रमासी। मोक्षसिध्दिसी ही निरुपयोगी।।२।। गुरु अज्ञाननिद्रेतून करिती जागे। शेत पिकवावे आणि खावे। नृजन्मी येऊनी आळसे उगे। आयुष्य वाया घालवू नका।।३।। प्रयत्नवान् जे जे पुरुष। ते पाताळातूनी आणतीलशेष। प्रयत्ने परबह्म विद्या निर्विशेष। हृदयी विशेष आकळती।।४।। देवादागतं देवानामिदं दैवम्। विधि नियती भागधेय प्रारब्धम्। दैवची प्राधान्य बलवान। दैवगती भोगणे न चुके कदा।।५।। जन्मांतरीची जी शुभाशुभ कर्मे। हीच उदया येती दैव नामें। ते संचित-क्रियमाण-दैव त्रयकर्मे। त्रिविध प्रकारे जाणिजे।।६।। दैवसंस्कार असे प्रबळ। तरीच प्रयत्न होतसे

सफल। दोन्हीचे वास्तविक वर्म केवळ। तत्त्वज्ञ जन जाणती।।७।। ज्ञानाग्निनें संचितादिक। सर्व कर्म भस्म होय सहाजिक। देह प्रारब्ध कर्माचा वास्तविक। भोगिल्याने क्षय होतो।।८।। अक्कलकोटचे पांडुरंग। पुराणिक आश्रित अभंग। महिपति रामचंद्र नामाभिधान। बाबा सबनीस जन म्हणती।।९।। दया क्षमा शांती अंगी। भक्तिज्ञानसहित विरागी। रागद्वेष विकार परित्यागी। माणिक प्रभू महात्मा।।१०।। ऐशा महात्मा पुरुषांचे यशगुण। बाबा सबनीसाने श्रवण करून। अक्कलकोटचे सबनींशाचे काम सोडून। गेले ते माणिक नगरासी।।११।। वंदुनी माणिक प्रभुला। बाबा सबनीस राहिले सेवेला। काही दिवस गेल्यावरती पातला। भाग्योदय सुदिन।।१२।। स्वामीराज भक्तकार्य कल्पद्रुम। योगी मुनिजन विश्रामधाम। एक यतिवेष पुरुष परम। पातले दिव्य तेजस्वी।।१३।। बाबा सबनीसास प्रभू बोलती। दोन वर्षांनी ही दत्तमूर्ति। तुमच्या अक्कलकोटी निश्चिती। जगद्‌हितार्थ प्रकटेल।।१४।। पुढे बाबा सबनीस। येऊनी राहिले अक्कलकोटास। विश्वनाथ वैद्य आले वामोरीस। परमपुरुषार्थ साधूनी।।१५।। सोलापुराहून अक्कलकोट नगरी। येऊनी प्रवेशले स्वेच्छाचारी। स्वामी समर्थ दत्तावतारी। लोकानुग्रहा कारणे।।१६।। तेथे बाबा सबनीस सदाचारी। नित्यवाचती दासबोध ज्ञानेश्वरी। गुरुभक्त मोक्षाधिकारी। गुरुनाम स्मरण करती हो।।१७।। वाढवूनी हरिगुरुकीर्ती। गृहस्थाश्रमी संपादिली भगवत्प्रीती। जीव

ब्रह्मैक्य सायुज्यमुक्ती। बाबा सबनीस सत्पुरुषे।।१८।। अक्कलकोटी खास बागेत। असती सेवकांसह यतीश्वर भगवंत। तीन बोलके गोसावी पातले बागेत। पुसती अधिकार समर्थांचा।।१९।। महापुरुषांसी त्यांनी वंदन। केले नाही माजले साभिमाने करून। परंतु दत्तात्रेय मूर्तिस अवलोकून। पावले मौन तात्काल।।२०।। संन्यासी तटस्थ उभे ठेले अभंग। शरीर भानरहित ते गुंग। तै अकस्मात पलमात्र श्रीरंग। करुणा कटाक्षे देखती।।२१।। भरली प्राप्तिकालइष्टघटिका। उतरला दुराभिमान लटिका। गुरुकृपांजने नेत्ररोग टीका। झडूनी गर्व निमाला।।२२।। झाले ते पश्चाताप दग्ध। पंडित संन्यासी झाले विरक्त। तिघेही देहाभिमान त्यक्त। गुरुपदी आसक्त जाहले।।२३।। तयांचा पूर्ण हेतू जाणून। दत्तात्रेय स्वामी पूर्णब्रह्म सनातन। शेषशायी भगवंत कृपा करून। देती दर्शन त्रिवर्गासी।।२४।। आळंदीचे नृसिंह सरस्वती अक्कलकोटात। उतरले पटवर्धनाचे मंदिरात। आले नृसिंहवर दर्शनास। स्थापिले तया व्याघ्रासनी।।२५।। स्वामी कथती रंडा सोडावी। उत्तर देती आळंदीचे संन्यासी। तेचि काम चालले आहे अहर्निशी। नारायणा हो भगवंता।।२६।। दत्तमुनीश्वरे स्वकंठीची माळा। घातली नृसिंह यतिच्या गळा। तो अद्‌भूत सोहळा। जयजयकारे गाजला।।२७।। घेऊनी दत्तात्रेय स्वामींचा निरोप। पुण्याहून आळंदीस गेले सुखरूप। तद्‌नंतर त्यांचा लौकिक निर्लेप । वृध्दिंगत जाहला।।२८।। दत्तावतार

कृत्य संपल्यावर। हे नृसिंह सरस्वती यतिवर। आळंदी क्षेत्रात निरंतर। समाधीस्थ जाहले।।२९।। स्वप्नी देऊनी शालीग्राम प्रत्यक्ष। वेदमार्गी लावले यशवंतरावास। बोलावूनी अक्कलकोटास। उध्दरीले तया स्वामीप्रसादे।।३०।। बाबा घोलप ब्राह्मणास। सांगितला तया घेण्या संन्यास। दाखविला आत्मसाक्षात्कार प्रकाश। योगीश्वरांच्या दर्शने।।३१।। विष्णुबुवा ब्रह्मचारी आला दर्शनासी। समर्थांनी बोलावे वेदांत वचनासी। समर्थांविषयी किंतु त्याच्या मानसी। विद्याभिमान असे तया।।३२।। स्वप्नात तया वृश्चिके दंशले। झाले विव्हलते वृश्चिकदंशे। स्वप्न मिथ्या हेही न उमजले। हे काय नवल जाहले।।३३।। अंतरिची पटताची खूण गुप्त। ब्रह्मचारी झाले अहंकारगलीत। स्तविती आपण परमेश्वर निश्चित। घेतले तया पदरात नीजब्रीदे।।३४।। काळबुवा नामें महात्मा संत। स्वामीकृपेने झाले प्रख्यात। ज्यांच्या दर्शने लोक आनंदयुक्त। यथेप्सित पावले।।३५।। गुरुवक्त्यासी शिष्य विनवित। संन्यासपदाचा अर्थ सांगा उचित। शब्दार्थ सर्वांस कळेलथोडक्यात। ऐसा सांगा गुरुवर्या।।३६।। सकलकाम्यकर्मांचा न्यास। उत्तम पुरुष म्हणती तोची 'संन्यास'। न्यास बोलती त्यागास। कर्मफलेच्छा त्यागणे।।३७।। संन्यास आणि संन्यासाचे फल। दोन प्रकारे असे विमल। एक 'विविदिषा' संन्यास केवळ। दुसरा 'विद्वत्संन्यास' तो।।३८।। ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीस्तव। सर्व कर्मांचा परित्याग करणे जो वास्तव। त्याचे

‘विविदिषा’ संन्यास ऐसे नाव। वेदवेदांत ज्ञानी कथती।।३९।। ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावरी। जीवन्मुक्ती सुखभोगार्थ निर्विकारी। सर्व कर्मांचा परित्याग करी। तोचि ‘विद्वत्संन्यास’ जाणावा।।४०।। सुवर्ण इक्षुदंड चंदनासम उत्तमांची प्रकृती। प्राणांती देखिल नुपजे विकृती। धन्य धन्य ते महत्सुकृती। निर्विकार स्थिती ज्यांची असे।।४१।। दत्तात्रेय स्वामींचे दर्शनासी। राधा गणिका छलक मानसी। करुनी नमन समर्थांसी। प्रारंभिले गायन सुस्वरे।।४२।। आणि दुराग्रहे ठरलेला खलसंकेत। तद्नुरोधे गणिका कुचेष्टित। हावभाव कटाक्ष नखरे बहुत। राधा दावित समर्थांसी।।४३।। जाणुनी वेशेच्या मनीचे विपरीत। अंतर्साक्षी निर्विकार अवधूत। उच्चस्वरे पुसती की स्त्री पुरुषात। काय भेद असे गे?।।४४।। लज्जित ती म्हणे देवा विवेक चुडामणी। दुष्ट मी गणिका दुराचरणी। प्रवर्तले साहस-कर्मिणी। खल दुर्जन संगाने।।४५।। असो, सबीज वासनारहित राधा कामिनी। अमद अस्तन निरामय निराभिमानी। श्रीमद्दत्तात्रेय गुरुचरणी। झाली अनन्यशरणागत।।४६।। मग योगिराजे निज कंठीची माला। घातली राधा दासीच्या गळा। आज्ञापिती काशी प्रयागादि स्थळा। वृंदावन गोकुळा जाऊन यावे।।४७।। आपल्या आज्ञेजाते काशीवृंदावना। म्हणे दासीस द्यावे अखंड दर्शना। मज दीन दासीवरी पूर्ण कृपा सघना। असावी हीच विनंती।।४८।। एक गोसावी सात्त्विक विरक्त। श्रीमद्दत्तात्रय दर्शन व्हावे या

युगात। म्हणून बहुत संवत्सरपर्यंत। अनुष्ठान त्याने केले।।४९।। प्रज्ञापुरी यतिस प्रणिपात करून। योगिराज स्वामींनी तया विलोकून। दत्तात्रेयरूप स्वये धारण करून। तयासी कृतार्थ केले।।५०।। एक सय्यद यवन येऊनी धीपुरी। अक्कलकोटचे स्वामी कुठे विचारी। 'अक्कलकोटातच स्वामी' यति उत्तरी। तटस्थ झाला यवन।।५१।। सुटले प्रपंच देहभान। चित्त चैतन्यस्वरूपी झाले तल्लीन। प्रज्ञानेत्रे स्वामीराज भगवान। हृदयस्थ पाहिले धीपुरी।।५२।। न गणती वर्ण ज्ञाती अधिकार। शुध्द भाव भक्तीने परमेश्वर। भेटविती जना नृसिंह यतिवर। अगम्य असे ही गुरुलीला।।५३।। एके दिवशी स्वामी समर्थ दिगंबर। सांगती श्रीपादभटास श्रेयस्कर। श्रीक्षेत्र वाराणसीस जाऊन रहावे तीन मास। भेटावे नंतर हो द्विजवर्या।।५४।। म्हणतात या विरस असार संसारी। सार असे चतुष्ट्य प्रकारी। निवास विश्वेश्वर पुरी, सत्संग, स्नान गंगानिरी। चौथे विश्वेश्वरदर्शन असे सार चतुष्ट्य।।५५।। श्रीपाद भेटे तीर्थदेवतामय काशी। हर स्मरणात ते रमले अहर्निशी। काशीकर ब्राह्मण न मानती त्यासी। नसे त्याचा खेद श्रीपादभटा।।५६।। विश्वेश्वर दर्शना आले देवालयाजवळ। कटीवर हस्त ठेवूनी सोज्वळ। दत्तात्रेय स्वामीराज दयाळ। प्रसन्न वदने उभे होते।।५७।। स्वामी वदती जा मंत्रजागरणात। निर्भय जाऊनी बसावे निश्चिंत। आम्हीही तेथे जवळची आहोत। म्हणावे मंत्र वेदांचे।।५८।। श्रीपादभट

बैसला मंडळात जाऊन। वारंवार काशीस्थांच्या चुका दाखवून। नंतर त्याने मंत्र करुनी पठन। चकित केले शास्त्रीब्राह्मणा।।५९।। येऊनी नंतर अक्कलकोटासी। दत्तात्रेय स्वामीचरणार विंदासी। पूजुनी करती ब्राह्मणभोजनासी। सांगती सर्वास शुभवृत्त।।६०।। प्रयत्ने अवश्य शेत पिकवावे। प्रारब्ध सुखरूप नित्य खावे। दत्तात्रेयस्वामींचे सद्बोध वाक्य बरवे। केवळ कल्याणार्थप्रद।।६१।। असो इंग्रज सरकारचे विद्यमान। अधिकारी साहेब बंबगार्डन। जतन करावया संस्थान। अक्क्लकोटी वसती ते।।६२।। त्यांचे पायास एकदा। गोम डसली होती विपदा। आपणासी न व्हावी आपदा। म्हणून उपाय विविध योजिती।।६३।। उपाय थकले गुण परि येईना। स्वामीस ते जाती अनन्यशरणा। निंबाचे रक्तखोड सांगती ने लावण्या। तेणे व्याधीविध्वंस होईल।।६४।। मग पाण्यात उगाळून तात्काळ। लाविले पायास दोन तीन वेळ। तेणे व्याधी दु:ख आणि तळमळ। गेली समूळ लवकरी।।६५।। सद्गृहस्थ साहेब बंबगार्डन। न्यायरिती योग्य सज्जन। नि:पक्षपणे अक्क्लकोट संस्थान। केले जतन तयांनी।।६६।। मन्याबा नावाचा मुका एक। तयासी होता गुरुपदेश। मूकत्व त्याचे जाऊनी लयास लागला भजनास स्वामींच्या।।६७।। समर्थांचे सहज संभाषण। तेचि मंत्रोपदेश बोध दृढिकरण। त्यातही महामंत्र महावाक्यार्थज्ञान। जगदुध्दारार्थ बोधिती ते।।६८।। प्रसिध्द श्री काशीक्षेत्री। एक

वसत होते बहिरेशास्त्री। स्वधर्मरत उभयता पुरुष स्त्री। ते कथानक परिसावे।।६९।। तयासी बहुत वर्ष-पुत्र संतान। नव्हते ते झाले विश्वेश्वरकृपे करून। बहिरेशास्त्री विद्वान असून। करविले गणित जातक पुत्राचे।।७०।। अल्पायुषी त्या पुत्राचे भाकित। जाणूनी बसले शास्त्री चिंताक्रान्त। म्हणती व्रतबंधादिक संस्कारयुक्त। कैसे होईलहे बालक।।७१।। ज्योतिष जातक शास्त्रानुसार। जन्मपत्रिकेत फलनिर्धार। अमूक वर्षे तिथी प्रहर। त्यावेळी पुत्र पंचत्वे पावेल।।७२।। शास्त्रीस साधु म्हणे साधने सकल। तुमचे कार्यात होतीलनिष्फळ। परि महात्मा अवतारिक दर्शने केवळ। पुत्र आयुष्मान होईल।।७३।। स्त्री पुत्रास घेऊन पातले धीपुरी। राहूनी नारायण भट हर्डीकराचे घरी। श्रीगुरुचरित्र पठन स्वामीदर्शन करी। सद्भावे शास्त्री नित्यनेमे।।७४।। पुत्राचा मरणकालसमीप आला। पुत्र अकस्मात् मूर्च्छित पडला। तीळ शर्करायुक्त भक्षवून त्या सावध केला। परम्कारुणिक गुरुराये।।७५।। मृतावस्थेतून उठविले बालका। पाहून आश्चर्य वाटले सर्व लोका। मग प्रार्थिती कालाच्याही कालांतका। यतींद्र नायका परमेश्वरा।।७६।। द्विजसुताचा गेलेला श्वास। परि समर्थांचा पूर्ण विश्वास। जो मूलाधार पालक या विश्वास। तत्कृपे सजीव पुत्र झाला।।७७।। प्रज्ञापुरी चार संवत्सर। बहिरेशास्त्री राहिले सहपरिवार। स्वामीराज अदृश्य झाल्यावर। गेले वाराणशी सदनी ते।।७८।। असो, नथोबा कामावर

होते धीपूरी। प्रामाणिकपणे तो करी चाकरी। द्रव्याहरणाचा आरोप घालूनी त्यावरी। दिधला त्रास अतिशय।।७९।। मालोजी नृपती गुरुवारी। दत्तात्रेय स्वामी दर्शनासी झडकरी। पातले पेठेत जनहितकारी। नमस्कारिती योगीश्वरा।।८०।। संगे दाजी पिराजी भोसले। नमूनी श्रीगुरुसी प्रार्थियले। काय आज्ञा आहे आम्ही आपले?। दास लेकरेंचरणांची।।८१।। तव बोलती नृसिंह मुनी। खजिना पहा रे मोजूनी। विनापराध कोणासी जाचणी। करणें ते पातक होतसे।।८२।। नृसिंह वाक्य ऐकूनी भूपती। दाजीबास ते आज्ञापिती। नथोबास सोडून लावावे कामाप्रती। नथोबा म्हणे आता चाकरी नको हो।।८३।। नथोबा पुत्राच्या संकटी धावून। योगिराज करीत होते संरक्षण। त्यांनी पुत्राचे मौजाबंधन। अक्कलकोटीच केले।।८४।। नारायणदास विप्र यतिस निंदती। तशीच त्याला दाविली प्रचिती। परि शरण तो येता शुध्दचित्ती। पुत्रसंतान देऊन सोडविली त्याची सती।।८५।। नारायणदास असे फार उन्मत्त। न जाई तो यति दर्शनास। लागले तयासि मग पिसे खास। वेड्यासारखा तो जाहला।।८६।। पत्नी तया घेऊनी आली धीपुरास। त्याने रहावे चार मास। न पडे त्याविना आराम विप्रास। नृसिंह यतिवर बोलती।।८७।। चार मास गेल्यावरी। गुर्जर विप्राची प्रकृती झाली बरी। पुत्रासी घालून प्रभुपायावरी। धन्य कृतार्थ जाहला।।८८।। श्रीमंत निजामांचे दप्तरदार। शंकरराजे

नाम जहागिरदार। विश्वेश्वर दर्शनातूर। काशीक्षेत्री पातले।।८९।। परि पाहती ते शिवलिंगस्थानी। दैदीप्यमान पुरुषशिरोमणी। सुंदर यतिवेषधारी महामुनी। सुप्रसन्नवदन विराजित।।९०।। शंकरराव चिंतिती मनी। महायात्रेस निघण्याच्या पूर्वदिनी। अक्कलकोट यतींद्र दर्शन घ्यावे मनी। ऐसा संकल्पोद्भव झाला होता।।९१।। विध्युक्त तीर्थयात्रा करून। शंकरराव अन् त्यांचे स्वजन। शीघ्रगतीने मार्ग क्रमून। अक्कलकोटी पातले।।९२।। परि शंकररावाची प्रकृती झाली अशक्त। झाले जरी मम शरीर आरोग्यवत्। धन अर्पिन येथे बांधवीन मठ। संकल्प त्याने ऐसा केला।।९३।। समर्थकृपे झाला तो आरोग्यवंत। श्रीराम देवालयाजवळ बांधविला मठ। त्या मठातील अत्यल्प भागात। रामदासबुवा राहिले होते।।९४।। श्रीमद्दत्तात्रेय स्वामी दिगंबर। ज्यांनी रामदासाचे नाव ठेवले 'कबीर'। स्वमुखे 'कबीरा' म्हणून वारंवार। पाचारूनी बोधित होते।।९५।। असो, स्वामी समर्थांच्या पश्चात्। रामदास राहिले पंढरपूर क्षेत्रात। आणि बाबा सबनीसांचे सदनात। वेदांत श्रवण नित्य चालतसे।।९६।। ते बाबा सबनीस महासंत। शालिवाहन शके अठराशे दहात। अधिक चैत्र कृष्ण चतुर्थीस। कैलासवासी जाहले।।९७।। स्वामीमहाराजांच्या पश्चात। शंकरराव होता देहातीत। त्यांचे दत्तक चिरंजीव। करिती समर्थोत्सव आपल्या मठात।।९८।। हे गुरुराजदत्त परिसा समजावा। लोह हे तनु स्पर्शे कनक करावा।

तूच माझा सखा, सोयरा, माता, पिता। होई तूच धाता। करितो कळवळा तुजपाशी।।९९।। चतुर्थी आणि द्वादशीस। हे शरीर करून प्रक्षालन। हा अध्याय करिता पठन। दुष्ट बुध्दि दुष्क्रिया होईल लाचार।।१००।।

अवतार कौतिक प्रत्यक्ष दावून। भक्तजना संतोषवून। प्रसन्न करुनी अखिल जन। सांगता ही पंचमाध्यायाची।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृतवाणी। अखंडीत घट परिपूर्ण ग्रंथातील चिरंजीव स्वामी समर्थ आशीर्वादातील। पंचमोऽध्यायः।

।।श्री स्वामी समर्थ चरणोऽरविंदार्पणमस्तु।।

## सहावा अध्याय

# ।। तपःलोकाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

कर्नाटक देशी विजापूर जिल्ह्यात। तंबग्रामी शिवराम जोशी वसत। ज्योतिषी विद्वान ब्राह्मण। तीन पुत्र तयासी झाले।।१।। ज्येष्ठ पुत्रद्वय झाले विद्वान। कनिष्ठ गोविंदभट लहान। साधुवृत्तिचे त्याचे वर्तन। शुध्द भोळाभाव अंतरी।।२।। स्वामीरायांचे अखंड स्मरण। नित्यनेमे गोविंद उच्चारण। वृद्धि झाली त्याची दिनदिन। जाहली प्रसिद्धी लोकांत।।३।। राचाप्पा आणि गोविंद झाली भेट। राचाप्पा करी कवने बहुत। गोविंद नम्रपणे तया विनवित। स्वामी श्रेष्ठांचे वर्णन करावे।।४।। राचाप्पा म्हणे एक ईश्वरावाचून। अन्यावरी मी न करी कवन। खिन्न झाले गोविंदाचे मन। त्याने त्यजिले अन्नोदकासी।।५।। जाऊन राचाप्पाचे स्वप्नांत। ईश्वरे दाविला सत्य दृष्टांत। मीच स्वामीराय साक्षात भगवंत। भिन्न भेदभाव मानू नये।।६।। राचाप्पा ऐसा दृष्टांत दावून। ईश्वर पावले अंतर्धान। राचाप्पा जंगम जागृत होऊन। भयभीत

तो जाहला।।७।। राचाप्पा येऊन गोविंदभट सदनी। जाऊनी लोळे तच्चरणी। म्हणे आपणाकरिता त्रिशूलपाणि। भेटले स्वप्नी प्रत्यक्ष।।८।। मी शरण आलो तुमच्या समीप। क्षमस्व करा स्नान भोजन। मग स्वामीरायासी नैवेद्ये समर्पून। बसले दोघे भोजनासी।।९।। पुढे गोविंदभटासी झाले जलोदर। परि स्वामीराय कृपा असे अपार। जाऊनी रोग निर्मळ झाले शरीर। स्वामीकृपे गोविंद वाचले।।१०।। एक तैलंग जातीचा ब्राह्मण। नाना तीर्थयात्रा देशाटन। धनप्रीत्यर्थे करितसे जाण। शुद्धाचरण युक्त जो।।११।। आला मग तो प्रज्ञापुरी। स्वामीरायास नमस्कार करी। तयासी स्वामी पुसती येथवरी। तीर्थे फार करुनी आलासी।।१२।। वदे मग तो तैलंग ब्राह्मण। संसारी गांजलो झाले ऋण। सांगावा उपाय जेणे फिटे ऋण। मायबाप गुरुवर्या।।१३।। स्वामींनी दिली त्यास मृत्तिका। निराश विप्र स्वग्रामे निघाला। थकला तो ओझे उचलता। मग त्यागास्तव उघडे पडशी।।१४।। सोडूनी पाहता दिसे लखलख। शुभ्र स्वच्छ रौप्य सुरेख। तेलंगास झाला बहुत हर्ष। म्हणे ईश्वरी लीला अगम्य।।१५।। परि पतिवर्या कांता म्हणे। मृत्तिकेचे रौप्य झाले क्षणे। त्या देवाच्या कृपावलोकने। सोने कां न होईल?।।१६।। सुवर्ण प्राप्तीचा अतिलोभ झाला। देखूनी ऐशा तेलंग विप्राला। स्वामी समर्थ म्हणती तयाला। उठ चालता होई की रे।।१७।। ऐसा लोभी असून ब्राह्मण। गृही जाऊनी झाला मुक्त ऋण। अभाविकासही दत्तात्रेय स्वामी प्रसन्न। होताची तया काय उणे ।।१८।।

भीमातीरी शिरगुर गावी एक। माधवशास्त्री नामक थोर। शिरगुर गाव तयासी जहागीर। असून झाले ऋण फार। तेणे माधवाचार्य चिंतातुर। तशात कुटुंब निवर्तले।।१९।। परि अक्कलकोटी येऊन। स्वामी समर्थास तो गेला शरण। कपर्दिक नसून तयासी कन्या सुंदर। लाधली स्वामीराज कृपे।।२०।। भार्येसह येऊन माधवे प्रार्थिता। स्वामीसमर्थ गुरुदेवदत्ता। वदती ते ऋणमुक्त आता। व्हाल पुत्रपौत्रादिसह सुखी।।२१।। त्या माधवाचार्यांच्या मनात। भेदभाव असे वसत। तयासी प्रत्यक्ष देऊन दृष्टांत। भेदभाव निरसिला।।२२।। सातारा जिल्ह्यात रहिमतपूर। तेथे आप्पासाहेब माने सरदार। भाविक त्यांसी दोन पुत्र कन्या एक। परंतु घरची गरीबी।।२३।। बाबासाहेब मराठे मानकरी। गुर्जर उपनामक त्यांचे घरी। माने होऊन राहिले सेवेकरी। गुरुदत्तात्रेय स्वामींचे।।२४।। नंतर मान्यासी वदती दयासागर। खंडेरायासी अर्पावी कन्या चतुर। लेईल अमोलिक बहू वस्त्रालंकार। तेणे व्हाल बहुसुखी।।२५।। खंडेरावमहाराज नृपवर। त्यांनी मान्यांची कन्या विलोकून। वचनासी दिधला रुकार मान। विवाह संपन्न झाला।।२६।। आता शिष्या सुंदरी नामक। वानरीची कथा ऐक। मुक्या जनावरासही सुखात्मक। जाहला प्रसाद सद्गुरुंचा।।२७।। त्या वानरीचा फार त्रास। झाला बंबगार्डनर साहेबास। मग तिच्या प्राणघातास। निरुपाये साहेबे हुकूम केला।।२८।। भुजंगाने साहेबांच्या आज्ञेवरून। वानरीस आणले सोडवून। समर्थांच्या दये जीवदान।

अज्ञान वानरीस मिळाले।।२९।। अक्कलकोटी बुधवार पेठेत। स्वामीरायांच्या आद्य प्रियमठात। सुंदर वानरी देहातीत। स्वर्गस्थ शिवरूप जाहली।।३०।। दिनकरराव आनंद शेणवी जातीचे। कारभारी अक्कलकोट संस्थानचे। नेत्रविकार झाला त्याते। व्यर्थ होती सारे उपचार।।३१।। कारभारी सांगती चोळाप्पाला। चोळाप्पाने सांगितले श्रीपादभटाला। मान देऊन भटाच्या विनंतीला। स्वामी उपचार सांगती।।३२।। स्वामी आज्ञे तीन दिवस। गजमूत्र घातले नेत्रात। आराम झाला डोळियांस। उष्ण विकार मावळला।।३३।। मुंबापुरीचे राहणारे पारशी। बरनोरजी कामदार धीपुराशी। होते त्यांचे आप्त मुंबईशी। नवरोजी नामे गृहस्थ।।३४।। स्वामीरायांच्या अद्‌भूत लीला। बरनोरजी सांगती नवरोजीला। परंतु सत्य न वाटे तयाला। म्हणूनी आले अक्कलकोटी।।३५।। तीन दिवस झाल्यावर। नवरोजी बैसले असती मंचकावर। मध्यरात्री एका काष्ठासनावर। योगिराज येऊन बैसले।।३६।। फिटूनी ऋण पुष्कळ संपत्ती। मजला व्हावी अधिकार प्राप्ती। नवरोजी पुसता स्वामीराज वदती। होता देशील काय आम्हासी?।।३७।। नवरोजी वदे चतुर्थांश देईन। नर्मदेकडे जा वदती अत्रिनंदन। त्याने तांबुल कुटण्याकरता प्रारंभ। यतिनाथ गुप्त जाहले।।३८।। श्रीमंतमहाराजांच्या आज्ञेवरून। नवरोजीस बडोद्यास बोलावून। वस्त्रालंकरादि तया देऊन। सत्कारिले तयाला। येऊन अक्कलकोट ग्रामात। स्वामीरायांचे चरणी लोळत। म्हणे जगदीश्वरे

अनंत। ऋणमुक्त केले मजलागी।।३९।। समर्थांसी न्यावया बडोद्या प्रति। अनेक प्रकारचे यत्न करती। अनेक गप्पा थापा मारिती। जगद्‌गुरुसी न्यावया।।४०।। पाहिजे केवळ शुद्धभाव। तेथेची तिष्ठे देवाधिदेव। असो आलेल्या लोकांस सदैव। आशीर्वाद दिधला गुरुनाथे।।४१।। श्रीकृष्ण बापू कान्यकुब्ज द्वीज। करितसे सुस्वर गायन कीर्तन। पंढरीस निंद्य कर्म केल्यावरून। तया कुष्ठरोग झाला।।४२।। त्याने गुरुचरित्र पारायणादि केले। नृसिंहवाडीत जाऊन राहिले। तेथून गाणगापूरास निघाले। मार्गी चिंचवृक्षाखाली स्वामीराय देखिले। त्या पाहूनी मनात चिंतीले। हे अवतारीक नसती मानव।।४३।। बुवासी बोलती यतिराज पुण्यश्लोक। असो आम्ही मानव वा अवतारिक। ठाकुरदास म्हणती दिसती अंतर्साक्ष पुरुष। मार्ग क्रमिला गाणगापूरचा।।४४।। बापूबुवास जाहला दृष्टांत। चिंचेखालील बुवांचे करावे पूजन। केशर कस्तुरीयुक्त विधियुक्त। तेणे जाईल कुष्ठरोग। प्रसन्न होता योगाधिश्वर। आरोग्य स्वच्छ झाले शरीर। कुष्ठरोग नष्ट झाला पार। सर्वांसी नवल वाटले।।४५।। आता त्रिविक्रममुनिंचा इतिहास। शिष्या सावधचित्ते परिस। रामतीर्थ क्षेत्री निवास। होता त्रिविक्रम यतिचा।।४६।। अक्कलकोटचे शहाजी नृपती। नसे त्यासी पुत्रसंतती। मग नृपवरा वदति यति। चतुर उदार पुत्रसंतती होईल।।४७।। आपले असे महद्‌भाग्य कारण। थोडे दिवसात अवतारपूर्ण। परमहंस यतींद्र नारायण। येतील आपुल्या ग्रामात।।४८।। काही शिष्य त्रिविक्रम

यति समे। होते त्यात एक रामाचार्य नामे। जमखंडीकर वैदिक विप्र प्रेमे। वसत होता सन्मार्गी।।४९।। पोक्तवयसि रामाचार्य पत्नी। राहिली गर्भिणी स्वामीराज कृपेनी। तिजसी सुंदर पुत्र देऊनी। संतुष्ट केले यतिराये।।५०।। औरंगाबाद येथील। चावल दरवाजा जवळ। हिंदुस्थानी ब्राह्मण असती सबल। लालासाहेब नावाचे। तयासी कुष्ठरोग दुर्धर उद्भवला। करीत होता नाना उपवास। त्यांनी देखले पुष्ट धेनु आणि यति। झाला विस्मय लालासाहेबाला।।५१।। पुसता कारण समजले तयाला। जावे अक्कलकोटी दर्शनाला। स्वामी सांगती लालासाहेबाला। श्वानास घालावे अन्न-नीर।।५२।। स्वामी आज्ञेनुसार श्वानास अन्न-नीर। नित्य नेमे घाली तो विप्र। त्याने त्याचे कुष्ठ समूळ। नष्ट होऊन आरोग्य जाहले।।५३।। भाऊ रसूलाचे पंक्तीत बालक होऊन। यतिवरे प्रत्यक्ष दर्शन देऊन। दोन शत रौप्य मुद्रिकांचे स्मरण। त्याज लागी करून दिले।।५४।। स्त्रीपुरुषास घेऊन आला प्रज्ञापुरा। यतिवर्य वदती का रे सावकारा। भोजनी न म्हटले भोजन करा। कैसे तुझे अतिथि अभ्यागत।।५५।। भाऊ म्हणे आजपासून निरंतर। आल्या अतिथिस अन्न-नीर। देत जाईन हो दत्तदिगंबर। आज्ञा तत्पर मी वर्तेन।।५६।। अक्कलकोट ग्रामी महिपाल मंदिराजवळ। जव्हार नामक एक मत्तवारण। तो मातंग जनांसी त्रासदायक। माजला फार एके काळी।।५७।। श्रीमद्दत्तात्रेय स्वामी अवधूत। जाणूनी मत्तवारणाचे भयंकर वृत्त। पुष्कळ सेवेकरी जनांसहित। त्या राजमार्गात

पातले।।५८।। निर्भय स्थितीने कटीवर। ठेवूनिया वरद उभयकर। उभे राहून मत्त वारणासमोर। म्हणती माजलास फार। मारितोसी लोकांस विनाकारण। नाही का रे राहिली ओळख तुज?। नाही पूर्वीचे स्मरण काय?।।५९।। ते श्रवण करुनी मत्त वानर। सावधपणे शुद्धीवर येऊन। होऊनी गलित मदाभिमान। शरणागत जाहला।।६०।। नागरिकांचा त्रास गेला। ऐशा असती अनंत गुरुलीला। मुकी जनावरे ओळखती प्रभूला। पूर्वसंस्कार ज्ञानोदये।।६१।। त्रयमूर्तींचा अवतार यथार्थ। गुरुदेवदत्त स्वामी समर्थ। तच्चरणांचे अनेक सेवकदास। स्वार्थ परमार्थ साधक झाले।।६२।। असो, एक भक्त बाळाप्पा नाम। राहिला सेवेसी गाणगापुरी येऊन। श्रीपादमुखे दत्तावतार कीर्ति ऐकून। म्हणे धीपूरी मी येतो समागमे।।६३।। बाळाप्पाची लावून भोजन व्यवस्था। श्रीपादे ठेवले समीप स्वामी समर्था। नंतर बाळाप्पा लागला गुरुपंथा। सेवा नित्य करावया।।६४।। सोलापूरची ब्राह्मण स्त्री एक। विधवा सुंदराबाई नामक। समर्थ सेवेसी संवत्सर कित्येक। राहिली होती अक्कलकोटी।।६५।। त्या सुंदराबाईच्या मर्जीनुरूप। बाळाप्पा सेवेसी होते स्वामी समीप। तेणे स्त्री पुत्र कन्यासह सुखरूप। बाळाप्पा नित्य सेवा करी।।६६।। सुंदराबाईसी जव लोभ जडला। तेव्हा चरणापासून दूर केली तिला। सेवा दिली बाळाप्पाला। स्वामी समर्थ यतिराये।।६७।। पुढे बाळाप्पासी स्त्रीपुत्र वियोग होत। तथापि बाळाप्पा दक्ष गुरुसेवेत। पूजा अनुष्ठान करी सदोदित। मोक्षाधिकारी तो

जाहला।।६८।। बाळाप्पा तपस्वी गुरुभक्त। समर्थांचे सदृश संप्रदाय वाढवित। ब्राह्मणभोजन समारंभ करीत। दत्तजयंती आणि पुण्यतिथी।।६९।। या प्रकारे निःस्पृह निरुपाधिक। केवळ शुद्धमतीने व्हावे पारमार्थिक। तेणे सद्गुरुकृपा होऊन सार्थक। जन्मोजन्मीचे होतसे।।७०।। यजमानांच्या आज्ञेत वागती चाकर। तयांसी फल होतेची सुखकर। तैसे वेदोक्त धर्ममार्ग-प्रवर्तक नर। अक्षय सुखी अवश्य होती।।७१।। महारुद्र देशपांडे नामाभिधान। तयांसी होते बंधू तीन। निजाम सरकारातील त्यांचे उत्पन्न। सोडविण्यासाठी ते प्रयत्न करिती।।७२।। मग देशपांडे अक्कलकोटासी आले सत्वर। तयासी वदती यतीश्वर। जावे तेथे जेथे आहेत मनोरे चार। तुमचे शेत सोडवून देऊ।।७३।। हैद्राबाद शहरात त्वरेने। महारुद्रराव गेले यतीश्वर आज्ञे। करिता स्वल्प प्रयत्न साधनें। सहज कार्य जाहले।।७४।। त्या दिवसापासून यतीश्वर चरणी। महारुद्रांचा विश्वास जडला पूर्णपणी। उत्पन्न पूर्ववत मिळाले म्हणूनी। चरण वंदिती जगद्गुरुंचे।।७५।। देशपांडे गेल्यावर स्वसदनी। द्रव्याचे हांडे सापडले स्वामीकृपे करुनी। पातले सत्वर अक्कलकोटनगरी। पुन्हा दत्तदर्शनार्थ।।७६।। तेव्हा त्यांना झाली ज्वरोत्पत्ती। वायुप्रकोपे बिघडली प्रकृती। परि महाराजांच्या कृपेनिश्चिती। आराम तयासी वाटला।।७७।। त्याकाळी तेथे मुंबापुरीचा भक्त। श्वेत पाषाणाच्या पादुकाकारक। प्रख्यात हरिश्चद्रंजी नामक। सात्त्विक निर्लोभी भक्तिमान।।७८।। दत्तात्रेय

स्वामींच्या आज्ञेनुसार। त्याने दत्तात्रेय चरणपादुका सत्वर। रघुनाथ देसाई केजकर। यासी त्या अर्पण केल्या।।७९।। त्यांनी केजेस आपल्या उकीरड्याच्या जागेवर। स्वामीआज्ञे बांधले मठमंदिर। त्यात त्या चरणपादुका सत्वर। सुमुहुर्ते विधिपूर्वक स्थापिल्या।।८०।। अक्कलकोटात बुधवार पेठेत। शालिवाहन शके अठराशे पूर्णात। कृष्ण चतुर्दशी चैत्र मासात। स्वामीराजे विदेही समाधी घेतली।।८१।।असो, ऐसे जाता थोडे संवत्सर। पुन्हा मार्गशीर्षात स्वामी केजकर। अक्कलकोटास पातले सहपरिवार। दत्तजयंती उत्साहार्थ।।८२।। केजकरस्वामींची बिघडली प्रकृती। ते करती विनंती जनांप्रति। स्वामीसमर्थांच्या चरणाजवळी। माझी समाधी करा हो।।८३।। केजकरांची समाधी बुधवार पेठेत। श्री स्वामीमहाराजांच्या आद्य प्रिय मठात। केजकर स्वामी भाग्यवंत। समर्थ चरणकमली रंगले।।८४।। अक्कलकोटचे ज्योतिषी गणेश। त्यांनी घेऊन लोकसाह्य द्रव्यास। बांधविला मठ स्वगृहात। त्या मठात देवतास्थापन। शके सतराशे एक्याण्णव शालिवाहन। शुक्लनाम वत्सरी उदनयन। वसंतऋतुत जाहला।।८५।। मुंबईचे विनायकराव वासुदेवजी। आणि ढवळे बळवंत रावजी। यांनी खर्च करुनी द्रव्यपुंजी। योग्यता विराजित मठ केला।।८६।। या मठात समर्थे लावियेला वृक्ष। आहे देवाच्या उजव्या बाजूस। तसेच चिंतोपंत भक्तीमुळे समर्थांची चरण कमले। उमटली तो पाट मांडला आहे।।८७।। शके सतराशे अठ्ठ्याऐंशीपासून। स्वामी दत्तदिगंबराचे

उत्तमस्थान। बुधवार पेठेत व्हावे म्हणून। महाजन विचार उद्‌भवला।।८८।। शके सतराशे नव्वदापासून। सुमुहूर्तावर पाया खोदून। श्री समर्थांच्या आज्ञेकरून। देवालय काम सुरू झाले।।८९।। श्रीदत्तात्रेय स्वामी आज्ञेनुसार। देवळात खाली गुहा सुंदर। ब्रह्मविद्येचे संपूर्ण भांडागार। शुद्धभक्ति वैराग्यादिकांचे।।९०।। त्या परमानंद गुहेत एक प्रहर। स्थित होते दत्तदिगंबर। म्हणती हे आमचे आद्य नित्य प्रियकर। स्थान योग समाधी सुखाचे।।९१।। असता शुभवर्ग ग्रह उच्च नवमांशात। स्वस्थानी देवता झाल्या संस्थापीत। त्रयमूर्ति श्रीमुखकमलें कोनाड्यात। मांडिली सन्मुख उच्चस्थानी।।९२।। सर्व जातीचे नारीनर लोक। सगळे उभे ठेले नागरिक। देवता स्थापन प्रसंग अलौकिक। पाहूनी हर्षित झाले सर्व।।९३।। त्या लक्षावधी जनांसमक्ष। श्रीमद्‌दत्तात्रेय स्वामी होऊन प्रत्यक्ष। आशीर्वाद सर्व मंगलप्रद निःपक्ष। सर्वार्थप्रद बोलती।।९४।। हे आद्य वेदमंत्र सिद्ध प्रिय स्थान। या देवस्थानात येऊन राहून। जे जे करतील यज्ञ तप व्रतानुष्ठान। ब्राह्मण संतर्पण समाराधनादि।।९५।। वेदमंत्रांचे नित्य पठण। गुरुचरित्रादिंचे पारायण। करतील इष्टमंत्राचे पुरश्चरण। शुद्ध भक्तिभावे जे।।९६।। त्यासी कोटी गुणीत प्राप्त फल। त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होतील। कुशाव्रत-तीर्थोदके केवल। स्नानपान करतील जे।।९७।। ते रोग संकट दुःखमुक्त। होतील पावन पुण्यवंत। देवतोपासनें सर्वांसी अखंडित। चतुर्विध पुरुषार्थ त्या प्राप्त होती।।९८।। सांभाळ करी सृष्टीचा। गोळा

नवशक्तींचा। करी सांभाळ शिव सरळभोळा। अवतार स्वामी समर्थ सकल शक्ती भांडार। अमृत देई भक्ता करुनी सांभार।।९९।। पंचमी आणि त्रयोदशीस। करितो पठन जो भाविक। दंभ अहंकाराचा न लावी लवलेश। सांभाळी हा मालिक।।१००।।

देहात असून देहातीत। भक्तांवरती मायाछत्र धरीत। अवतार अलौकिक कालातीत। महात्म्य ह्या षष्ठाध्यायाचे।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृतवाणी। अखंडीत घट परिपूर्ण ग्रंथातीलचिरंजीव। स्वामी समर्थ आशीर्वादातीलषष्ठोऽध्याय:।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

सातवा अध्याय

## ।। सत्यम् लोकाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जैसे एकच मायावी ऐंद्र जालिक। स्वमायेने, रूपे धरी अनेक। तैसे परमात्मा मायावी एक। मायावशें अनंत रूपे धरितसे।।१।। ते माया विशिष्ट परमेश्वर। श्रीमद्‌दत्तात्रेय स्वामी परात्पर। सहज व्हावया जगदुध्दार। लीला अपार दावितसे।।२।। अक्कलकोटच्या सभोवती। उत्तम प्रकारची उद्याने असती। सर्व उद्याने जलभरित वापीने शोभती। जल तेथे मिळतसे।।३।। परंतु एक संवत्सरात। पर्जन्यवर्षला नाही प्रज्ञापुरीत। आटल्या विहिरी जल नसे त्यात। अन्नोदकांचा बहुदुष्काळ।।४।। हे श्रवण करुनी समर्थ कळवळले। तात्काळ खास बागेत जाऊन उभे ठाकले। वेदजल मंत्र म्हणून वापीत हरभरे फेकीले। वापीत जल साचू लागले।।५।। नंतर एक मासात वर्षला पर्जन्य। गेले जनांचे उदक दैन्य। त्या दिवसापासून त्या बावडीत शुध्द जल। राहू लागले समर्थ कृपेने।।६।। हैद्राबादचा एक शिपाई यवन। कपट छल बुध्दिने श्रीस वंदन करून। म्हणे खर्चावयासी

द्यावे आपला लौकिक। मुंबईस गेले पाहिजे मजलागी।।७।। उत्तर देती यतींद्र जगज्जीवन। कंबरेसी पंधरा रूपये बांधून। गाठोड्यात मौल्यवान सुवर्ण नग असून। कपटे अनृत का वदशी?।।८।। म्हणे लज्जित होऊन तो यवन। आपण खुदा-अल्ला-इलाही-रहिमान। माझा अपराध पोटी घालून। क्षमा करावी मजलागी।।९।। एके काळी कोकणस्थ ब्राह्मण। रामशास्त्री डेंगरे नामक। म्हणे मी जातो कार्तिकेयाच्या दर्शनास। समर्थे आज्ञा दिली नाही।।१०।। नंतर कार्तिक पौर्णिमेस। कार्तिक स्वामींचे सगुण स्वरूप। प्रत्यक्ष धारण करून सर्वासमक्ष। दर्शन दिधले रामशास्त्रीस। कृतार्थ धन्य त्या केले।।११।। ऐसा साक्षात्कार झाल्यावर। यथासांग पूजिले गुरुमहेश्वर। नंतर दर्शनासी राहिले दोन संवत्सर। रामशास्त्री प्रज्ञापुरी।।१२।। दत्तात्रेयशास्त्री साधले उपनाम। धीपुरी येऊन दर्शन घेऊन। श्री स्वामी समर्थांचे आज्ञेवरून। बारशीस जाऊन राहिले।।१३।। त्यांनी सुंदर कामधेनू एक। समर्थांसी अर्पण केली सात्त्विक। शुक्ल-कपिलवर्ण मनोहर सम्यक। समर्थासमीप वसतसे ती।।१४।। बुधवार पेठेतील समर्थस्थानी। त्या गौमातेची समाधी अखंड निर्वाणी। सुंदर श्वेत मूर्ती स्थापूनी। पूजन नित्य होतसे।।१५।। एक मुंबापूरीचा राहणार। रुपगुणसंपन्न अल्पवयस्कर। मराठे जातीचा सामान्य नर। 'हरि' असे नाम तयाचे।।१६।। दाजीबाने योगाश्वरलीला। अपार अगम्य कथिल्या हरिभाऊला। पुढे अक्कलकोटास जाण्याचा निश्चय झाला। म्हणूनी सुंदर पादुका करविल्या।।१७।। जगन्नाथ मित्रासवे अक्कलकोटी आले। त्यांनी चोळाप्पास उच्छिष्ट नेता पाहिले। विनंती करून समर्थ उच्छिष्ट मागितले।

भक्षिता आनंद अति झाला।।१८।। नंतर योगीश्वर समीप जाऊन। पूर्णब्रह्म मूर्तिमंत विलोकून। हरिभाऊंनी दंडवत नमन। भक्तिपूर्वक घातले।।१९।। त्याच रात्री हरिभाऊंसी स्वप्नात। जाहला भावी योग्य दृष्टांत। तू प्रपंचजाल त्यागूनी सदोदित। भजन करी रे निरुपाधीक।।२०।। सोडूनी प्रपंच संसारपाश। हरिभाऊ विनटले गुरुभक्तिवश। श्रीगुरु स्वामी समर्थांचे सावकाश। मठस्थान त्यांनी करविले।।२१।। पुढे थोडक्या संवत्सरात। हरिभाऊ पावले कैलासवास। नंतर त्यांचा कनिष्ठबंधू दादा चालवित। मठादिक व्यवस्था सर्व।।२२।। मुंबापुरीचे बळवंत भेंडे नौकर सावकारी। करीत असता क्षीण रोगेविकारी। त्यावर कृपा करती नृसिंहहरी। आरोग्य झाले तयाला।।२३।। बळवंत मातुश्री पांडुरंग दर्शनातुर। तिजसाठी करद्वय ठेवून कटीवर। श्री पांडुरंग विठ्ठलरुप अभयकर। धरिले वरदप्रभुंनी।।२४।। श्री गुरुस्वामी परमेश्वर। कृपादृष्टी करील जयावर। त्यासी चारी पुरुषार्थ प्राप्त होती साचार। काही न्यून नसेची।।२५।। दत्तात्रेय स्वामींची कीर्ति अपार। श्रवण करून लोक मुखे वारंवार। भृत्यासह गुरु सिध्दप्पा सत्वर। अक्कलकोटास पातले।।२६।। अक्कलकोट ग्रामाबाहेर। जंगमाचे मठात पातले सत्वर। अवलोकिती राजाधिराज दत्तदिगंबर। तेजस्वी सुंदर वरदमूर्ती।।२७।। मग ते गुरुसिध्दप्पा आनंदले। नृत्य गायन करू लागले। समर्थांचे चरणावरी लोळे । कृतार्थ केले मज म्हणती।।२८।। अंगी बाणली विरक्तता। करुनी चित्तवृत्ती एकाग्रता। काही अन्नपाणी न घेता। तटस्थ ते उभे राहिले।।२९।।

नंतर दत्तात्रेय प्रभूंनी दुसरे दिवशी। एक भाकर होती धनगरापाशी। ती घेऊन जंगम - सिध्दप्पासी। दिधली पारमार्थिक संज्ञेची।।३०।। समर्थांचा प्रसाद भक्षिता। वैराग्य विवेक उदयास येई तत्त्वता। हृदयी प्रकटली ब्रह्म - स्वरूपता। तेणे सत्य कृतार्थता पावले।।३१।। आप्पासाहेब मणूरचे पाटील। वैष्णव द्विज असून शुध्दभक्त प्रेमळ। समर्थांचे पादोदक उच्छिष्ट प्रसाद-निर्मल। घेती घरमंडळींसह।।३२।। हे पाहून खेड्यातील आद्य वैष्णव। रामाचार्यादिक मंडळींस वैषम्यभाव। चित्ती उद्भवूनी सगर्व। क्रोधे भाषण करिती।।३३।। त्यासमोर दोन श्लोकार्ध भागवतातील। तीन श्लोकार्ध भगवद्गीतेतील। तैसेची यजुर्वेद सामर्वेद संमतशास्त्र। वेदवेदांगज्ञ स्वमुखे म्हणून दाखविती।।३४।। हे विलक्षण कृत्य अमानुषिक। पाहून भ्याले विस्मित वैष्णव लोक। विद्या मदाभिमान उतरला क्षणिक। वारंवार लोटांगणे घालती।।३५।। एकदा मेहेंदरगीच्या कारागृहातील। काही कैदी पळून गेले बाष्कळ। अधिकाऱ्याने अन्यायी ठरवूनी जमादार। त्यासी कोरडे मारण्यास उभे केले।।३६।। मग तात्काळ मेण्यात बैसून। समागमे घेऊन बहुत सेवकजन। मेहेंदरगीस शीघ्र वेगे जाऊन। पोहोचले तेथे योगीश्वर।।३७।। वरच राहिला मारणाराचा हात। चळेना वळेना हे पाहून विस्मित। सर्व लोक होऊनी भयभीत। प्रार्थिती स्वामी समर्थांसी।।३८।। तिकडे कैदी शेतातून निघून। सहज त्या स्थळी आले आपले आपण। दत्तात्रेय स्वामींचे चरणदर्शन। करावया उभे ठेले।।३९।।

मारणारा होऊनी शरणागत। दत्तात्रेय स्वामीपदी बहु विनवित। तेव्हा त्याचा हात झाला पूर्ववत्। अगाधलीला स्वामींची।।४०।। यति धीपुरात परत येते वेळी। मार्गी पर्जन्यवृष्टी झाली। सांगा म्हणती पर्जन्या त्वरित गती। आमची जागा सोडून वर्षावे निश्चिती। पर्जन्याने तात्काळ आज्ञा मानली। धन्य धन्य खरेच गुरुराज माऊली।।४१।। अगम्य अतर्क्य ज्यांची लीला। थारा नुरेची संशय कल्पनेला। सर्वज्ञ सर्वसाक्षी सगुण अवताराला। धरिती जगदुध्दरणार्थ स्वलीले।।४२।। असो राहणारे पुणे शहराचे वस्तीस। आप्पासाहेब हसबनीस। त्यांस आणि त्यांच्या कुटुंबास। पिशाच्च संबंध बलाढ्य लागला।।४३।। श्रीमद्‌दत्तात्रेय नृसिंह सेवन। केलिया होईल व्याधी निरसन। ऐशा दृढतरे विचारे पुण्याहून। प्रथम अक्कलकोटी पातले।।४४।। म्हणती प्रभुरायाची आज्ञा गमनास। असल्यास जाऊ गाणगापुरास। स्वामी समर्थ वदती कशास। जाता राख रांगोळी होईल।।४५।। तेथेची राहूनी गुरुचरित्र पठन। नित्य करविती दत्तभटांकडून। नित्य ब्राह्मणासी घालिती भोजन। संतुष्टविती संकलांसी।।४६।। ऐसा पाच-सहा संवत्सर नियम। सर्व प्रकारे चालला अनुष्ठान धर्मक्रम। तेणे पिशाच्च व्याधीचा उपशम। जाहला मंदगतीने।।४७।। असो, मोंगलाईत धारासिंह नजिक। काजळे ग्रामी राहणारे एक। मराठे गोविंदराव मोहिते नामक। घरचे सुखी गृहस्थ ते।।४८।। त्यांसी पुत्रसंतान नव्हते म्हणून।

अक्कलकोटास दोन-तीन वेळा येऊन। समर्थास प्रार्थिती त्यावरून। प्रसाद दिधल्यावरी पुत्रसंतान लाधले।।४९।। गोविंदराव मोहिते यांनी स्वामीआज्ञेनी। शेतात विहिर खणली। त्या विहिरीस पाणी लागले पाहूनी। म्हणती प्रत्यक्ष परब्रह्म प्रज्ञापुरी।।५०।। या ग्रामीचा बापू कुलकर्णी द्विज। समर्थ सेवेत होता तीन वर्ष सहज। त्यासी प्रसन्न होऊनी यतिराज। कार्य सिध्द जहाले तयाचे।।५१।। म्हणून काजळ ग्रामी सुंदर स्थानी। दत्तात्रेय स्वामी पादुका स्थापूनी। मोठ्या उत्साहे गुरुपद सेवनी। लागुनी गाती गुरुलीला।।५२।। एक कोकणस्थ जातीचा ब्राह्मण। मोरोपंत बापट म्हणून। बडदाळ्यास जकात-कारकून। नाकेदारीचे कामावर होता।।५३।। प्रज्ञापुराहून गाणगापुरास जाणारे-येणारे। बडदळ्यास उतरती शिष्या बा रे। मोरोपंतांचे सदनी स्नान भोजन सारे। करुनी जाती येती राहती।।५४।। परंतु मोरोपंत प्रथम कंटाळा। करी देखूनी धिक्कारीत लोकांला। पुढे मास द्वयानंतर मोरोपंत दर्शनाला। अक्कलकोटास पातला।।५५।। स्वामीराजासी करी साष्टांग प्रणाम। तो बोलती आत्माराम परंधाम। आम्हाकडे येणाऱ्या जाणाऱ्याचे अप्रेम। वाटूनी अनादर करतोस काय?।।५६।। उगेच बसून त्यांची सेवा करावी। सत्य मृदुभाषणे भूते तोषवावी। तेणे पावशी सत्कीर्तिवान् पदवी। सुगती बरवी सत्य जाण।।५७।। आज्ञेनुसार त्या दिवसापासून। प्रज्ञापुरी गाणगापुरी येणारे जाणारे जन। त्यांची सेवा

आतिथ्य आदरे करून। करितसे मोरोपंत कुटुंबासह।।५८।। एक ऋग्वेदी विप्र गोविंदपंत कुलकर्णी। साठ वर्षांचा वयी शुध्दाचरणी। त्यास भोजन केले म्हणजे उदरात अग्नी। लागल्यासारखे वाटावे।।५९।। त्यास बोलती उमारमण। गोमूत्र आणि गाईचे शेण। सात दिवस केलिया भक्षण। व्याधी निरसन होईल।।६०।। पूर्वजन्मी वृध्दा धेनूस गांजले। त्या पातके तुज शूले पीडिले। हे परिसूनी गोविंदपंत विस्मित झाले। प्रत्यक्ष परब्रह्म गुरुदत्तात्रेय।।६१।। त्या योगे असत्य घोर व्याधी। सबीज नाहीसा झाला निरवधी। दु:ख गेले शूल उदरसंबंधी। अन्नपचन होऊ लागले।।६२।। एके मार्गशीर्षात दत्तजयंत्युत्सवकाली। प्रसादास फार गर्दी झाली। चोळाप्पा केशवादिक योगिराज्यांसी सांगती। तीनशे मनुष्यांपुरतेच शिजले अन्न असे।।६३।। तेव्हा योगीश्वर हिंगुलजा मातेकडील कडे। स्वहस्तातील काढुनी सांकडे। आणि अंबादेवीचा रौप्य टाक सगळे। म्हणती पुरणपोळीचे राशीत टाक।।६४।। मग टाक आणि कडे केशवाने। पूर्णान्न राशीत ठेविले नेटाने। लोकांच्या पंक्ती बैसल्या थाटाने। दत्तात्रेय जयंती प्रसाद भोजना।।६५।। कडे टाकादिक निमित्तमात्र। कर्ता करविता योगिराज स्वतंत्र। तीनशे मनुष्यांचे अन्नात चतु:सहस्र। पात्रे अधिक जेविली।।६६।। एकदा माघ वद्य गुरुप्रतिपदेसी। ब्राह्मण भोजन उत्साह दिवशी। केशव पाणीवाल्याने गाडीशी। जुंपिले वृषभ सुदृढचार।।६७।। तीन

ब्राह्मण गडी घेऊन बरोबर। मार्गी तुटले वृषभ कंठीचे जूं व्यसन। गाडी भाड्यांसुध्दा दोन द्विजांच्या अंगावर। पडली भांड्याखाली दडपले ते।।६८।। तथापि स्वामीराज गुरुमाऊली। त्यांची कृपादृष्टि दीनांवर गेली। गाडी भांडी जल भरलेली। अंगावर पडली असताही।।६९।। दोनही ब्राह्मणांचे शरीरास स्पर्श। भय दुःखाचा झाला नाही लवलेश। सांभाळकर्ता दत्तात्रेय जगदीश। असता भय दुःख कशाचे।।७०।। असो, शके सतराशे अठ्ठ्याण्णवांत। वैशाख शुध्द चतुर्थीपासून अवचित। ब्रह्मनिष्ठ वामनाची प्रकृती अत्यंत। बिघडली बहुत व्याधीने।।७१।। शरीरी उद्भवले अनेक रोग। ओढवला प्रारब्धदशा भोग। बहुत उपाय करिता उपयोग। काही झाला नाही।।७२।। परि प्रसन्न नृसिंह यतिवर। त्यांनी शरीरावरूनी फिरवूनी कर। आरोग्य होईल म्हणती धीर धर। तेव्हापासून व्याधी पूर्ण शमली।।७३।। मोठ्या दुष्काळातही वारंवार। सेवेकरी जनांस पक्वान्न भोजन पोटभर। मिळत होते कधी अन्नोदकासी लेशभर। तूट पडली नाही दत्तकृपे।।७४।। मुंबईतील लक्ष्मण नामे कोळी नर। मोठा खलाशी करीतसे व्यापार। एकदा जात होता जहाजात भरून माल। तेव्हा वारा सुटुन समुद्रात फार। जहाज माल मनुष्यांसुध्दा सत्वर। बुडू लागली समुद्रात।।७५।। दैववशात त्यासी झाले स्मरण। श्रीमद्दत्तात्रेय स्वामीस अनन्यशरण। होऊन म्हणे त्रैलोक्यात तारण। आपणावीन नसेची।।७६।।

एका क्षणात जहाज बुडालेले। चेंडूसारखे वर येऊनी तरले। हानी न होता लाभकारक झाले। योगीश्वर सहज लीले।।७७।। नंतर आठ दिवसांत लक्ष्मण कोळी। समागमें घेऊन घर मंडळी। अक्कलकोटास आला त्या काळी। श्रीदत्तगुरु दर्शनास।।७८।। समर्थांचे आशीर्वचन संपादून। गुरु उच्छिष्ट प्रसाद ग्रहण करून। संतुष्ट होत्साता गुरुस्मरण। करीत गेला स्वस्थली।।७९।। द्विजनारी जानकीस आंधळी दीन पाहून। कळवळले विश्वंभर दयाघन। गज-मूत्र नेत्रासी लावावे म्हणून। आशीर्वचन दीधले।।८०।। स्वामीसमर्थ आज्ञेनुसार। तिने नेत्रासी गजमूत्र लावीले तीन वार। तेव्हा जानकीस सत्वर। स्वच्छपणे दिसू लागले।।८१।। समर्थांची अघटित करणी। अगम्य अतर्क्य देव मनुष्या लागूनी। मारवाडी सेवक करी विनवणी। सार्थक व्हावे नृजन्माचे।।८२।। तेव्हा गुरुनाथे प्रबोधून तयासी। धाडिले आपल्या मारवाड देशी। तो कृतार्थ होऊन अहर्निशी। भजन करी सर्वदा।।८३।। एकदा पुणे मुंबईचे सुधारलेले। दत्तात्रेय स्वामींच्या दर्शनास आले। तेव्हा समर्थ नग्न दिगंबर ठेले। उभे कटीवर हस्त ठेवूनी।।८४।। ते छलक दर्शनार्थ उभे असता। न दिसती अवधूत परमात्मा तत्त्वता। परि तयांसी पश्चाताप होता। दिले दर्शन यतिवर्यांनी।।८५।। आज्ञाप्रसाद आशीर्वचन। घेऊन गेले स्वस्थानी प्रसन्नवदन। श्रीगुरुलीलामृत करिती प्राशन। सद्‌भक्तियुक्त सर्वदा।।८६।। केसे गावचा पाटील जंगम वाणी।

आप्पाराव सद्धर्म परायणी। यतिराजांची करी विनवणी। आपली चरणकमळे लागावी मम सदनी।।८७।। केसे गावी स्वामीचरण रज गृही। लागल्याविना मी अन्न खात नाही। ऐसा शुचिर्भूत गुरुभक्त आग्रही। उपोषण करीत बैसला।।८८।। स्वामी समर्थे स्वप्नी देऊन दृष्टांत। आम्ही उदयिक बसून मेण्यात। अक्कलकोट मार्गे असता जात। आपण मध्येच आडवे पडावे क्षणैक। म्हणजे तुमचे ग्रामी येऊ।।८९।। आता संशय टाकून करावे भोजन। तद्गृही भगवे मुखवस्त्र सोडून। त्यास आशीर्वचन अर्पून। अदृश्य झाले स्वामी समर्थ।।९०।। दुसरे दिनी स्वामी मेणा असता जात। अप्पाराव आडवा पडत मार्गात। यतिवर वदती भक्तांस। आम्ही जातो केसे गावी।।९१।। यति घरी येता अप्पारावे कुटुंबासह। श्री दत्तात्रेय प्रभुंचे तारक परत्र इह। तीर्थप्रसाद घेऊनी निर्मोह। पारणे सोडले सुखरूप।।९२।। पुढे लवकरची समर्थांनी प्रासादिक। अप्पारावास दिधले शिवबाण लिंगसम्यक्। नंतर यतिश्वरासी सन्मानपूर्वक। केसे-गावी नेऊन स्थापिले बाणलिंग।।९३।। सुंदर देवालय दृढ रचवून। त्यात स्थापिले सदाशिव उमारमण। ठेविले शिवलिंगाचे नामाभिधान। श्रीगुरुदत्तात्रेय स्वामी समर्थ।।९४।। अप्पांनी समर्थांच्या आशीर्वचनानुसार। काशीत 'स्वामीराज' नामे करून। गोकर्ण महाबळेश्वरी 'गुरुलिंग' नाम। तसेच श्रीशैल्य अन् रामेश्वरी जाऊन। स्थापिली लिंगे समर्थ नामे।।९५।।

हे अप्पाराव जंगम जातीचे असून। त्यांस नव्हता द्वेष मत्सर अभिमान। शुध्दमानस गुरुभक्तिमान। वैराग्यज्ञान-संपन्न होते ते।।९६।। त्यांचे चिरंजीव भीमराव नामक। नांदती गृहस्थाश्रमी सुखरूप। करिती स्वामीसमर्थांचे भजन। पावती सुखवृध्दि स्वामी कृपे।।९७।। निर्मळ मने शुध्दभक्तियुक्त। करिती जे गुरुलीलामृतपान नित्य। सर्व सौख्यार्थ तया होती प्राप्त। होती मोक्षार्थी गुरुप्रसादे।।९८।। जरी असो ब्रह्महत्येचे पातक। करी प्राणिमात्राचे हनन। करी क्षालन केल्याने हे पठन। होईल मन शुचिर्भूत।।९९।। षष्ठी चतुर्दशीस करून स्मरण। करिता हा अध्याय पठन। करी पतिताचे पालन। लखलखती हे ज्ञानाचे दीप।।१००।।

दावूनी अघटित लीला चमत्कार। तारिला सहज भक्त परिवार। धन्य धन्य ते नृसिंहवर। वर्णिल्या लीला सप्तमाध्यायी।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृतवाणी। अखंडीत घट परिपूर्ण ग्रंथातील चिरंजीव। स्वामी समर्थ आशीर्वादातीलसप्तमोऽध्यायः।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

आठवा अध्याय

## ।। ब्रह्मांडाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीमद्‌दत्तात्रेय अवधूत संचार करीत। राहिले कुंभारी येथील मळ्यात। सांगली संस्थानचे तात्यासाहेब पटवर्धन श्रीमंत। स्वामीदर्शनास थाटात आले।।१।। परीक्षा घेण्यास हिऱ्याच्या अंगठ्या दोन। समर्थांपुढे ठेवल्या पेढ्यात लपवून। परीक्षा काय पाहतो म्हणती यति हासोन?। पाषाणाच्या अंगठ्या परत घ्याव्या।।२।। आम्हा यतिंसी सुवर्णादिक रत्न। आणि मृत्तिका दगड समान। तात्यासाहेब विस्मितमुनि बोल ऐकून। म्हणती हे अवतारिक भगवंत।।३।। असो, कृष्णाप्पा एके दिवशी। बैसला असता समर्थांपाशी। अभ्यासास्तव विंचूरकर तयासी। रागे भरून बोलले।।४।। यति बोधिती विंचूरकरास ज्ञान। वेदवेदांग न्यायमिमांसा पठन। या परिस करावे हरिपाद सेवन। नित्य स्ववर्णाश्रम-धर्माचरण। व्हावे दया दान यथाशक्ती।।५।। असो, एकदा दादासाहेबास झाला कुष्ठरोग। यति म्हणती रत्न-मुद्रिका अर्पिता तो शमेल। ऐकून समर्था

सन्मुख ठेविली तात्काळ। तीन दिवसात कुष्ठरोग गेला।।६।। चौलकन्या राजुबाईला क्षयरोग लागला तदा। चोळाप्पा विनवी स्वामीराजपदा। तेव्हा शेणाच्या शुभा दुःखप्रदा। समर्थे दिधल्या चोळाप्पासी।।७।। दुश्चिन्ह दाविल्यावरी एक पक्षात। राजुबाई पावली अंत। अनंतब्रह्मांडाचे शुभाशुभ जाणत। परमात्मा अवधूत दिगंबर।।८।। असो, यति उतरले एल्लमाचे देवालयात। त्याकाळी महामारीचा उपद्रव फार ग्रामात। पाटील येऊनी प्रार्थना करीत। मत्पुत्र निरोप घेऊनी चालला।।९।। स्वामीराज वदती वाटुनी कडुनिंबाचा पाला। लावा मुलाच्या शरीराला। पाल्यात पाणी घालुनी पाजा मुलाला। करता तैसे पुत्र हनुमंत सावध झाला।।१०।। पाटीलपुत्र हनुमंत आरोग्यवंत झाला। महामारीचा उपद्रव निमाला। समर्थ पातले अक्कलकोटाला। अगाधलीला जयांची।।११।। नळदुर्ग ग्रामी गोपाल आणि मारुती नायिक। त्यांसी तिसरा सापत्न बंधु एक। ऐसे रहात होते सुखी धनिक। धाकट्या तिसऱ्याने स्वामींस केला नवस।।१२।। जरी मजला सारखा भाग येईल। तेव्हा चतुर्थांश धन त्यातील। दत्तात्रेय स्वामींस अर्पिन तात्काळ। सारखी वाटणी मिळाल्यास।।१३।। तयासी दशसहस्त्र रौप्य मुद्रिका प्राप्त। आणि गृहादिकांचा ही वाटा मिळत। तरी दत्तात्रेय स्वामींचा नवस धनलोभांत। बुध्दिपुरःसर विसरला।।१४।। पुढे नवल वर्तले स्वल्पकाळात। नायिकाने जे द्रव्य ठेवले होते पृथ्वीत। त्या सर्व द्रव्याचे कोळसे झाले त्वरित। परमेश्वर चरित्र अगम्य असे।।१५।। स्वामी वदती जे जैसे आम्हास भजती। तयासी तैशी होतसे फलप्राप्ती। भावनेसारखी सिध्दि

होय ती। तस्मात भावना शुध्द असावी।।१६।। असो जंगम मल्लिकार्जुन अप्पा नाम। कीर्तन करी मराठी भाषेत। ज्ञानेश्वरी गीताभागवत त्यासी अवगत। तो एके वेळी येऊन प्रज्ञापुरात। कीर्तन करू लागला।।१७।। कीर्तन आटोपल्या उपरांत। मल्लिकार्जुन येऊ लागले जंगमाचे मठात। तो मार्गात फाटकाचे वेशीत। गुरुदत्त स्वामी स्थित होते।।१८।। प्रियभक्त चोळाप्पा संगे खेळती। मल्लिकार्जुन पुसे तदा लोकांप्रति। कळले हेच असती अवतारिक यती। मल्लिकार्जुनास संभ्रम पाया पडावे की न।।१९।। तदा विश्वात्मा वदती अप्पास। आमची पंचाईत करितोसी कशास। पाया पडलास अथवा न पडलास। तरी आम्हा गरज नसे।।२०।। अंतरी जाणले हृद्‌गत। पाहूनी मल्लिकार्जुन झाला विस्मित। मृत्तिकेच्या ढेकळासारखा विरमत। शरणागत जाहला।।२१।। स्वामी चैतन्यात्मरूपे सर्वत्र सदा वसती। आम्हासी वेषधारी संन्यासी दिसती। यांची न कळे कोणा सामर्थ्यगती। अवतारकृती लीलेची।।२२।। तयांचे लीलामृतकर्णद्वारे करिता प्राशन। भयसंकट रोग होती नष्ट जाण। संसारभान सुटे जरा जन्ममरण। तुटे बंधन सत्य ते।।२३।। असो कोणी एक गोसावी प्रामाणिक। जटाधारी तपस्वी करी यात्रा अनेक। तैसेची श्रीसेतुबंध रामेश्वर दर्शन भाविक। करीत असता पादचारी।।२४।। दैववशात त्या गोसाव्यास। जलोदर-व्याधी उद्‌भवला त्रास। रोगवृध्दि होऊन उदर पावले वृध्दिस। चालण्याची शक्ती न्यून झाली।।२५।। गाणगापुराहूनी दहा दिवसांत। जलोदर व्याधिस्त पातला प्रज्ञापुरात। दत्तात्रेय गुरुंचा शोध करीत। मुरलीधराचे देवळात उतरला।।२६।। स्वामी

म्हणती वैरागीबुवा तुमची। इच्छा आहे श्रीकृष्ण भगवंत दर्शनाची। श्रीकृष्ण दर्शन लालसा तुमची। पूर्ण होईल असू द्या भरवसा।।२७।। कडुनिंब वृक्षाची पर्णे करावी भक्षण। प्रभुचे अमृतमय वचन श्रवण करून। निंबपत्रे भक्षिली पण टाकिली थुंकून। म्हणे कडू ही भक्षण नाही करवत।।२८।। यति हास्यवदने तया सांगती। पर्णे निंबाच्या दुसऱ्या शाखेची। करावी भक्षण अति प्रीती। भक्षिता त्याने अति गोड लागती। चकित गोसावी म्हणे असे ईश्वरलीला।।२९।। वैराग्यास अधिकची लागली गोडी। तेव्हा लोकही भक्षू लागले आवडी। भक्षुनिया सारे आश्चर्य मानती। म्हणती पूर्णब्रह्म प्रकटले।।३०।। उदरातील जडत्व रोगभार गेला। त्या योगे आरोग्य सावधपणा आला। स्वप्नासारिखा चमत्कार झाला। जलोदर नामही उरले नाही।।३१।। ऐशा त्या वैराग्यास श्रीकृष्ण। कळवळूनी त्रयमूर्ति आपण। महाविष्णु वासुदेव चतुर्भुजरूप धरून। देती दर्शन त्याकाळी।।३२।। कृष्ण पाषाण शिलामय मनोहर। द्वारकानाथ मूर्ती अतिसुंदर। गगन सदृश घन:श्याम शांताकार। लक्ष्मीकांत देखतसे वैरागी।।३३।। जिकडे पहावे तिकडे। द्वारकाधीश दिसे चोहीकडे। वैराग्यासी वेड भरूनी उडे। नाचे मोठ्या आनंदे।।३४।। म्हणे अहो! घुरु विश्वंभरा। महाविष्णु महेश्वरा। दत्तात्रेय स्वामी दयासागरा। अज्ञान अविद्यातीत केले मज।।३५।। परंतु विशेष एक नवल घडत। यतींद्रांची कर्णभूषणे सुवर्ण मौत्तिकयुक्त। दिसू लागली पाषाणावत। भक्तांनी मग काढली ती।।३६।। तद्नंतर चार मौक्तिके सुवर्णयुक्त। पुन्हा घातली यतींद्रांच्या कर्णात। याप्रकारे श्रीगुरुदेवदत्त। स्वामी

समर्थ लीला अपार।।३७।। असो जुन्नरची शूद्र स्त्री सखु नामक। तिज उद्‌भवला शोकप्रद श्वेतकुष्ठ। नंतर ती सखुबाई कन्येसहित। स्वामी दर्शनास धीपुरी आली।।३८।। समर्थ वदती बाई सखे। दुःख भोगितेस पर्वतासारखे। ऐकुनी वृत्त चरणदासमुखे। पातलीस सुखे जाशील।।३९।। बरे हा पांढरा दगड घेऊन। नित्य अंगासी लावीत जा उगाळून। यापरी आशीर्वाद देऊन। रोग शमनार्थ पाषाण समर्पिला।।४०।। एक मास लाविता उगाळून। कुष्ठरोग गेला नष्ट होऊन। पूर्ववत शरीर आरोग्य गौरवर्ण। जाहले श्रीदत्तकृपेने।।४१।। लिंबडीचे राहणारे द्विजवर्य। जयशंकर पुरुषोत्तम आचार्य। दत्तात्रेय स्वामींचे सद्‌भक्त अक्षय। ज्ञानवैराग्य संपन्न असती।।४२।। निष्कपट प्रेमळ सत्य मृदुभाषण। करिती सर्वभूती लीन होऊन। तैसे आपटेकर लक्ष्मण माधव नामेकरून। लोक म्हणती बाळाभाई।।४३।। स्वामीराजांचे असती दृढभक्त। उमिया शंकर मूळजी ओझाज्ञानी विरक्त। लखतरची गंगाबाई काशी शुद्‌धचित्त। जानकी धाकुबाई लक्ष्मीबाई आदिक।।४४।। तैसा चतुर्भुज ज्येठा तपोघन। गुरुदत्तात्रेय स्वामी-भक्ति परायण। ऐसे अनेक भक्त श्रीगुरुलीला - प्राशने करून। उध्दरले उध्दरती उध्दरतील।।४५।। असो, नळदुर्गातील तालुकदार पारशी। वैरामजीशेठ असता कारकुनांसी। जाऊ देत नसे अक्कलकोटासी। गुरुदर्शनासी अटकाव करी।।४६।। ऐसा अधिकारे मदोन्मत्त होऊन। करी निंदा धिक्कारी तो दुर्जन। दर्शनेच्छुंचे शुध्दांतःकरण। पाहूनी

समर्थ नळदुर्गासी पातले।।४७।। दिवाण बहादुरांचे सहज झाले आगमन। त्यामुळे सर्व कारकुनांसी झाले प्रभुदर्शन। हे सालरजंग फार योग्य न्यायमार्गे जाण। निःपक्षपातपणे वागत होते।।४८।। कारकुनांच्या पुष्कळ आग्रहे। वैरामजी गेला चमत्कार पहावया लवलाहे। श्रीफळ फुटती कर्पुर जळतो आहे। उभे तिष्ठती भक्तजन।।४९।। एक आनंदरूप सर्वांची वृत्ती। जाहली दर्शने श्रीभगवन्मूर्ती। हे पाहताची वैरामजीची शक्ती। नष्ट होऊन घाबरला।।५०।। शक्तिपात झाला बोबडी वळली। दत्तात्रेयस्वामी वदती त्याकाळी। त्वा फार अनुचित निंद्य कर्मे केली। जीव हिंसा दि भयंकर।।५१।। वारंवार घाली दंडवत लोटांगण। वैरामजी जाहला अनन्यशरण। म्हणे मायबाप कृपार्णव आपण। अपराध क्षमा करावे।।५२।। वैरामजी जाहला मुक्तदेह अहंकृती। एके रात्री तो विनवी स्वामीप्रती। मजला उपदेश द्यावा करी विनंती। मग बोलती अपरिग्रह यतीश्वर।।५३।। अनेक धर्मांचे हेचि असे तात्पर्य। आणि हाच उपदेश करणारा कृतकार्य। परोपकारार्थ परिश्रम अनिवार्य। करावे धैर्य धरूनिया।।५४।। कधी करू नये जीव-हिंसा। विनास्वार्थ दुसऱ्यासी पिडू नये सहसा। मोठा अधिकार संपत्ती यांचा भरवसा। चिरकालींचा मानू नये।।५५।। पक्षापक्ष निंदा द्वेष त्यागून। सत्यन्याय धर्म मार्गे असावे सद्वर्तन। सर्वदा करावे परमेश्वर भजन। दुर्व्यसन कोणतेही नसावे।।५६।। असावा योग्यायोग्य सारासार विवेक। अतीत अभ्यागतासी अर्पावे अन्नोदक। स्वहित

न्यायार्जित धने अबाधक। साधावे परहीत अवश्य ते।।५७।। बांधावे परोपकारार्थ वापी कूप तडाग। धर्मशाला विश्राम पथिकांसी उपयोग। जगी सत्कीर्ति वाढवून देहत्याग। होता ईश्वर पावती सद्भक्तिने।।५८।। सर्व धर्मांचे हेची उपदेश रहस्य जाणावे। प्रपंच परमार्थ साधून बंधमुक्त व्हावे। दया क्षमा शांतिसह शुध्दचित्त असावे। जन्माचे सार्थक होते तेणे।।५९।। श्रीदत्तात्रेय मुखे बोधामृत। श्रवणद्वारे प्राशन करुनी शुध्दचित्त। वैरामजीशेठ शांत होऊनी संतोषित। लोटांगण दंडवत घालीतसे।।६०।। त्या काळी नळदुर्गातील ब्राह्मण एक। दक्षिण रामेश्वराकडील पुराणिक। विद्वान म्हणविणारा गायक। वीणा वाजवूनी पुराण सांगे।।६१।। असो योगिराज आज्ञेनुसार। श्रीगुरुदेवदत्त स्वामीसमोर। एके दिवशी लोकांनी जमुनी एकत्र। पुराण मांडविले तयाचे।।६२।। ‘पुत्रावाचूनी नाही गती’। ऐशा थाटाची भाषणें पुराणिक बोलती। तेव्हा देवदत्तमहाराज पुसती। आहे काय पुत्र पोपटासी (शुकमुनींसी)। तनय आहे का वीणा धारकासी (नारदासी)। व्यासाचार्य वामदेवादिकांसी। पुत्र झाले होते का?।।६३।। नसताही पुत्र संतान। अनेक ऋषि मुनि योगिजन। श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ आचार्यवान्। झाले तारक जगासी।।६४।। एक आत्मज्ञानावाचून। सर्व कर्म निरर्थक जाण। म्हणूनी हृदयस्थ परमात्मा स्वामी दयाघन। आत्मज्ञानेची ओळखून कृतार्थ होती।।६५।। तेव्हा तो पुराणिक अनुतापयुक्त। विद्या धन मन दुराग्रहरहित। झालेला अनन्यशरणागत।

पावन झाला एक्यादर्शनेची।।६६।। त्या पुराणिकाची अंगना। दु:खी होती पुत्रसंताना विना। पन्नास वर्षाची वृध्द पतिआज्ञा। तत्पर होती सर्वदा।।६७।। श्रीस्वामीराज कृपेकरून। तियेस लाधले पुत्रसंतान। ऐसे श्रीगुरुलीलामृत गहन। यथेप्सित प्रापक।।६८।। श्रीस्वामी समर्थांचे नि:स्सीम भक्त। होऊन पुराणिक वर्तती आनंदे गृहस्थाश्रमात। स्वदेशी राहिले गुरुलीलामृत। पान करीत सर्वदा।।६९।। अक्कलकोटचा मोरोबा कुलकर्णी। कधी कधी त्याचे सदनी। स्वामीमहाराज बसती स्वेच्छे करुनी। एके दिनी आंगणात निजलेले।।७०।। सर्व सेवेकरी निद्रिस्त झाले। तो मोरोबाच्या स्त्रीचे पोट फार दुखू लागले। फारची व्याकुळ झाल्यामुळे। माध्यान्ह रात्री उपरांत।।७१।। ती उठुनी गेली विहिरीवर। प्राणत्यागार्थ सिध्द झाली सत्वर। आवेशे आत उडी टाकणार। तो इतक्यात स्वामीरायें।।७२।। जागृत होऊनी सेवकांसी शीघ्र उठविले। म्हणती विहिरीत कोण जीव देतो या वेळे?। त्यास सत्वर आणावे ऐसे। आज्ञापिले सेवकांसी।।७३।। मग उचलूनी आणिली समर्थांजवळ। तों जागृत झाले मोरोबांचे मंडळ। घाईघाईने उठूनी तात्काळ। सद्‌गुरु चरणासमीप पातले।।७४।। मोरोबाच्या स्त्रीस ओळखिले सर्वांनी। आत्महत्या का करीत होतीस जीव देऊनी?। कृष्ण अमावस्येस घोर रजनी। साहसास प्रवर्तलीस का?।।७५।। देवराये पाहिले कृपादृष्टीने। पळून गेले पोट दुखणे। सर्व म्हणती समर्थांचे अघटित करणे। जीवदान दिधले आज।।७६।। सर्वज्ञ

सर्वसाक्षी सर्वांतरी। व्यापक परमात्मा आपण चराचरी। लोकानुग्रहार्थ बसूनी प्रज्ञापुरी। तारिता जीव असंख्यात।।७७।। अगम्य अतर्क्य समर्थलीला। काय समजे मंदमतिला। शरणांगत नम्र दीनांला। सांभाळावे परोपरी।।७८।। असो अक्कलकोटचे मालोजी महिपती। निघाले जावया सोलापुरे प्रति। दत्तात्रेय स्वामींसी नमूनी विनविती। गव्हर्नर साहेबांचे भेटीस जातो।।७९।। तेव्हा नृपतीच्या दत्तात्रेय स्वामींनी। डावे हातात दिधली पिकदाणी। उजवे हातात तलवार देऊनी। जावे म्हणूनी सांगितले।।८०।। गव्हर्नर साहेब गेल्यानंतर। अक्कलकोटासी पातले मालोजी नृपवर। बुधवार पेठेत जाऊनी सत्वर। वंदिले ईश्वर दत्तगुरु।।८१।। मालोजी नृपती करी विनंती। आपण तलवार दिधली होती हाती। त्याचा अनुभव मिळाला मजप्रती। मोकळीक जाहली हत्यारांची।।८२।। असो अक्कलकोट संस्थानात। एक अधिकारी होते परदेशीय श्रीमंत। त्यांजजवळ तान्ही नायकीण नामे गणिका वसत। चतुर मोहक गुणसंपन्न।।८३।। ते अधिकारी तेथून गेल्यावर। तिने सोडला गणिका व्यवसाय। तीर्थयात्रा मंत्र जागरण कीर्तन पुराण। पुष्कळ धन खर्चुन ती करितसे।।८४।। ऐळमेल्ली ग्रामाची राहणारी। वैराग्यसंपन्न सदाचारी। अनेक यात्रा करून स्वनगरी। ऐळमल्लीत राहिली।।८५।। एके समयी देवाधिदेव यतीश्वर। ऐळमेल्ली ग्रामी सेवक फार। समागमें असून सुखकर। उतरले सदनी देशपांड्यांचे।।८६।। दिवसा रात्री लोकांची दाटी। दर्शन पूजन समर्थांच्या

गोष्टी। तान्ही निरंतर शुद्‌भावे भेटी। घेऊनी घाली मिठी दत्तचरणी ।।८७।। परगावचे लोक फार येऊ लागले। म्हणूनी समर्थांनी भोजन न केले। शिष्यवर्गानी बहुत विनवले। तथापि न भक्षिले काहीच।।८८।। असे पाहून श्रीपादभट अनंत। हे तान्ही गणिकेस म्हणत। विनवूनी श्रींस घालावे भोजनास। ती म्हणे म्या गणिकेने संन्याश्यास। भोजन कैसे घालावे?।।८९।। श्रीपादभटाज्ञेने तिने फळे पेढे आणविले। प्रार्थना करुनी प्रभुपुढे केले। तेव्हा जगद्‌वंद्य दत्तात्रेय म्हणाले। तू बाटवितेस काय आम्हासी?।।९०।। ऐकून गणिकेचा पूर्ण विश्वास। जडली प्रभुपदी जे तारक या विश्वास। साक्षात् मुक्तिदायक ज्यांचे निश्वास। तत्कृपे ती धन्य जाहली।।९१।। एकदा कोनळी ग्रामातून हिंडत असता। सर्व सेवक उपवासी व्याकुळ असता। श्रीपादभट विनवी समर्था। आपण वृक्षतली बसावे।।९२।। यतिवर बैसले शेतात जाऊनी। भोजनार्थ सेवकवर्ग करिती प्रभू विनवणी। स्वामी म्हणती जावे आम्रतरुखाली। श्रीपादभट गेला परशुरामादिसह।।९३।। तो तेथे एक स्त्री सुवासिन। उभी होती प्रसन्नवदन। श्रीपादभटाचे ऐकून वचन। सिध्दान्न उदकासह तिने दिधले।।९४।। अरण्यात यत्किंचित पदार्थ नसून। अन्नपूर्णा हस्ते अपार अन्न। अशा दुर्घट प्रसंगी देववून। घातले भोजन यथास्थित।।९५।। अन्नपूर्णा परिपूर्णा। सदाशिव शंकराची प्राणवल्लभा अपर्णा। आम्रवृक्षाखाली मूर्ति करुणा। देखिली भाग्ये थोडक्यांनी।।९६।। एकशत भक्त सेवकऱ्यांसी। गुरु

परमात्म्याचे आज्ञेसी। अन्नपूर्णेने अर्पून बहुत अन्नासी। दाविला प्रसंगी अनुभव तो।।९७।। ऐसे अपार श्रीगुरुलीलामृत। श्रवणद्वारे प्राशन करा हो भक्तियुक्त। सकल सिध्दिदायक सदोदित। असे निश्चित नि:संशय।।९८।। अमोल असा हा ठेवा। इहलोकी मांडीला। करी सत्य सेवा। गुरुसेवेसी धाडिला। पाहूनी म्हणती गुरुभक्ता। आहे मी तुजपाशी।।९९।। परम्शिष्य होऊनी लीन। करती याचे सप्तमीस पठन। चेडादी भयानक अपमृत्यु आदींचा। असे भडीमार रोगादिकांचा। मायेत सर्व नाश करविती। देती सुखाचे आच्छादन।।१००।।

भक्तवत्सलस्वामी महाराज। लीला जयांची असे अगाध। साक्षात अन्नपूर्णा झाली प्रसन्न। अष्टमाध्याय झाला संपन्न।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृतवाणी। अखंडित घट परिपूर्ण ग्रंथातीलचिरंजीव। स्वामी समर्थ आशीर्वादातीलअष्टमोऽध्याय:।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

## नववा अध्याय

# ।। अनंतकोटी ब्रह्मांड नायकाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

आत्मानंदे ब्रह्मादिक लोकही आनंदास पावती। सर्व आनंदांपेक्षा अत्याधिक स्थिती। या कारणाने आत्मानंद उत्कृष्ट वेदादि म्हणती। तोच जीवाचा परमपुरुषार्थ रूप आहे म्हणती। तोचि अनुभवती महात्मादिक।।१।। ऐसा सर्व जीवांचा परमात्मा परमपुरुष। ध्याती सर्वदा परब्रह्म निर्विशेष। तो दत्तात्रेय स्वामी धरूनी नरवेष। प्रज्ञापुरी वसतसे।।२।। ईश्वरकृपे मालोजी नृपवर। राज्यपदारूढ झाले प्राप्त सर्वाधिकार। मग अश्विन मासांत दत्तदिगंबर। अक्कलकोटास विराजले।।३।। असो स्वामीराज वरप्रसादेकरून। मालोजी रावास पुत्रसंतान। प्राप्त झाले अमोलिक रत्न। 'शहाजी' नाम राजपुत्राचे।।४।। या आपुल्या शहाजीरायें। श्रीमंत शिंदे-होळकरांसी उत्तमाशये। बाल्यावस्थेत शौर्य-धैर्य-चातुर्ये। संतुष्ट केले प्रज्ञापुरी।।५।। पुढे राज्याधिकार झाला प्राप्त। समारंभपूर्वक स्वराज्यांत।

तथापि शहाजीराजे शांत चित्त। क्षमायुक्त विराजती।।६।। रायासी असे त्रय कन्या संतती। पुढे विलक्षण प्रारब्धगती। नृपेंद्राच्या प्रकृतीस विकृती। अकस्मात् उद्‌भवली।।७।। शालिवाहन शके अठराशे अठरावरी। प्लवंग नाम संवत्सरी। मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी गुरुवारी। शहाजी कैलासवासी जाहले।।८।। असो सोलापूर पत्तन नामक। तेथे कुलीन सद्‌गृहस्थ एक। टिकाजी नामक वसती स्थायिक। निःस्सीम भक्त पांडुरंगाचे।।९।। पिराजी नामक त्यांचे ज्येष्ठ पुत्र। अक्कलकोटी पातले भक्तियुक्त। श्रीस्वामी समर्थ गुरुदेवदत्त। तत्पाददर्शनाकारणे।।१०।। ऐसे अतिमहानंद समयी। पिराजीरावें त्या गणेश देवालयी। येऊन साष्टांग दंडवत घातले पायी। दत्तात्रेय स्वामी समर्थांच्या।।११।। उभे ठाकले जोडून पाणि। तो दैदीप्यमान मौक्तिक कर्णी। ऐसे प्रत्यक्ष विठ्ठल चक्रपाणि। रूप निरखूनी विस्मित जाहले।।१२।। मग स्वामीराज चरणकमली। पिराजीराव दंडवत घाली। प्रार्थी आपण प्रत्यक्ष विठ्ठल माऊली। कृपा केली दीनावर।।१३।। यतीश्वरे स्वकंठातील पुष्पहार। पिराजीच्या गळ्यात घातला कल्याणकर। आशीर्वाद प्रसाद घेतल्यावर। दंडवत करुनी गेले ते।।१४।। कोकणची स्त्री पुरुषे दोन्हीं। श्रीसमर्थ दर्शनास आली होती। इतक्यात त्रय पुत्रासह बसाप्पा तेली। समर्थ दर्शनास पातला।।१५।। तेव्हा जगद्‌गुरु द्विजस्त्री राधाबाईस म्हणती। हे त्रय तुझे पूर्वजन्मीचे पुत्र असती। आणि हा म्हातारा

बसाप्पा तेली। तुझा नवरा होता माय गे।।१६।। मागील जन्मी तवसदनी रंगीत स्तंभाखाली। तू तुझ्या हस्ते पुरून ठेवलेली। मोठी हंडी पुष्कळ द्रव्याने भरलेली। ती उकरून काढी स्वहस्ते।।१७।। त्वा निर्लोभ बुध्दिने ते सर्व धन। तेल्यास द्यावे म्हणजे तो दारिद्र्यहीन। होऊनी तुला पुत्रसंतान। प्राप्त होईल सत्य मानी।।१८।। दत्तात्रेय आज्ञेनुसार। त्या स्तंभाखाली निघाले धनपात्र। राधाबाईने स्वहस्ते दिले तेल्यास। द्विज दांपत्य स्वग्रामी परतले।।१९।। स्वामीमहाराजांच्या आशीर्वादे करून। द्विज स्त्रीस प्राप्त झाले पुत्रसंतान। पुढे त्या पुत्रासह ते दांपत्य जाण। स्वामीकृपे सुखी झाले।।२०।। शके सतराशे चवऱ्याण्णव संवत्सरी। ब्रह्मनिष्ठ वामनबुवा ब्रह्मचारी। गेले तेव्हा पटवर्धनाचे गणेश मंदिरी। नृसिंहमूर्ति विराजित होती।।२१।। त्यांनी श्रीफलादि पदार्थ पुढे ठेविले। अन्योन्य भावे नमन केले। तेव्हा स्वामी कडाडून बोलले। कच्चे मडके भाजून दिले। परमार्थ आत्मसाक्षात्कार झाले। तरी आता परत जावे। ऐकूनी समर्थवचन शोकाकुलित झाले ते।।२२।। प्रत्येक वर्षी निघते वेळी। श्रीदत्तात्रेय गुरुमाऊली। उत्तम प्रसाद द्वय पूगीफलीं। बोळवीत होती नियमाने।।२३।। मजकडून काय घडला अन्याय। प्रसाद तोही न मिळाला या समयास। म्हणून खिन्न झाले मानस। स्टेशनमार्गी वामनबुवा निघाले।।२४।। तेव्हा त्यासी परत बोलावून। स्वामीराज बोलती हासून। तुझी पक्की परीक्षा झाली

पाहिले मन। या खेपेस योगशास्त्राचे प्रश्न। आम्हास विचारावयासी।।२५।। आला असून आज्ञे गेलास परत। तेणे आम्ही झालो संतोषित। आता रहावे स्वस्थ चित्त। एकमास अवश्य येथे।।२६।। नंतर योगशास्त्रातील प्रश्नोत्तरे। सर्वोत्कृष्ट अनुभवासह युक्तिप्रकारे। बोधिले स्वये गुरुदत्त-दिगंबरे। ब्रह्मानंद लहरींची।।२७।। सर्वज्ञ सर्वसाक्षी स्वयंप्रकाश। हृदयी प्रकटूनी अर्पिले निजयश। करवूनी मुक्त माया अविद्या पाश। निजात्मरूपी स्थिर केले वामनबुवांसी।।२८।। त्रयमूर्तिंचा अवतार साक्षात। कारुण्यसिंधु आनंदभरित। स्वच्छंद व्यवहारी सद्‌गुरूनाथ। जगन्नायक जनार्दन।।२९।। ज्याचे लीलामृत श्रवणें। उठे संसाराचे धरणे। नाना संकट पीडा टळणे। गंडांतर अपमृत्यु।।३०।। ते गुरुस्वामी चिदंबर। अक्कलकोटी स्वेच्छाचार। अंत्यज वाड्यात दिगंबर। विराजित होते एके काळी।।३१।। असो, एक दारिद्र्ये पीडिलेला ब्राह्मण। कोकण देशाचा राहणार असून। कर्मिष्ठ अक्कलकोटी येऊन। राहिला होता संशयी।।३२।। हातांत घेऊन मोठी हाडके। खेळती समर्थ अभेदे कौतुके। निर्भयपणे तुटती हाडके देखे। फेकती मागविती पुनरपि।।३३।। त्यात एक सेवेकरी। ब्राह्मणासी म्हणे सोवळे भारी। ऐशीच हाडके तुमच्या शरीरीं। खिळिली आहेत सर्वांगी।।३४।। तेव्हा विप्रास

बोलती दत्तात्रेय स्वामीराय। यातून नेववेल तितक्या अस्थि घेऊन जाय। दारिद्र्य समूळ पावेल क्षय। मानसी संशय नसावा।।३५।। ब्राह्मण निरुपाय होऊन। सदाशिव प्रभुंची आज्ञा मानून। त्यांतून काही हाडके घेऊन। निघाला कोकणात जावया।।३६।। दत्तात्रेयासी करुनी साष्टांग नमस्कार। आशीर्वाद संपादून सत्वर। कोकणात घरी गेला विप्र। कांतेसी वृत्त कळविले।।३७।। मग हाडकांची आणुनी गाठोडी। गुप्तपणे सोडली तातडी। टाकूनी विटाळ बुध्दि कुडी। पाहू लागली उभयता।।३८।। तो उत्तम प्रकारचे सुवर्ण दिसले। अस्थिंचे नामची नाही उरले। दत्तात्रेयगुरु प्रसन्न झाले। दारिद्र्य गेले जन्माचे।।३९।। नंतर कुटुंबासह ब्राह्मण। अक्कलकोटी येऊन। श्रीगुरुंचे यथासांग पूजन। करी ब्राह्मण भोजनाते।।४०।। पंढरपुरी असाच एक मराठे जातीचा नर। गलित कुष्ठरोगे व्यापलेला फार। भिक्षान्न मागूनी भरी उदर। गरीब सात्त्विक शहाणा।।४१।। तेथे पांडुरंगाचे करी दर्शन। निर्वाह करी भिक्षा मागून। तोंड टाकून वसा वसा वचन। क्रोधाविष्ट बोले मराठा।।४२।। त्या पांडुरंगक्षेत्री एक सात्त्विक संत। तयासी करुनी साष्टांग दंडवत। म्हणे भोग दुर्धर सोसवत। नाही नाही आतां हो।।४३।। ते सांगती उपाय त्यास। जावे त्वा अक्कलकोटास। घे स्वामी समर्थांचे दर्शनास। आरोग्य होईल

बरवे।।४४।। पादचारी मंदगती। पातला अक्कलकोटाप्रति। खंडोबा देवळाजवळ वस्ती। केली मठात तयाने।।४५।। जाऊनी देखिले भगवंत। घातले चरणी दंडवत। तयासी म्हणती समर्थ। साधू-आज्ञेने आलासी।।४६।। तेव्हा एका विप्रास वदति अत्रिनंदन। तुमच्या सदनांत चंदनवृक्ष उत्तम। त्या चंदनाचे जुने खोड सप्रेम। आम्हासी आणून द्यावे।।४७।। त्याने ते आणून दिले गुरुराया। समर्थांनी करी घेऊनी तया। गलित कुष्ठियासी पाचारूनिया। अर्पिले कृपा कटाक्षें।।४८।। म्हणती उदकात करुनी घर्षण। अंगासी नित्य करावे मर्दन। गलित कुष्ठियाचे भाग्य उदेले म्हणून। आशीर्वचन मिळाले।।४९।। मासपक्ष अंगासी सुगंध। उगाळून लाविता रोग निरोध। होऊनी शरीर कुष्ठरहित शुध्द। दिसू लागले निरामय।।५०।। जयासी पूर्ण गुरुकृपा लाधे। तयासी रोग गंडांतर अपमृत्यु न बाधे। सहाजिक तयाचे कार्य साधे। कृतार्थता पावे नर।।५१।। प्रियभक्त चोळाप्पाचे भविष्य। समर्थांनी पूर्वीच कथिलेले भय। त्याप्रमाणे मध्यान्ह रात्रीचा समय। त्या काळी चोळाप्पास उपद्रव झाला।।५२।। आश्विन शुक्ल नवमी तिथीस। चोळाप्पा सत्पुरुष दिवसास। देह त्यागुनी निजधामास। पावले दत्तात्रेय महाराजांच्या।।५३।। परब्रह्मस्वरूपी एकत्र समरस। निमग्न झाले विश्रांतीस। पार नाही

चोळाप्पाच्या पुण्यास। धन्य धन्य तो महाभक्त चोळा।।५४।। असो एकदा अक्कलकोटा सभोवती। फिरत होते योगींद्र युथपति। तयांसी भाऊसाहेब जहागिरदार विनविती। आमचे नीलेगावी चलावे।।५५।। तेव्हा बाळाप्पा कृष्णाप्पा श्रीपादभट। दत्तात्रेय गुरुवरांसी विनवित। आजपर्यंत नीलेगावी न गेलो आपण। करा मनोरथपूर्ण भाऊरायांचे।।५६।। मग भाऊसाहेबास वदति भक्तजन कैवारी। तुमचे गावास येऊं शनिवारी। हे परिसूनी जहागिरदारास भारी। आनंद चित्ती जाहलासे।।५७।। पुजारी भक्त सेवेकरी। सेवेत संगे घेऊन त्रैमूर्ति अवतारी। निघाले यावया निलेग्रामी सत्वरी। ते शुभवृत्त कळले जहागिरदारा।।५८।। दर्शन घेऊन अत्यादरे स्वसदनासी नेले। प्रभूंसी उत्तम सिंहासनी बैसविले। पुष्कळ लोक दर्शनासी पातले। महद्दर्शने आनंदले सर्वत्र।।५९।। मंगल स्नान झाल्यानंतर। उत्तम सिंहासनी बैसविले दत्तदिगंबर। लेवविले वस्त्रालंकार। सुगंध चंदन तिलक उटी लाविली।।६०।। पुष्पहार कंठी भाळी कस्तुरी तिलक। त्यावरी तंदुलाक्षता शुभदायक। धूप दीप निरांजन नैवेद्यादिक। षोडषोपचारें पूजिले देव।।६१।। भाळीच्या अक्षतांतील तीन। पडले कुंकुमोक्त तंदुलकण। ते समर्थांनी तात्काल केले अर्पण। भाऊसाहेबासी प्रसादरूप।।६२।। भाऊसाहेबांनी दोन तंदुल भक्षिलें। स्त्रीने

एक तंदुल भक्षण केले। समर्थांसी वंदुनी पात्र मांडीले। जाहले भोजन पक्वान्नयुक्त।।६३।। भाऊसाहेबांचे प्रिय पत्नीस। ऋतु प्राप्त होऊन षोडशवर्ष पर्यंत। संतान नव्हते झाले प्राप्त। ते यतिकृपे प्राप्त झाले।।६४।। नंतर मार्गशीर्षात दत्तजयंती उत्सवास। स्त्रीपुत्रासह भाऊसाहेब आले प्रज्ञापुरास। घातले पायावरी कन्यातनयास। वंदुनी स्तविले विश्वंभर।।६५।। म्हणती ते पुन्हा निलेगावी भगवंत आगमन। व्हावे सर्वत्रांसी मंगलप्रददर्शन। पतितपावना करुणा घन। भक्त प्रार्थना मान्य व्हावी।।६६।। तेव्हा आज्ञापिती गुरुदत्तात्रेय। तुमचे ग्रामी शनिवारी येऊं सुनिश्चय। भाऊसाहेबास आशीर्वचन अभय। प्रसादासहित प्राप्त झाले।।६७।। असो, पुढे शके सतराशे नव्याण्णवात। माघ कृष्ण द्वितीयेस बुधवार पेठेत। जंगमाचे मठात श्रीदत्तावधूत। अद्‌भूत चमत्कार दाविती।।६८।। श्रीफल अन्य फलादिक। पुष्पाहार वस्त्रालंकार अनेक। जितके अर्पण करिती लोक। तितके सकल पदार्थही।।६९।। त्या शिवलिंग बाणावरी। ठेवूनी अग्नि लावूनी झडकरी। प्रज्ज्वलीत करून भारी। होम करिती जगदीश।।७०।। नारायण वासुदेव बर्वे कारभारी। यांजकडे जंगमे फिर्याद केली पुजाऱ्यावरी। आमचे लहान शिवालयात पिंडीवरी। होम केल्याने हानि फार झाली।।७१।। मग बर्वे कारभारी यांनी।

कृष्णाप्पा श्रीपादभटांसी पाचारूनी। म्हणती जंगमाची झाली असेल खरी हानी। तरी बंदोबस्त करावा।।७२।। शोधपूर्वक करावा न्याय। म्हणूनी देखती शिवलिंग देवालय। तो त्यात कोठेही किंचित हानी अपाय। झाला नाही सर्वथा।।७३।। असो जंगमाचे ते लहान शिवालय। बाणलिंगासह पूर्ववत यथायोग्य। जशाचे तसे पूर्व लक्षणमय। अद्यापपर्यंत आहे ते।।७४।। शालिवाहन शके अठराशे पूर्णात। बहुधान्य संवत्सरी चैत्र मासांत। वद्य प्रतिपदेस अक्कलकोटांत। पातले अनंत विश्वेश्वर।।७५।। तीन चार दिवसानंतर। यतिंच्या शरीरी उद्‌भवला ज्वर। दर्शनासी येती वैद्य -गणक -द्विजवर। ग्रहपीडा शांती करविती।।७६।। कृष्णाप्पा श्रीपादभट पुजारी। भक्त दास साधु संत सेवेकरी। सर्व म्हणती त्रिपुरारी। आम्हासी टाकूनी कोठे जाता।।७७।। शालिवाहन शके अठराशे पूर्ण बहुधान्य संवत्सर। चैत्रमास कृष्णपक्षी चतुर्दशी भौमवार। प्रीतीयोग रेवती नक्षत्री विष्टी करणात। शुभवेळी शुभलग्नी शुभमुहुर्ती।।७८।। कन्या लग्नी स्थिर सिंह नवमांशी। शुभादि शुभग्रह केंद्री त्रिकोण स्थानांसी। चंद्रग्रह समर्थांच्या मीन राशीसी। यथायोग्य स्थानापन्न होते।।७९।। शुध्द स्वस्तिकासन घालुनी। सुगंध पुष्पहार वस्त्रभूषणी। संपूर्ण जनासी सौख्याशीर्वचनी। परमानंदरूपे संतोषविती।।८०।। कृष्णाप्पा

श्रीपादपुजारी। पूजा आरती करिती भक्त सेवेकरी। इतुक्यांत स्वामी समर्थ पूर्णावतारी। कैवल्य निजानंदी निमग्न झाले।।८१।। पुजारी कारभारी आदिकांनी। योगीश्वर पादपूजा विध्युक्त करुनी । सुशोभित विमानात बैसवूनी। अनेक वाद्ये वाजवीत।।८२।। समर्थांचे आज्ञायुक्त। बुधवार पेठेतील चोळाप्पाचे स्थानांत। समाधीस्थळ विवर विराजित। केलेले पूर्वीच सिध्द होते।।८३।। ज्या ब्रह्मानंद समाधी गुहेत। बहुत वेळा बैसले होते अवधूत। त्या पूज्य स्थानाकडे त्वरित। परम समारंभे निघाले।।८४।। नाना विविध वाद्ये वाजवीत। सुस्वर गायन भजन प्रेमभरित। रथाश्व गज-भेरी मृदुंगसहित। सैन्ययुक्त नृपवर्यासह।।८५।। हवऱ्या नळे चंद्र-ज्योती। दारू सोडीत समारंभे अति। समर्थांस विमानात बैसवोनि प्रीती। नाम गर्जत चालले पेठेत।।८६।। दिव्य अमौलिक वस्त्रभूषणी। पूजन उत्तम प्रकारे होऊनी। ब्रह्मानंद प्रिय-गुहेत उत्तमासनी। बैसविले स्वामी समर्था।।८७।। चौघडे वाद्यादिकांचे गजर। आरती मंत्रपुष्पांजलींचा उच्चस्वर। प्रसाद वाटल्यावरी जनसमग्र। परतले सदनी महद्दुःखे।।८८।। तो दुःखाचा वियोग-जन्य कठीण डोंगर। किंवा उचंबळला दुःखरूप सागर। वर्णिता हृदय इंद्रिये शरीर। तटस्थ होती वियोग दुःखे।।८९।। मंगळवारी निजानंदी बैसले। पुढे

पाचवे दिवशी अद्‌भूत नवल झाले। शनिवारी पुरुषोत्तम स्वामीराज पातले। नीलेगावी भक्त सेवकांसह।।९०।। भाऊसाहेबांसी दिधले होते वचन। शनिवारी येऊ देऊं दर्शन। त्याप्रमाणे ग्रामाबाहेर वृक्षतळी उतरून। दिधले दर्शन शनिवारी सर्वांसी।।९१।। धन्य स्वामी समर्थांची लीला। धन्य प्रज्ञापूरच्या नित्य श्री नित्यमंगला। साष्टांगनमन असो त्या दयाळा। कृपा असावी आम्हावरी।।९२।। श्रीस्वामी देव दिगंबर। निजानंदी निमग्न झाल्यावर। वारंवार भक्तांसी कृपासागर। पूर्ववत सगुणदर्शन देती।।९३।। समाधीचे दर्शन पूजन अर्चन। प्रेमे करिती जे सेवन। त्या सर्वांचे मनोरथ सिध्द होऊन। होती पावन निःसंशये।।९४।। स्वामी समर्थांच्या समाधीसमोर। जे पुराण कीर्तन भजन गाती सुखकर। प्रदक्षिणा स्तोत्रे नमस्कार। सप्ताह पारायण करती विद्युक्त जे।।९५।। समाधीवर दत्तचरणांवरी। पुरुषसुक्त रुद्राभिषेक प्रेमभरी। लघुरुद्र महारुद्रादि वेदमंत्री। करिती ते सर्व भोगिती सुख इहपर।।९६।। दत्तात्रेय चरणारविंदा संन्निध। वेदघोष वेद पारायण भक्तियुक्त शुध्द। करिती तयांचे मनोरथ सिध्द। अवश्य होती निश्चयात्मक।।९७।। त्या समाधीस्थानाच्या सेवनेकरून। भूत प्रेत पिशाच्चादि सर्व बाधा प्रशमन। कुष्ठरोग महारोगादि व्याधी संपूर्ण। होती निरसन सत्य सत्य।।९८।। विद्यार्थियांसी

विद्या प्राप्ती। धनार्थियांसी धनलाभ निश्चिती। पुत्रार्थियांसी पुत्रफलें लाधती। दत्तचरण पादुका सेवनाने।।९९।। अष्टमीस करिता पठन। होई अमृताचे सारण। न्हाऊन निघेल जीवन। सत्य हे जाणावे।।१००।।

भक्ताभिमानी भक्तवत्सल। श्रीमद्‌दत्तप्रभू यतिवर। अवतार समाप्ती करुनी नंतर। अवस्थातीत ते गुरुवर। तयांच्या चरणी नमस्कार। ज्यांनी करविला हा ग्रंथ साकार। चरणी त्यांच्या हे पुष्प वाहून। नववा अध्याय होई संपूर्ण।

इति श्री स्वामी नवशती। गुरुलीला अमृतवाणी। अखंडीत घट परिपूर्ण ग्रंथातील चिरंजीव। स्वामी समर्थ आशीर्वादातील नवमोऽध्यायः।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

।। श्री ।।

# ।। फलश्रुति ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामीन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

कृपाछत्रधारी अमित तेजस्विनी। असे हे स्वामी। ज्ञान पात्रातूनी। ज्ञानमयरस शिंपडती।।१।। जेणे उघडती कवाड। मायारूपी पुतळ्याची। होऊनी आत्म्याचा साक्षात्कार। राखी परमात्म्यात ठेव।।२।। धाडिले फर्मान। या गुरुंनी अक्कलकोटातूनी। पोहोचती पुण्य चिंचवडग्रामी।।३।। असा हा संजीवनप्रकाश। उजळवी गणेश पामरास। होऊनी तळमळ मनाची। शोधावी अध्यात्माची ठेव।।४।। पूर्ण करून घेसी। पुण्य असा हा ग्रंथ। नाव तयाचे। स्वामी अमृतसार नवशती।।५।। प्रेरणेने स्वामींच्या। गणेशाचे मन चालवी। माते समान प्रियंवदा जोशींनी तो लिखिला।।६।। तेच अमृतज्ञान। भक्तांसाठी रचित आणिला। प्रार्थुनी श्रीस्वामींस। अमृतघट करविला।।७।। जरी पठणे। करिता हा ग्रंथ। ठेवूनी

उदक। त्या फुलपात्रात।।८।। सोबत ती। विष्णुप्रिय। तुलसीपत्रे तयात।।९।। पठण करते समयी। होऊनी संस्काराने ते तीर्थ। करिता प्राशन। ठेऊनी मस्तक स्वामीचरणी।।१०।। करोनी स्थिर हे चित्त। सद्‌गुरुस स्मरोनी। ढवळली माया। दावी समृद्धी सुखाचा मार्ग।।११।। घेऊनी शिदोरी मातृपितृ आशीर्वादाची। उजळवी जीवन लखलखती कोटी कोटी दीप।।१२।। स्वामी घालती भिक्षा या पात्रात। करावया ज्ञानदीप। दावी प्रकाश या जड मायेत। सारिती तमास।।१३।। सांगे ही स्वामी माई। पाजसी संस्काराचे बोल। पिबोनी तयासी दावीसी। अध्यात्म हा अमोल।।१४।। माता म्हणे बालकासी। जपूनी रहा संसारी। सुख दे साजेसे। मान ठेवूनी वडीलधारी।।१५।। क्षीण होऊनी पालवी। देई पर्जन्य त्यासी आधार। म्हणून दुःखीमन स्वामी। वचन करी ऊन हा भार।।१६।। ''भिऊ नको मी तुझ्या। पाठीशी आहे'' असे हे। वचन म्हणे आई बालकासी। सांभाळी असे ही जीवन।।१७।। षड्‌रिपुंचा हा सागर। पसरवी मोहाचे जाल। गुंतूनी मन तयात। सर्व दिशेने होई लाचार।।१८।। 'निश्चिंत रहा हे'। अमृत वचन। करविसी या बालकाचा सांभाळ।।१९।। सांडोनी हा विषभार। फेडीसी वर्क एकाहून एक। आधार देऊनी मनासी।।२०।। सबका स्वामी ही मालिक। पठण करिता ही नवशती।

लाभे नवजीवन। दुखा:स दूर सारून सुखे करिती पालन।।२१।। शाप पसरवी वेल। ऋण दारिद्र्याचा जहाल। सारोनी भोग प्रारब्ध। स्वामी वचन करिसी अव्वल।।२२।। भूत प्रेत आदि करिती। जीवन बेजार। स्मरोनी श्री स्वामीस। देई मनासी धीर।।२३।। असे हे। नवशतीचे अमृत पान। पठण करिता। जीवनाचे होईलसंधान।।२४।। मायेत खेळोनी। विटला हा जीव। करिता प्राशन। परमात्म्याकडे होईलआकर्षण।।२५।। घेऊनी झेप। करुनी उड्डाण। पाश फेडूनी मायेचे। मुक्तित मांडीलठाण।।२६।। संकटसमयी अथवा शोकसमयी। क्रोधकाली वा सर्व चिंतासमयी। स्मरोनी श्री स्वामीस। लावोनी घृताचा दीप।।२७।। लक्ष वेधोनी गुरुमाऊलीच्या चरणावरी। नंतर करिता पठण। होईलतो। सिद्ध जाण।।२८।। देवाधीदेव। शंभूरायांचा अवतार। जाणावा तो। मल्हारी मार्तंड खंडेराय।।२९।। माता जननी सुंदर। या विश्वाचे नामे भवानी। तुळजापूरी ती वसती।।३०।। प्रभू रामचंद्र दशरथ नंदन ते सीतापती। नाशोनी पापास करावया। सत्याचा शोध।।३१।। माता लक्ष्मी आहे पत्नी विष्णुची। भरती भांडार। धनधान्याने। कोल्हापूरी वसती।।३२।। यांच्या शुभ आशीर्वादाने। तसेच शुभकृपेने। करविला ग्रंथपूर्ण हा प्रेम मायेने।।३३।। कौडीन्य गोत्रोत्पन्न। लक्ष्मणराव भाविक। सिंधू तयाची पत्नी असे ती

धार्मिक।।३३।। त्यांनी दिलेल्या। पुण्य संस्काराच्या पेटाऱ्यातून। सोबत स्वामींच्या कृपा मायेने। ग्रंथ हा रचिला।।३४।। जरी जाणते अजाणतेपणी झाली असेल। चूक देऊनी प्रेमाचा मुलावा। स्वामी देतील साद।।३६।। धरूनी बोट तयांचे। होईलजडाचे क्षालन। करोनी शुद्ध या जीवास। सद्‌गुरु करती पालन।।३७।।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

प्रभो मी न माझा तुमचाची होवो तद्‌इच्छेप्रमाणे ही कृती राहो।।<br>
असे हे कृपाळा तुम्हाला वाहिलो मी चरणाऽरविंदार्पणमस्तु स्वामी ।।

।। श्री ।।

## ।। श्री तीर्थ महिमा स्तोत्र।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः।
श्री सरस्वत्यै नमः। श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

प्रत्यक्ष गंगा जलकुंभी आली। श्रीदत्त स्वामींसी ती स्नान घाली।।
महासिध्द आले पदतीर्थ घ्याया। महिमा तयाचा कळे ना जगाया।।
असे हे अमृततीर्थ करिसी मृतास संजीवन।।
करावे नवबिंदू तीर्थास आपुल्या जठरामध्ये संधारण।।
अमोलतो प्रत्येक बिदु सारे करिलक्षालन।।
शीतलआल्हाददायी तो करी परमार्थाचे पालन।।
प्रथम बिंदु जरी असेलसौम्य व शीतल।।

षड्रीपूच्या पाशातूनी सोडोनी मन हे स्थिर करेल।।
द्वितीय असा तो बिंदु राहूनी रवि समान प्रखर।।
नाशवोनी तमःअंधकारास करेलसत्त्व गुणाचा प्रसार।।
सुखकारी सोमवत मौलिक आहे जो दत्त बिंदू।।
डुंबोनी मायासागरातून दाखवी सद्गुरुंचा साक्षात्कार।।
मारोनी रोगास वेद तो बिंदु आहे वैद्यराज।।
करवी भक्तास सिध्द तोची खरा भक्तराज।।
नाग बिंदु हा परम्श्रेष्ठ जो करिमा धारण।।
तृप्ती होऊनी पितराची करी शास्त्राचे पालन।।
अग्निसमान शिवशक्तीचा कार्तिक बिंदु आहे जो महान।।
जाळोनी पाश ऋण दारिद्र्याचा करवी तो धनवान।।
विशालअन् अक्षय जो सागर बिंदु सप्तम्।।

नाशोनी भुतादिक आहे सिध्द तेचि कर्म।।
माता-पित्याचा प्रेमसागर जणू हा पालक वसुबिंदु।।
दूर करविसी भयास अन् दुःखास आहे तो परम्सिंधु।।
नवम् बिंदु दाखविसी सुखसमृध्दीची वाट।।
घालोनी पायघड्या तिजवर चरती हा सद्गुरुंचा थाट।।
करोनी धारण नवबिंदु होईलपाशांचे निर्दालन।।
सांडोनी अहंभाव होऊ स्वामी चरणी लीन।।

।।श्री स्वामी समर्थ चरणाऽरविंदार्पणमस्तु।।

'श्री स्वामी समर्थ नवशती अमृतसार' या मौलिक ग्रंथाचे पारायण करताना, एका फुलपात्रात पाणी घेऊनी त्यात तुळशीपत्र ठेवणे. पारायणाच्या संस्काराने झालेले तीर्थ घेणे. अशा तीर्थाचे नवबिंदू सेवन केल्याने होणारी फलश्रुती सद्गुरुंनी तीर्थ महिमा स्तोत्रात वर्णिली आहे.